


म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0014484


# एकनाथ-चरित्र

# एकनाथ-चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

लेखक

एक श्रोता

REFBK-0014484

किमत रु. २.००

अनाथ विद्यार्थी गृह
प्रकाशन पुणे २

प्रकाशक :
**डॉ. ग. श्री. कोशे,**
अ. वि. गृह प्रकाशनासाठी,
१७८६ सदाशिव, पुणे २.

© प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती
कार्तिक शु. १ शके १८८७
दिनांक २५–१०–६५

मुद्रक :
**दि. वा. गांगल,** एम्. एस्सी.
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

# अभिप्राय

प्रापंचिक व परमार्थी या दोघांना सारखेच आदर्शभूत होणारे पैठणकर श्रीएकनाथांचे अलौकिक गोड जीवनचरित्र अनेक लेखक, कवी,हरिदास यांच्या लेखनाचा व व्याख्यानाचे विषय व्हावे यात आश्चर्य नाही. यामुळे त्यांची गद्यपद्य चरित्रे आजवर अनेक लिहिली गेली आहेत. पण 'श्रोत्यांनी लिहिलेले प्रस्तुतचे चरित्र हे आगळ्या प्रकारचे आहे. आजवरची बहुतेक चरित्रे ही लेखकांनी आपल्या खोलीत बसून वाचकांकरिता लिहिली आहेत. प्रस्तुतच्या चरित्राचा विशेष असा आहे की हे चरित्र मुंबईतील ठाकूरद्वारी जे प्रसिद्ध काळ्या रामाचे मंदिर आहे त्यात महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. कान्हेरे बोवा यांनी आपल्या कीर्तनांतून महिनाभर हे चरित्र उत्तर रंगाला सांगितले व प्रस्तुत पुस्तकाचा लेखक याने श्रोता या नात्याने ते श्रवण केले व मनन करून नाथांच्या जीवनचरित्रातील पन्नास कथा लिहून काढल्या व छापल्या. यामुळे या पुस्तकास एक विशेष प्रकारचा जिवंतपणा आला आहे. शिवाय दुधात जशी शर्करा मिश्रित करावी व त्यास वेलदोड्याची पूड व केशराची काडी लावून ते तापवून पाहुण्यासमोर ठेवावे तसाच प्रकार येथे झाला आहे. वर म्हटल्याप्रमाणे नाथचरित्र आधीच गोड. स्वर्गातील देवांनीही गावे. सांगण्याचे स्थळ श्रीराममंदिर, (नाथांचा भावार्थरामायण हा शेवटचा ग्रंथ श्रीरामाच्या प्रेरणेने झाला हे प्रसिद्धच आहे.) व हे चरित्र कथन करणारे ह. भ. प. कान्हेरेबोवा. बोवांचा संस्कृत भाषेतील वेन्दाताचा अभ्यास जसा गाढा आहे तसेच प्राकृत भाषेतील ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध, तुकाराम-बोवांचा गाथा इत्यादी ग्रंथांवर उत्कृष्ट प्रभुत्व आहे. शिवाय, गायनवादनकलांत ते उत्तम निष्णात आहेत. या सर्वांना शोभा देणारी गोष्ट म्हणजे कीर्तनाकरिता कला शिकताना कीर्तनाचा विषय जो "श्रीहरी" त्यास ते विसरले नाहीत. भक्ति-प्रेमाचा जीवंत झरा त्यांच्यात वहात आहे. असे आचारशुद्ध ज्ञान व ईश्वरविषयक प्रेम यांनी भारलेले बोवा नाथकथा सांगणारे आहेत, व योगायोगाची गोष्ट अशी की, नाथकथा श्रवण करण्यास सर्वतोपरी अधिकारी, सात्त्विक व सुविद्य असा श्रोता बोवांच्या कीर्तनश्रवणास येणाऱ्या श्रोत्यांत लाभला. यामुळे या पुस्तकातील कथांना एक अपूर्व अशी गोडी आली आहे.

आधुनिक काळाचे ज्ञान असणारा विद्वान वक्ता व विज्ञानाच्या विकासाशी नित्य संबंध असणारा मुंबईतील चोखंदळ श्रोतृवर्ग. यामुळे खेडेगावच्या कीर्तनात ज्या गोष्टी सांगणे अनुचित ठरले असते त्या गोष्टींचा लाभ या कथांतून झाला आहे.

उदाहरणार्थ :— नाथांच्या चरित्रात अनेक चमत्कार आहेत. खेडेगावातला श्रोतृवर्ग हा सश्रद्धच असल्याने चमत्काराची घटना सांगितली म्हणजे पुरे होते. शहरातील चिकित्सक श्रोत्यांची अपेक्षा वेगळी असते. त्यांना बुद्धीला पटेल असे चमत्काराचे गूढ उकलून दाखविलेले हवे असते. ते कार्यकारण भावाची अपेक्षा करतात. या कथांतून नाथांच्या अनेक चमत्कारांचे कोडे बुद्धीला पटेल अशा पद्धतीने उकलण्याचा प्रयत्न केलेला आढळून येईल. नाथांच्या घरी श्राद्धीय ब्राह्मण जेवणे, गावबाचे ग्रंथ-लेखन, श्रीखंड्या घरात असताना कसा कळला नाही, दंडवत स्वामीचे मेलेल्या गाढवास उठवणे वगैरे चमत्कारांनी, आपण भक्तीनें ईशशक्तीत वावरत असलो तर त्या शक्तीच्या सामर्थ्याने गोष्टी कशा घडतात, हे दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे Psychical Research सारख्या अर्वाचीन काळात काम करणाऱ्या संस्थांनी प्रयोग करून काढलेले निष्कर्षही आपल्या सांगण्याच्या पुष्टयर्थ दिले आहेत. यामुळे हा कथासंग्रह सुशिक्षित, अशिक्षित अशा सर्वांनाच वाचनीय झाला आहे.

आणखी एक विशेष म्हणजे नाथचरित्र सांगत असताना खऱ्या संतांचे ठळक गुण शांतता, तितिक्षा, सहिष्णुता, भूतदया, समाधान, परदुःख-निवारणाची तळमळ यांच्याकडे प्रामुख्याने श्रोत्याचे लक्ष वेधले आहे.

श्रोत्याने बोवांच्या सांगण्याचा उत्तम व सरळ अनुवाद केला आहे, व कथारूपाने तो असल्याने आबालवृद्धांस वाचनीय झाला आहे. संतचरित्र सदाच बोधप्रद आहे. ज्ञानदेवांनी म्हटले आहे, "तैसे हरपलें आपण जें पावे '। तैं संतानें पाहतां गिवसावें। म्हणोनि वानावें ऐकावें। तेंचि सदा (ज्ञा. १८-४००) बोवांची कीर्तने संपून गेली पण जसे अलीकडे व्याख्यान, प्रवचन अथवा कीर्तन रेकार्ड करून ठेवले की, हवे तेव्हा लावता येते, हा जसा रेकार्डचा उपकार आहे, तशाच तऱ्हेचा उपकार या ग्रंथनिर्मितीने 'श्रोता' याने केला आहे. त्याच्या अनुवादामुळे बोवांनी सांगितलेले नाथचरित्र केव्हाही पुढे घेऊन त्याचे मननपूर्वक वाचन करून त्याची गोडी अनुभविता येईल.

'भक्त चरित्राने। प्रशंसति ते प्राणादि परौतें आवडती' असें सांगणाऱ्या श्रीभगवंतास ही त्याच्या भक्ताची कथा, बोवांनी गायिलेली व श्रोत्याने मांडलेली आवडो व वक्त्यां-श्रोत्यांकडून तो अशीच सेवा घेवो. त्यात वक्ता, श्रोता व आपल्यासारखा वाचक या सर्वांचेच कल्याण आहे.

अनंतचतुर्दशी १८८७
पुणे ९

शं. वा. दांडेकर

# श्रोत्यांचे हृद्गत

ह. भ. प. रा. बा. कान्हेरेबुवा यांनी एकनाथ महाराजांचे चरित्र शके १८८६ भाद्रपद वद्य प्रतिपदेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत चातुर्मासातल्या कीर्तनांत सांगितले. निरूपणाकरिता ज्ञानदेवांचा हरिपाठ घेतला होता.

ही पुस्तिका या आख्यानावरूनच मुख्यतः लिहिली आहे. चरित्रात काही-काही विचार मांडले गेले त्याबद्दल मीच जबाबदार आहे. चरित्र समग्र होण्याचे दृष्टीने इतर पुस्तकांचा पण थोडासा आधार घेतला आहे. माझे स्वतःचे संशोधन काही एक नाही. निरनिराळ्या पुस्तकांतील आणि कीर्तनांतील सांगितलेली माहिती एके ठिकाणी केली आहे एवढेच. ह. भ. प. कान्हेरेबुवांनी छापण्याची परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

काही लोक प्रश्न करतील की पांगारकर, महिपती, केशवसुत यांच्यासारख्या अधिकारी लेखकांनी नाथचरित्र लिहिले असताना अगदी सामान्य माणसाने इतक्या असामान्य व्यक्तीचे चरित्र लिहिण्याचे धाडस करावे काय? याला उत्तर तीनच अक्षरांत म्हणजे 'आवड' हे होय. संत-चरित्र वाचणे हा एक हरिपाठच आहे. नामस्मरण आहे. संत-चरित्र पुन्हा पुन्हा ऐकून व वाचून चित्तशुद्धी होते आणि अध्यात्ममार्गात चित्तशुद्धी होणे तर अत्यंत जरूर आहे. केवळ आवड म्हणून हे चरित्र लिहिले गेले आहे. तरी सर्वांनी करमणूक म्हणून तरी वाचण्यास काय हरकत आहे?

भाद्रपद गणेश ४, १८८७
मुंबई

श्रीकाळारामाचे देवळातल्या
चातुर्मासातील कीर्तनाला येणाऱ्यांपैकी
**एक श्रोता**

# प्रस्तावना

मजमाजी रंगली चित्तवृत्ती । याकारणे विसरला गृहासक्ती ।
त्यासी गृहस्थाश्रमीच माझी प्राप्ती । निश्चये जाण उद्धवा ।। १ ।।

चातुर्मास्य श्रीहरी कीर्तन श्रवणास येणाऱ्या एका प्रेमळ श्रोत्याने लिहिलेल्या श्रीएकनाथ महाराजांच्या चरित्रग्रंथास चार शब्द प्रस्तावनेदाखल लिहीत आहे. ग्रंथ व ग्रंथकार यांचे वास्तवतेला धरून यथार्थ स्तवन हा प्रस्तावनेचा मुख्य विषय असतो. सर्वत्र समदर्शन असणाऱ्या श्रीनाथांच्या चरित्राचे स्तवन करणे, विषय-दृष्टीला जमत नाही व जमले तरी ते पुरे होत नाही. अनंताशी साधर्म्य झालेल्या संतांच्या चरित्राचे गुणवर्णन करण्यास सन्तवाणी अपुरीच पडते. अवाङ्मनसगोचर असणाऱ्या ब्रह्मवस्तूस्वरूप झालेली दिव्य चरित्रे, परम पवित्रे असल्याने ती सदाच स्तवार्ह आहेत. श्रीसंतचरित्रे ही पूर्ण जीवनाची चरित्रे असतात व जीवन पूर्ण करण्याची खटपट करणाऱ्या साधकांना ती आदर्श असतात. जीवनाचा पूर्ण विकास करताना ज्या जीवनमार्गावरून जावे लागते तो मार्ग अत्यंत बिकट असतो. त्यामध्ये खाच-खळगे, काटेकुटे वगैरे नैसर्गिक व काही देहप्रारब्धाने निर्मिलेले असे असंख्य प्रत्यवाय असतात व त्यामुळे जीवनविकासाचा खरा मार्ग कोणता हे कळेनासे होते. अशा वेळी दीपस्तंभाप्रमाणे ही दिव्यचरित्रे मार्गदर्शन करीत असतात.

संत केवळ कृपेचे दीप । संत माझे निजरूप ।
संतदर्शने फिटे पाप । होती निष्पाप साधक ।।

कधीही न विझणाऱ्या दीपाप्रमाणे श्रीसंतांची चरित्रे असतात. आज सर्व जगात जीवन विकसित करण्याचे प्रयोग मनुष्य आपल्या बुद्धीनुसार करीत आहे. त्याकरता रोज नवीन नवीन साधने, नवीन साहित्य, नवीन विद्वत्ता निर्माण होत आहे. अनेक संस्था, अनेक आश्रम, अनेक मठ, अनेक पंथ निर्माण झाले आहेत व नव्याने उत्पन्न होत आहेत. जो तो आपआपल्या मताचे तत्त्वज्ञान करून व जीवन विकासाचे तेच एकमेव तत्त्वज्ञान असून बाकीची अपुरी चुकीची आहेत असे अत्या-ग्रहाने सांगत आहे. प्रत्येकाची ही भूमिका व प्रचार असल्याने जीवनविकासाची अंतरी खरी भूक लागलेल्या साधकास हा मार्ग स्वच्छ दिसत नाही. इच्छा असली, साधनेही मिळाली तरी ज्या मार्गाने साधने वापरायची तो मार्ग चांगला दिसला नाही तर सर्व प्रयत्न फुकट जातात व साधक हताश होतो. अशा वेळी यथार्थ मार्ग-दर्शन करणाऱ्या जीवनाच्या सहवासाची आवश्यकता भासते. जगात मार्ग पुष्कळ आहेत व त्यांचे दर्शकही पुष्कळ असले तरी खरा मार्ग दाखविणारा शाब्दे-परे-निष्णात

असा सत्पुरुष दुर्मिळ असतो. अशा पूर्ण जीवनाचा सहवास दुर्लभ असल्याने साधकाला खरा मार्ग कोणता ? असे प्रश्नचिन्ह् निर्माण होते. अशा वेळी दिव्य जीवनाची पूर्ण चरित्रे वाचणे फार अगत्याचे व हिताचे असते. नुसते वेदान्ताचे ग्रंथ वाचले, वेदान्त-प्रक्रिया समजावून घेतल्या तरी त्या जीवनविकासाच्या बाबतीत पुऱ्या पडत नाहीत. उलट नानाप्रकारचे संशय निर्माण होतात. अशा वेळी ब्रह्मरूप संतांच्या चरित्राचे अनुष्ठानपूर्वक पारायण—वाचनसाधकास पुष्कळ मार्गदर्शन करते. माझे श्रीगुरु-स्वामी म्हणत की वेदान्ताचे ग्रंथ वाचण्यापेक्षा आधी श्रीज्ञानदेवाची, श्रीसमर्थादी संतांची, थोर पुरुषांची चरित्रे वाचावीत, नुसती वाचावीत नव्हे तर पारायणे करावीत; अनुष्ठाने करावीत. नंतर वेदान्तग्रंथ वाचावेत. त्याने वेदान्ताची प्रमेये कळतील. नाना प्रकारच्या शब्दांनी भरलेल्या आपल्या या प्राकृत जीवनात निर्द्वंद्वता कुठे आहे व ती कशी साधावी हे श्रीसंतजीवनाचे परिशीलन केल्याशिवाय कळणार नाही. उत्तम जीवन ते, की जे—

निर्द्वंद्वोनित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।

शीत-उष्ण, सुखदुःख, मानापमान, लाभालाभ, जयापजय यांनी रहित, नित्य सत्वस्थ, सत्स्वरूप प्राप्ती, संरक्षण याविषयी निश्चित, परमप्रेमास्पद असे आत्मरूप, प्रेमळ असे असते. अशा पवित्र जीवनग्रंथांची आवश्यकता जगाला व समाजाला नेह-मीच सारखीच असते. परिस्थितिसापेक्ष आवश्यकता भासणारी जीवनचरित्रें निराळी. ती रोज राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, चरित्रें. आत्मकथा, चरित्रचंद्र, जीवनपट, माझे चरित्र, वगैरे नावांनी प्रसिद्ध होत आहेत व त्या त्या परिस्थितिनुसार ती ठीक आहेत पण परिस्थितिनिरपेक्ष चरित्र हे दिव्य असते. कुठल्याही परिस्थितीत दीपाप्रमाणे अखंड तेवत रहाणारे असे चरित्र म्हणजे श्रीसंतचरित्र होय. त्या-दृष्टीने श्रीनाथरायांच्या जीवनाचा विचार करता आदराने एवढेच म्हणावयाचे आहे कीं मधल्या युगात निरनिराळ्या देशांमधून अनेकविध क्षेत्रांत पुष्कळ थोर लोकाग्रणी, साधू, सिद्ध झाले पण त्या सर्वांमध्ये पैठणचे पुण्यश्लोक श्रीएकनाथ महाराज यांच्याइतका अलौकिक, अद्वितीय सर्वांना वंदनीय सत्पुरुष न भूतो-न भविष्यति. अखंड विवेकजागृतीचे मूर्तिमंत स्वरूप, पारमार्थिक प्रपंचाचा आदर्श, बोले-तैसा चाले या वाक्याचे पूर्ण सत्य, अशा अनेक दैवी गुणांनी मंडित अशा श्रीनाथांचे चरित्र प्रसिद्ध करण्याचे ज्यावेळी लेखक महाशयांनी मला सांगितले व काही तद्वि-षयक लिखाण वाचायला देवून माझे मत विचारले त्यावेळी प्रसिद्धीला काही हरकत नाही असे मला वाटले व करा प्रसिद्ध असे मी त्यांना सांगितले. हे चरित्र प्रसिद्ध करण्याची स्फूर्ती श्रीहरिकीर्तनांत त्यांनी श्रीनाथ-चरित्र महिना सव्वा महिना समग्र ऐकिले त्यावेळी झाली व त्याचे घरी जाऊन मनन केले, इतरांनी लिहिलेली चरित्रे वाचली, आपल्या प्रेमळ बुद्धीने विचार करून काही आवश्यक असे विचार घालून

हे चरित्र तयार केले आहे व ते प्रसिद्ध होत आहे. कीर्तनात जसे ऐकले तसेच शब्द किंवा तीच पद्धत यात घेतली असे नाही. ऐकलेल्या कथाभागाचे मनन करून आपल्या स्वतंत्र भाषेने हे लिहिले आहे. चरित्रात भाषा-सौष्ठवादी साहित्य-गुणांचा अभाव दिसला तरी लेखकाची श्रीनाथांच्या ठिकाणी असलेली पवित्र श्रद्धा ध्यानात घेतली व ह्या दृष्टीने पाहिले म्हणजे भावनेच्या बोला नाही पांचपेंच हे ध्यानात येते. आणि माझे असे मत आहे की, श्रीसंतचरित्रलेखनाला शुद्धभावनेचीच आवश्यकता आहे. श्रीपूर्णब्रह्म श्रीरामकृष्णादी अवतारचरित्रे व श्रीज्ञानेश्वर, श्रीएकनाथ, श्रीतुकोबा, श्रीसमर्थादी श्रीसंतचरित्रे हा संशोधनाचा, चिकित्सेचा विषय नाही, तर तो अनुष्ठानाचा विषय आहे.श्रीनाथांच्या पवित्र जीवनचरित्राची व ग्रंथांची श्रीतुकोबाराय व श्रीसमर्थस्वामी यांनी पुष्कळ पारायणे केली एवढा पुरावा पुरे आहे.

सध्या समाजात अनेक प्रकारचे राजस, तामस वाङमय नित्य प्रसिद्ध होत आहे. श्रीसंत-चरित्र व वाङमय दुर्मिळ होत आहे. अशा वेळी लेखकानी चरित्र प्रसिद्ध करून चांगले कार्य केले आहे. ज्याला सद्‌भावना आहेत अशा कुणीही श्रीसंत-चरित्र प्रसिद्ध करावे असे माझे मत आहे. यापूर्वी प्रसिद्ध झालेली चरित्रे असताना हे पुन्हा का प्रसिद्ध केले व यात विशेष काय आहे? अशी शंका येणे स्वाभाविक आहे. त्याचे थोडक्यात उत्तर देऊन ही प्रस्तावना संपवितो.

या चरित्रग्रंथात नव्याने, नवे विशेष असे काही सांगितले-लिहिले नसले तरी प्रसिद्ध करण्यास काही हरकत नाही. न जाणो याच चरित्रवाचनाने कुणाच्या सुप्त पारमार्थिक भावना जागृतही होणे शक्य आहे. एखादे वाक्य, एखादा प्रसंग शेकडो वेळा अनेकांच्या तोंडून ऐकून, ग्रंथांतून वाचून जागृती येत नाही. पण ईशसंकेताने तेच वाक्य, तोच प्रसंग दुसऱ्या एखाद्या अगदी सामान्य माणसाच्या तोंडातून ऐकला, ग्रंथातून वाचला तर परमार्थभाव-विवेक जागृत होतो असे पुष्कळ दाखले आहेत.

कारण श्रीसंतचरित्र म्हणजे जागता विवेक.

चंद्र तेथे चंद्रिका। शंभू तेथे अंबिका
संत तेथे विवेका। असणेचि ।।

बदलत्या उग्र काळामध्ये विवेकजागृतीची फार जरूर असल्याने या ग्रंथ-वाचनाने वाचणारांचा सदसद्विवेक जागृत होऊन त्यांना या प्रापंचिक जीवनात श्रीमंगलमूर्तीच्या कृपाप्रसादाचा लाभ होवो, अशी श्रीपाशी प्रार्थना आहे.

श्रीनाथचरित्राचे सार प्रस्तावनेपूर्वी लिहिलेल्या ओवीत स्पष्ट आहे.

श्रीकाळाराम मंदिर मुंबई २.
सोमवार दि. ९।८।६५

ह. भ. प. **रा. बा. कान्हेरे**
चातुर्मास्यकथेकरी बुवा

# अनुक्रमणिका


| कथा | पृष्ठ |
|---|---|
| मंगलाचरण | १ |
| उपोद्घात | २ |
| एकनाथांचे लहानपण | ११ |
| जनार्दनपंत | १२ |
| एकनाथ पळून गेला | १३ |
| आजोबा -- आजी गडावर जातात | १४ |
| गुरुगृही वास्तव्य | १४ |
| गुरूची भेट | १५ |
| गुरुसेवा सुरू झाली | १६ |
| सगुण साक्षात्कार | १७ |
| आणखी थोडी सेवा | १८ |
| आत्मदर्शनाचा अनुभव | १९ |
| पवित्र देहाचा स्पर्श म्हणजे काय | २० |
| यात्रेला निघाले -- चंद्रभट | २० |
| एकनाथ पैठणला परत आले | २२ |
| एकनाथांचा विवाह | २३ |
| एकनाथांचा गृहस्थाश्रम--दिनचर्या | २४ |
| गोकुळाष्टमीचा उत्सव | २५ |
| आजी -- आजोबा गेले | २६ |
| श्रीखंड्या आला | २७ |
| कृष्णदास लोळे | २९ |
| मुंजीकरिता पैसे | ३३ |
| चार अतिथी | ३४ |
| आधी पिंक थुंकणारा--मग बंदगीबुवा | ३५ |
| महादू महाराचे जेवण | ३७ |

| | |
|---|---|
| मठाधिपतीचे काशीस बोलावणे | ३९ |
| दासोपंत देशपांडे यांची भेट | ४३ |
| महाराचे मूल | ४३ |
| कुष्ठरोगी | ४५ |
| कैद्याची सुटका | ४६ |
| ब्रह्मसमंधाला सद्गती | ४७ |
| चोर आंधळे झाले | ४८ |
| रामचंद्रपंत | ४९ |
| अग्निहोत्री ब्राह्मण | ५१ |
| कोठलाही दगड परिसच | ५४ |
| महाराज चांभाराकडे गेले | ५५ |
| नाथ महाराज ब्रह्मचारी होते | ५६ |
| काशीहून हरिपंडित परत येतो | ५८ |
| गाढवाला गंगा दिली | ५९ |
| नाथांच्या घरी श्राद्ध | ६१ |
| वडाऱ्यांची संभावना | ६३ |
| प्रत्यक्ष गोदावरी | ६३ |
| गोविंददास आणि गोपिकाबाई | ६४ |
| दंडवतस्वामी | ६९ |
| पंढरपूरची यात्रा | ७१ |
| औषध कसे द्यावे ? | ७४ |
| ज्ञानेश्वरांचे दर्शन | ७४ |
| सावकाराचे पैसे परत केले | ७८ |
| श्रीखंड्याला ओळखला | ७९ |
| गावबाची गोष्ट | ८० |
| शेवटचा निरोप | ८१ |
| नाथमहाराजांनी जलसमाधी घेतली | ८४ |
| एकनाथांची आरती | ८५ |
| आत्मषट्कम् | ८६ |

४००६१ चरित्र
१२५८ २८।।४६
ग्रंथ संग्रहालय ठाणे
१४८८४

# एकनाथ-चरित्र

॥ हरिः ॐ ॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

अखण्डमण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम्।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥

अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥

स्थावरं जङ्गमं व्याप्तं येन कृत्स्नं चराचरम्।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥

चिद्रूपेण परिव्याप्तं त्रैलोक्यं सचराचरम्।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥

अज्ञानमूलहरणं जन्मकर्मनिवारणम्
ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं गुरोः पादोदकं पिबेत्।

नित्यं शुद्धं निराभासं निराकारं निरञ्जनम्।
नित्यबोधं चिदानन्दं गुरुब्रह्म नमाम्यहम् ॥

☆

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥

☆

# उपोद्घात

जय जय राम कृष्ण हरी ।।

☆

गोवर्धनधर गोपालनरत गोकुळसंकटहारी ।
नवनीरदसम नवनीतप्रिय नवलविनोद विहारी ।
दुर्वासोनुत दुःख विमोचक दुर्जनसंगमहारी ।
शरणागत दीना चरणी नेइ करुणा दृष्टि निहारी ।।

☆

बाळकृष्ण चरणि लक्ष लागो रे ।.
कीर्तनरंगी ब्रह्मानंदी चित्त रंगो रे ।।
स्वरूपी मन हे लाविता सौख्य आम्हा रे ।
कामक्रोधादिक जाती निजधामा रे ।।
सारासार वदविता सद्गुरुराय रे ।
मंगलधाम जीवन नरहरिपाय रे ।।
सद्रूप चिन्मय नारायण रूप ध्याऊ रे ।
तन्मय होऊनी बलवंत प्रेमे गाऊ रे ।।

☆

श्रीरामचंद्र महाराज की जय ।

श्री गुरुदेव दत्त

☆

जन्म घेणे लागे वासनेच्या संगे । तेचि झाली अंगे हरीरूप ।।
हरी मुखे गाता हरपली चिंता । त्या नाही मागुता जन्म घेणे ।।

☆ ☆ ☆

वासना असल्या तर त्या तृप्त करण्याकरिता माणसाला पुन्हा जन्म घ्यावा लागतो. खरे नामस्मरण होत असेल तर सगळ्या काळज्या नाहीशा होतात, आणि नामस्मरण करणाऱ्या माणसाला पुनर्जन्म येत नाही, तो मुक्त होतो.

संत ज्ञानेश्वर, जे केवळ विष्णूचाच अवतार, ते त्यांच्या हरिपाठात सांगतात की, नामस्मरण 'नित्य सत्य अमित' केल्याने नुसती काळजी दूर होते, एवढेच नाही तर मनुष्य मुक्त होतो. संतश्रेष्ठ एकनाथ महाराजसुद्धा त्यांच्या हरिपाठात आपल्याला नामस्मरणाचे हेच महत्त्व आणि माहात्म्य सांगतात. सर्व संत म्हणतात की, नामस्मरण हे फार सोपे साधन आहे. इतके सोपे असूनसुद्धा जर ते इतके प्रभावी आहे, तर आपल्या धर्मात इतकी अनेक व्रतवैकल्ये, दानधर्म, तीर्थयात्रा, यज्ञयाग कशाकरिता सांगितले आहेत ? यांतील काही कर्मे केवळ चित्तशुद्धीकरिता आहेत आणि काही विशिष्ट फळ मिळविण्याच्या दृष्टीने करतात. ही सर्व कर्मे विशिष्ट जागी, सुमुहूर्तावर आणि विधियुक्त करावी लागतात, तरच त्यांचे फळ मिळते. या दृष्टीने ती नामस्मरणापेक्षा जास्त कठीण आहेत. परंतु ती तात्पुरती करण्याची असल्यामुळे त्यांचे बंधन आणि काल मर्यादित असतो. त्यांची फळे पण मर्यादितच असतात.

नामस्मरण त्या दृष्टीने फार सोपे आहे. ते वाटेल त्या वेळी, वाटेल तेथे, वाटेल तेव्हा आणि वाटेल त्या स्थितीत करावे. संत एकनाथ म्हणतात,

**हरि बोला देता, हरि बोला घेता । हासता खेळता हरि बोला ।।**
**हरि बोला गाता, हरि बोला खाता । सर्व कार्य करिता हरि बोला ।।**
**हरि बोला एकान्ती, हरि बोला लोकान्ती । देह त्यागा अंती हरि बोला ।।**
**हरि बोला भांडता, हरि बोला कांडता । उठता बैसता हरि बोला ।।**
**हरि बोला जनी, हरि बोला विजनी । एका जनार्दनी हरि बोला ।।**

भांडलात तरी हरकत नाही, पण अनुसंधानात भांडा, म्हणजे ते भांडण तुम्हाला चिकटणार नाही. नामस्मरण चालू असताना नामरूपाची जोड असली पाहिजे. अशा नामस्मरणाने एकाग्रता होते आणि एकाग्रता ही एकरूप होण्याची पहिली पायरी आहे. विश्वशक्तीशी एकरूपता म्हणजेच मुक्ती. नामस्मरण जर इतके सोपे आहे आणि त्याच्यात मुक्ती देण्याचे जर सामर्थ्य आहे, तर प्रत्येकजण नामस्मरण का करीत नाही ? हीच तर गंमत आहे, आणि हेच आश्चर्य आहे. पण ह्याला तीन मुख्य कारणे आहेत. ती म्हणजे—

(१) हरिनामाबद्दल जरी माणसे नेहमी बोलतात, तरी त्याने मुक्ती मिळेलच अशी आपली शंभर टक्के श्रद्धा नाही.

(२) प्रत्येक माणसाला मुक्ती पाहिजेच आहे कुठे ? योगक्षेम उत्तम रीतीने चालला म्हणजे झाले. हीच माया. कारण पुष्कळ माणसांना या जीवनाचे ध्येयच माहीत नसते.

(३) नामस्मरण वाटते तितके सोपे नाही. का नाही सोपे असे कोणी विचारील; करून पाहा हेच त्याला उत्तर ! एकनाथ साधू म्हणतात,

**नाम घेता हे वैखरी। चित्त धावे विषयाकडे।**
**कैसे होता हे स्मरण। स्मरणामागी विस्मरण।।**

आपण खरोखर जर विचार करू लागलो तर प्रत्येक माणसाच्या मनात हे आयुष्य म्हणजे काय हा विचार केव्हा ना केव्हा तरी आल्यावाचून राहात नाही. भगवान् शंकराचार्य म्हणतात,

**का ते कान्ता कस्ते पुत्रः, संसारोऽयमतीव विचित्रः।**
**कस्य त्वं कः कुत आयातस्तत्त्वं चिन्तय तदिह भ्रातः।।**

त्यातून विचार करून 'प्लॅन' केलेल्या गोष्टी वाकड्या होऊ लागल्या म्हणजे तर हा विचार फारच उसळतो. या प्रश्नाचे उत्तर देण्याइतकी प्रत्येक माणसाची बुद्धी सूक्ष्म आणि तीक्ष्ण नसते. व्यवहारातसुद्धा आपण तज्ज्ञांचा सल्ला घेतो, मग या बाबतीत का घेऊ नये ? साधुसंत हे या व्यवहारातील तज्ज्ञ किंवा 'एक्सपर्टस्' म्हणता येतील. हिंदुस्थानशिवाय इतर देशांत हे तज्ज्ञ फार थोडे होते, आणि आहेत. हिंदू तत्त्वज्ञानाशिवाय याचे कोणीच उत्तर दिलेले नाही. श्रीशंकराचार्य हे एक अवतारी पुरुष इ. स. ८०० च्या सुमारास होऊन गेले. ते चार ओळीत सांगतात की,

**जन्तूनां नरजन्म दुर्लभमतः पुंस्त्वं ततो विप्रता**
**तस्माद्वैदिकधर्ममार्गपरता विद्वत्त्वमस्मात्परम्।**
**आत्मानात्मविवेचनं स्वनुभवो ब्रह्मात्मना संस्थितिः**
**मुक्तिर्नो शतजन्मकोटिसुकृतैः पुण्यैर्विना लभ्यते।।**

—विवेकचूडामणि

सगळ्या संतांचे विचार बहुतेक सारखेच असतात. एकनाथमहाराजसुद्धा म्हणतात,

**बहुता सुकृता नरदेह लाधला।**
**भक्तिविण गेला अधोगती।।**

ज्ञान परिपक्व झाले की, थोड्या शब्दांत लोकांना सहज समजेल असे सांगण्याची हातोटी आपोआप येते. श्रीशंकराचार्यांचा हा श्लोक वाचला तरी हा जन्म कां येतो

ह्या प्रश्न राहातोच. तो का येतो आणि तो कसा टाळता येईल याचे उत्तर एकनाथ-महाराज चार सोप्या ओळींत प्राकृतात देतात,

**जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेचि झाली अंगे हरिरूप ।।**
**हरि मुखी गाता हरपली दीर्घचिंता। त्या नाही मागुता जन्म घेणे ।।**

☆

**पुंडलीक वरदा हारि विठ्ठल। पार्वती पते हरहर महादेव।**
**सीताकांत स्मरण जय जय राम। श्री गुरुदेव दत्त ।।**

योग्य-अयोग्य; नीती-अनीती; सत्कर्म-दुष्कर्म; नित्य-अनित्य; खरे-खोटे ह्यांचा झगडा मनुष्याच्या उत्पत्तिकालापासून चालूच आहे. कारण हे सगळे विचार मनुष्याच्याच बाबतीत लागू असतात. डार्विनच्या सिद्धान्ताप्रमाणे मानवदेह उत्पत्तीस येण्याच्या आधी इतर योनीतीलच शरीरे अनेक वर्षे अस्तित्वात असावी. त्यावेळी फक्त जो स्थूल शरीराने बलवान तोच जगत असावा; कारण एकमेकाला मारून खाणे हाच कायदा. मानवदेह हा सर्वांत उच्च कोटीतला समजला आहे. त्याचे कारण एवढेच की, मनुष्य केवळ स्थूल देहाच्याच विचारात राहात नाही. तसे पाहिले तर नीच योनीतील प्राण्यांच्या शरीर-रचनेत—उदाहरणार्थ, कुत्र्याचे शरीर आणि मनुष्याच्या जडदेहाच्या रचनेत आणि देहधर्मात फार फरक नाही. पण अंतःकरण ही मानवी देहातील एक अवर्णनीय शक्ती आहे. शरीरधारणा करण्याकरिता कोठल्या तरी विशिष्ट शक्तीची जरुरी आहे असे सर्व विचारवंतांचे मत आहे. आता ही शक्ती कुठून येते आणि ती कशा तऱ्हेने वावरते याबद्दल आर्यांच्या हिंदू तत्त्वज्ञानाशिवाय कोणीही विचार केलेला आढळत नाही. यापुढे जर सचेतन प्राण्यांत उन्नती होणार असेल तर ती फक्त मानसिक आणि बुद्धीसारख्या शक्तीनेच होऊ शकेल. शरीररचना आणि त्याच्या क्रिया ह्या दृष्टीने मानवी शरीर हे शरीररचनेचे शिखर आहे. मानवदेहातील काही जीवांनी ह्या मन-बुद्धीच्या शक्तीचे म्हणजे उन्नतीचेसुद्धा शिखर गाठले आहे. ही उन्नती कशी करून घेता येईल हे केवळ हिंदू तत्त्वज्ञान आणि हिंदू धर्मच सांगू शकतो; आणि सांगतो. नीती-अनीतीचा झगडा सतत चालूच आहे; आणि त्यांत नीतीचाच नेहमी विजय होत असतो. पण जेव्हा असा प्रसंग येतो की अनीती जास्त बलवान होणार असते त्यावेळी ही विशिष्ट शक्ती अवताररूपाने प्रकट होते आणि दुर्जनांचा संहार करून नीती पुन्हा प्रस्थापित करते असे भगवद्गीतेचे वचन आहे.

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।**

ही घटना काही अकस्मात होत नाही. ह्या मधल्या काळात सर्वसामान्य लोकांना मार्गदर्शन करण्याकरिता ही अनिर्वचनीय, अनादी शक्ती नीतिमान् लोकांच्या देहात विशिष्ट रीतीने वावरत असते. दीपगृह ज्याप्रमाणे बोटीला धोक्याचा इशारा देते, त्याप्रमाणे हे नीतिमान् लोक म्हणजे साधुसंत मार्गदर्शन करीत असतात. पण आम्ही लक्षच देत नाही. म्हणून संतचरित्र वाचन अत्यंत जरूर आहे.

मनुष्यप्राण्याला त्याच्या आयुष्यात अनेक दु:खे भोगावी लागतात. पण आयुष्य म्हणजे काय ? काही लोकांच्या मते आयुष्य म्हणजे संलग्न मिळणारे अनुभव—म्हणजेच गतकाळातल्या इच्छा ठराविक वेळेत आणि विशिष्ट जागी पूर्ण करण्याची संधी—म्हणजे आयुष्य. बरे, दु:ख म्हणजे तरी काय ? स्थूल शरीराच्या क्रियेमध्ये बिघाड झाला की, वेदना होतात. आणि सूक्ष्म शरीराच्या म्हणजे मन बुद्धीच्या इच्छेविरुद्ध घडले की, दु:ख होते. हिंदुधर्मीयांचा असा समज आहे की, इच्छाशक्ती अती प्रबळ आहे आणि ह्या इच्छा पूर्ण करण्याकरिता ही शक्ती स्थूल शरीर धारण करते,

**पंचीकृतमहाभूत * संभवं कर्मसंचितम् ।**
**शरीरं सुखदु:खानां भोगायतनमुच्यते ।।**
**पंचप्राणमनोबुद्धिदशेन्द्रियसमन्वितम् ।**
**अपंचीकृतभूतोत्थं सूक्ष्माङ्गं भोगसाधनम् ।।**

आत्मबोध :—भगवान् शंकराचार्य

वासनाच नसतील तर शरीर धारण करण्याचे कारणच उरत नाही. या निरिच्छ स्थितीला कसे पोहोचता येईल हीच हिंदुधर्माची शिकवण आहे.

अद्वैत मताप्रमाणे यच्चयावत् वस्तू–चर आणि अचर–एकाच तत्त्वापासून उत्पन्न झाल्या आणि केवळ वासना तृप्तीकरिता हा जीव, म्हणजे ज्याला वासनादेह, कारणशरीर किंवा लिंगदेह म्हणतात, तो निरनिराळी शरीरे धारण करू लागला. ह्या वासना कोणत्या रीतीने समूळ नाहीशा करता येतात हीच हिंदू तत्त्वज्ञानाची शिकवण आहे.

ह्या सर्व दृश्य जगताचे अधिष्ठान जी शक्ती तिलाच ब्रह्म, ईशशक्ती किंवा आत्मतत्त्व म्हणतात.

---

* पंचतत्त्वांचे पाच-पाच विभाग होतात. त्या विभागांचे संयोग होतात. त्यांपासून आपल्या कर्मानुसार आपला स्थूलदेह जन्मास येतो. ह्यात्र शरीरापासून आपल्याला सुखदु:खांचे भोग मिळतात.

पंचीकरण होण्याच्या आधी पाचतन्मात्रापासून पाच प्राण, दहा इंद्रिये, मन आणि बुद्धी तयार होतात, आणि ह्यालाच सूक्ष्म देह म्हणतात. हा सूक्ष्म देह प्रत्येक व्यक्तीचे अनुभव घेण्याचे साधन आहे.

ह्या शक्तीनें काल्पनिक जग उत्पन्न केले आणि त्यातच आपण जीव म्हणून वावरू लागलो.

**परमात्माऽद्वयानन्दपूर्णः पूर्वं समायया ।**
**स्वयमेव जगद् भूत्वा प्राविशज्जीवरूपत ।।**

पंचदशी, नाटयदीप, विद्यारण्य

ह्या जीवाला आपल्या पूर्वस्थितीचा विसर पडला आणि सुखदुःखाची परंपरा सुरू झाली. ह्या पूर्वस्थितीला पोहोचण्याचा मार्ग म्हणजेच हिंदूंचा अध्यात्म मार्ग किंवा परमार्थ.

ईशावास्योपनिषदाच्या वचनाप्रमाणे पूर्णस्वरूप गाठण्याचा एकच मार्ग आहे. निष्काम कर्म आणि भक्ती या जोडीच्या आचरणाने जीव निरिच्छ होऊन मुक्त होतो, निष्काम कर्म केल्याने वासना कमी कमी होऊ लागतात, आणि त्याच्याच जोडीला भक्ती किंवा ध्यान केल्याने पूर्णस्वरूपाची जाणीव होऊ लागते. मनुष्य पूर्ण निरिच्छ झाला म्हणजे ध्यानमार्ग पूर्णपणे साधू शकतो, आणि ध्यानयोगाने पूर्णत्व गाठले की त्या योग्याला विश्वशक्ती सगळीकडे वावरताना दिसू लागते. आज आपल्याला ही शक्ती दिसत नाही. तिच्या जागी विविधत्व दिसते. पण एकदा पूर्ण स्थितीला पोहोचल्यावर ह्या स्थूल देहाला मृत्यू येईपर्यंत तो साधक मनाने निर्विकल्प आणि शरीराने निष्काम कर्म करीत राहातो.

अशा पूर्णस्थितीला पोहोचलेल्यांपैकी एकनाथमहाराज एक होते. एखादा मनुष्य म्हणेल की 'आम्हाला मुक्तीची जरुरी नाही. संतांच्यासारखे वागून इहलोकी केवळ हालअपेष्टा आणि नंतर मुक्ती ! करायची काय ती ? नको ! आम्हाला मुक्तीच नको'. नको तर नको. पण या आयुष्यात मानसिक सुख तर पाहिजे आहे ना ? झाले तर ! कोठलाही संत आजपर्यंत असे म्हणाला नाही की, त्याने दर्शविलेल्या मार्गाने गेले तर स्थूलशरीरसुख मिळेल. पण ते छातीवर हात ठेवून सांगतात की त्यांच्या मार्गाने वागले तर निरपेक्ष सुख खात्रीने मिळेल. आपण थोडा विचार केला तरी हे सहज लक्षात येईल की मानसिक सुख अधिक महत्त्वाचे आहे. मानसिक टोचण्यांनी, विशेषतः काळजीने मनुष्य जितका खंगतो तितका शारीरिक कष्टाने खंगत नाही. संतांनी केलेल्या मार्गदर्शनाने वागल्यास मुख्य मनाची शांतता मिळते. आणि मनाच्या शांततेइतकी मौल्यवान् वस्तू ह्या जगात नाही. एवढ्याकरिताच संतचरित्र वाचणे आवश्यक आहे. मनाची शांती वाढविण्याचा हा एक मार्ग आहे.

मग प्रश्न असा येतो की ही निरिच्छ बुद्धी आपल्यात आणावयाची कशी ? रोज आम्हाला जेवायला तर पाहिजे, उपाशीच मेलो तर परमार्थ करायचा कसा ? जेवले तर पाहिजेच, आणि जेवू नको म्हणून कसे चालेल ? पण तिखटच कमी झाले,

खारट-आंबटच जास्त झाले, अशा क्षुल्लक कारणावरून दुसऱ्याला ताप देऊन स्वत:चे डोके पिकवून घेऊ नका. घरातला नोकर काम करण्यात एवढेसे चुकला तर लगेच त्याच्यावर खेकसू नका. त्याने शांतपणा वाढेल आणि अहंकार कमी होईल. रोजच्या जीवनातील अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्या आचरणात आणल्या तर माणसाची शांतता आणि संयम वाढेल. त्यांतून वैराग्य आणि विवेक नक्की उत्पन्न होईल. आणि विवेक-वैराग्य-शम-दमादी गुण अंगात बाणणे हेच मुमुक्षूचे लक्षण. हे गुण अंगात येण्याकरिता निरनिराळ्या लोकांनी अनेक मार्ग सुचविले आहेत. पण त्यांतील एक मार्ग मात्र सर्वसंमत आहे, आणि तो म्हणजे संतसंगती. मनुष्य कितीही दुराचारी असला, तरी त्याच्यावर संतसंगतीचा परिणाम थोडया प्रमाणात तरी झाल्यावाचून राहात नाही. याच्याच उलट मनुष्य कितीही चांगला असला तरी वाईट संगतीने तो बिघडतोच. एकनाथ महाराज म्हणतात, " **साधूचे संगती हरि जोडे !** " संतसंग हेच सर्वांत उत्तम साधन आहे. भगवान् शंकराचार्य म्हणतात,

**सत्संगत्वे नि:संगत्वं निस्संगत्वे निर्मोहत्वम् ।**
**निर्मोहत्वे निश्चलतत्त्वं निश्चलतत्त्वे जीवन्मुक्तिः ॥**

भज गोविंदम्:— भगवान् शंकराचार्य

इंग्लंडमध्ये बॅडन पॉवेल नावाच्या एका सद्गृहस्थांनी **'स्काउट सिस्टीम'** नावाची एक संस्था जवळजवळ सत्तर वर्षांपूर्वी सुरू केली. त्यात बहुसंख्येने शाळेतील मुलांमुलींनाच घेतात. त्यांच्या इतर नियमांमध्येच एक नियम असा आहे की, प्रत्येक मुलाने दररोज एकतरी सत्कृत्य केले पाहिजे. उदाहरणार्थ, एखादा म्हातारा किंवा आंधळा रस्ता ओलांडायचा प्रयत्न करीत असेल तर त्याला हात धरून पलीकडे नेऊन पोचविणे, कोणी काही माहिती विचारली तर सभ्यपणाने आणि नम्रतेने शक्य तितकी माहिती देणे. हा काही फार मोठा त्याग नाही, पण सहानुभूती आणि परोपकाराचा हा पायाच आहे. कल्पना करा, सर्व हिंदुस्थानात दोन कोटी मुले आहेत, आणि प्रत्येक मूल रोज एक सत्कृत्य करत आहे तर दररोज केवढा पुण्याचा आणि परोपकाराचा साठा होत राहील ! लाचलुचपत आणि दुष्कृत्ये केव्हाच नाहीशी होतील, आणि जगातला कोठलाही देश आपल्याकडे वाकडया दृष्टीने पाहू शकणार नाही. संत. प्रवृत्तीने झालेली एकजूट टिकाऊ असते. साधुसंत म्हणजे काही अजब वस्तू का आहे ? सतत्त्व आचरणात आणतो तो साधू आणि त्याच्याबद्दल केवळ चर्चा करतो तो भोंदू.

घरातल्या मूर्तीवर छप्पन्न फुले उधळणे, नाक धरून तिच्यासमोर तासभर बसणे यापेक्षा बसमधून जात असता आपली जागा एखाद्या म्हाताऱ्याला दिली तर देव अधिक संतुष्ट होईल.

४००६१
१२५१
१
चरित्र
२८।१२।६९

**संतोषं जनयत्प्राज्ञाम् । तद्देवेश्वरपूजनम् ॥**

**'दया क्षमा शांती तेथे देवाची वसती'** असे वागून तर बघू या. कीर्तन संपल्यावर लोकांना धक्के देत बुवांच्या पाया पडले तर कीर्तन ऐकल्याचा उपयोग काय ? कुठल्याही संताचे चरित्र पाहा. सहानुभूती, क्षमा, दया, औदार्य, निर्भयता, सत्यता आणि शांतता हेच त्यांचे विशिष्ट गुण सामान्य माणसाला दिसतात.

ह्या आपल्या भरतखंडात अनेक जीवात्मे अशा पूर्ण स्थितीला पोहोचले. त्यांच्यापैकी एकनाथमहाराज हे एक साधुपुरुष होऊन गेले. त्यांची खात्री झाली होती की,

**" नित्यप्रेम भावे हरिपाठ गाय । हरिकृपा होय तयावरी ॥"**

महाराजांच्या चरित्रातील—तसे पाहिले तर सगळ्याच संतांच्या चरित्रातील—बऱ्याच गोष्टींवर हल्लीच्या काळातील माणसांचा विश्वास बसणार नाही. कारण ते असेच विलक्षण चमत्कार वाटण्यासारखे आहे. पण मनुष्यप्राणी, त्याचा जन्म आणि मृत्यू हाच एक विलक्षण चमत्कार नाही का ? हल्लीचे आकाशध्वनियंत्र, रेडिओ हा काय साधा चमत्कार आहे का ? काही वर्षांत चंद्रावरसुद्धा मनुष्य जाण्याची तयारी करीत आहे, हा काय सामान्य चमत्कार ?

जनार्दनस्वामींच्या कृपेने एकनाथांना आत्मसाक्षात्कार झाला, आणि त्या वेळेपासून त्यांचे सर्व आयुष्य ईश-अनुसंधानात गेले. प्रत्येक माणसाला केव्हा ना केव्हा तरी असा अनुभव आला असेल की, तो एखाद्या गोष्टीत इतका तन्मय होतो की त्याला बाकीच्या सर्व गोष्टींचा विसर पडतो. नव्हे, इतर गोष्टी दिसतच नाहीत. ही तर व्यवहारातील गोष्ट झाली. मग ज्यांच्या दृष्टीला यच्चयावत् वस्तू म्हणजे त्या अनादी शक्तीचे एकच रूप दिसत असेल, त्यांची मनस्थिती कशी बरे असेल ? मीच निरनिराळ्या रूपाने सगळीकडे वावरतो आहे अशी वृत्ती झाल्यावर कार्य-कारण-कर्ता ह्यांत फरक राहिला कुठे ? मग वैर तरी कुणाशी करायचे आणि सख्य कुणाशी करायचे ? दोन्ही एकच ! खरे-खोटे, चांगले-वाईट, नित्य-अनित्य हे केवळ द्वैत वृत्तीतले विकल्प आहेत. सच्चिदानंद स्वरूप हे,

**निर्गुणो निष्क्रियो नित्यो निर्विकल्पो निरंजनः ।**
**निर्विकारो निराकारो नित्यमुक्तोऽस्मि निर्मलः ॥**

—आत्मबोध :

—आणि निरींद्रिय असल्यामुळे त्या स्थितीत सगळे एकच आहे. हे केवळ शब्द झाले. पण ही स्थिती कशी असेल ते फक्त ज्याला त्याचा अनुभव आला आहे

तोच जाणू शकतो. ही निर्विकल्प समाधी प्राप्त झाल्यावरसुद्धा काही संतांना त्यात समाधान वाटले नाही. त्यांनी उपास्य दैवत आणि मुक्त ह्यांच्यातीलच आनंद श्रेष्ठ मानला असा सामान्य माणसांचा समज होतो, पण हे खरे नाही. द्वैतातला हा आनंदसुद्धा त्या अद्वैताचा अनुभव आल्यावरच खऱ्या दृष्टीने मिळू शकेल.

नाथ महाराजांच्या चरित्राचे विहंगावलोकन केले तर आपल्याला काय दिसते? भूतदया हेच सर्वांचे सार, व्यावहारिक दृष्टीने येशू ख्रिस्ताने सांगितले "जसे तुम्हाला वागवलेले आवडेल तसेच दुसऱ्याला वागवा" खरेच आहे! आपल्याला लोकांनी तुसडेपणाने वागवलेले जर आवडत नाही तर आपण दुसऱ्याशी तसे का वागावे? हीच भूतदया—हाच समभाव—आणि हेच अद्वैत तत्त्व. आपणच ती विश्वशक्ती झालो तर काय अशक्य आहे? गावबा आणि गोदाबाईचा मुलगा जो पुढे कवी मुक्तेश्वर म्हणून प्रसिद्ध झाला, हे दोघे लहानपणी मुके होते आणि ते महाराजांच्या कृपेनें बोलके झाले.

शांतपणे विचार केला तर चमत्कारसुद्धा कसे घडले असतील ते आपल्याला कळू लागेल. आपल्यात ती श्रद्धा आणि ती दृष्टी मात्र आली पाहिजे.

आता आपण थोडा वेळ भजन करून एकनाथमहाराजांच्या चरित्राकडे वळू.

**हरे राम, हरे राम, रामराम हरेहरे।**
**हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे।**

**श्रीगुरुदेव दत्त**

# एकनाथ-चरित्र

**नमिला शर्मिलास्यप्रद शांतिजलधि एकनाथ तो भावे ।**
**शोभावे ज्याचे यश विश्वी ज्या देववृंद लोभावे ।।**

मोरोपंत– (सन्मणिमाला)

भानुदास नावाचे संत शालिवाहन शकाच्या चौदाव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास महाराष्ट्रात पैठणक्षेत्री होऊन गेले. विजयनगरच्या रामराजाने पंढरीची श्रीविठ्ठलमूर्ती सर्व लोकांच्या मनाविरुद्ध विजयनगरास नेऊन तेथे स्थापन केली. ही मूर्ती भानुदासांनी त्यांच्या भक्तिबळावर परत पंढरपुरास आणली. त्या वेळेपासून भानुदास फार प्रसिद्धीस आले. भानुदासांचा मुलगा चक्रपाणी आणि त्याचा मुलगा सूर्यनारायण. सूर्यनारायणास एक मुलगा झाला. तोच एकनाथ. तो मूळ नक्षत्रावर जन्मला होता. एकनाथ एक वर्षाचा होतो तोच त्याचे आईवडील इहलो सोडून गेले.[1] भानुदासाबद्दल कवी मोरोपंत लिहितात,

**झाले वंद्य शतमखा ते गेले शरण भानुदासा जे ।**
**यासी साम्य पहाता न उदारा रत्न सानुदासा जे ।।**

## एकनाथांचे लहानपण

आजा-आजीवर चिमुकल्या नातवाचा सांभाळ करण्याची पाळी आली. पुत्र-वियोगाचे दुःख अतिशय झाले, पण करणार काय ? जबाबदारी ओळखून काल-क्रमणा करणे भागच होते. पैठणच्या अगदी जवळ 'पिंपळेश्वर'[2] नावाचे एक प्राचीन शिवालय आहे. तेथे आजोबा आणि आजी रोज संध्याकाळी पुराण ऐकावयास जात असत. आपल्याबरोबर लहानग्या एकनाथाला सुद्धा नेत असत. नातू अतिशय हुशार होता. समजू लागल्यावर तो पुराणिकबुवांना प्रश्न विचारी आणि कधी कधी पुराणिकबुवा अगदी निरुत्तर होत असत. पुराणिकबुवा वाचलेले ज्ञान सांगत असत, पण त्यांना आत्मज्ञानाचा अनुभव नव्हता. ते तरी आत्मतत्त्वाची माहिती काय सांगणार ? चक्रपाणींनी नातवाची मुंज तो पाच वर्षाचा असतानाच केली, आणि इतक्या लहानपणापासूनच एकनाथ वर्णाश्रम धर्माप्रमाणे ब्रह्मचर्यव्रत पाळू लागला.

---

टीप—१. एकनाथ म्हणाले :—एका जनार्दनी मुळींच्या गोठी ।
मायसगट सगळा बापचि घोटी ।।

२. हल्ली ह्या पिंपळेश्वर शिवालयाचे नाव गाढेश्वर आहे.

पुराणिकबुवा मोठे प्रेमळ सद्‌गृहस्थ होते. त्यांच्या पुराणात एक दिवस एकनाथाने ऐकले की प्रत्येक मनुष्याला गुरू असणे आवश्यक आहे. कारण गुरु-कृपेशिवाय खरे ज्ञान अगर आत्मसाक्षात्कार होत नाही. आपल्याला साधे व्यावहारिक ज्ञान मिळवावयाचे असेल तरीसुद्धा मार्गदर्शक लागतो. मग परमार्थात गुरू असणे आवश्यक नाही का ? हे ऐकल्यापासून एकनाथ चौकशी करू लागला की असे आत्मज्ञान करून देणारा गुरू आपल्याला कसा आणि कुठे भेटेल ? इतक्या लहान वयात काय ही मनोवृत्ती ! सहा-सात वर्षांचे हे वय म्हणजे खेळा-बागडावयाचे वय, पण पूर्वजन्मीच्या सुकृताची फळे लवकरच दिसू लागली. गुरू भेटावा हीच सारखी तळमळ लागली.

**भावेविण देव नकळे निःसंदेह ।**
**गुरुविण अनुभव कैसा कळे ।।**

यासंबंधी त्याने पुराणिकबुवांना विचारले. एक दिवस पुराणिकबुवांना आठवण झाली, आणि त्यांनी सांगितले की त्यांच्या पाहण्यात आणि ऐकण्यात एकच सत्पुरुष गुरू करण्यास योग्य असा आहे, आणि तो म्हणजे देवगिरीचा किल्लेदार 'जनार्दनपंत'.

एकनाथाच्या डोक्यात एकसारखा तोच विचार सुरू झाला आणि मनाला सारखी तीच तळमळ लागली की आपण लवकरच देवगिरीला जावे आणि जनार्दन-पंतांच्या चरणी शरण जावे. एक दिवस एकनाथ त्या शिवालयात बसलेला असताना त्याला आकाशवाणी ऐकू आली की, "तुला जो गुरू पाहिजे आहे तो तुला देवगिरी किल्ल्यावर भेटेल, तरी तू तिकडे जा ". पुराणिकबुवा आणि आकाशवाणी यांनी एकच आदेश दिला. मग काय, एकनाथांनी लगेच देवगिरीला जाण्याचे ठरविले, पैठणहून तो किल्ला जवळजवळ चाळीस मैल दूर आहे.

## जनार्दनपंत

सहाशे वर्षांपूर्वी कृष्ण देशपांडे याजकडे यादव राजाने, चाळीस लहान गावांचे (हल्ली जे चाळीसगाव शहर आहे तोच प्रदेश) आधिपत्य दिले. शके १४०१ च्या सुमारास देशपांडे घराण्यात हरिपंत नावाचे हरिभक्त, साक्षात्कारी संत, दत्तोपासक होऊन गेले. यांचाच मुलगा जनार्दन—एकनाथांचे गुरू. फाल्गुन वद्य ६, शके १४२६ मध्ये यांचा जन्म झाला. ते यवनांची नोकरी करीत पण वर्णाश्रमधर्म पाळीत असत. त्याच्या १९–२० व्या वर्षी त्यांचा दोन मुलींशी विवाह झाला. एकीचे नाव सावित्री आणि दुसरीचे रमा. शके १४५५ साली त्यांना गडाचा अधिकार मिळाला. यवन-राज्यांतसुद्धा स्वामींचे इतके वजन होते की, देवगिरीवर दर गुरुवारी सुटी असे. सर्व जातींत त्यांचे शिष्य होते. पण त्यातले मुख्य म्हणजे एकनाथ, रामा जनार्दन आणि

जनी जनार्दन. जनार्दनपंतांना शके १४५७ मध्ये, फाल्गुन वद्य ६ ला दत्तदर्शन झाले. त्यांची गुरुपरंपरा अशी सांगतात :—नारायण—विधी—आदिनाथ—दत्त काहींच्या म्हणण्याप्रमाणे जनार्दनस्वामींचे गुरू नरसिंह सरस्वती म्हणून होते. शके १४८१ मध्ये फाल्गुन वद्य षष्ठीला जनार्दनस्वामींनी समाधी घेतली.

## एकनाथ पळून गेला

पिंपळेश्वराच्या देवळांत आकाशवाणी ऐकल्यावर एकनाथाने लवकरच देवगिरीवर जाण्याचे ठरविले. एक दिवस पहाटे आजोबा आणि आजी झोपेत असतानाच त्यांना नमस्कार करून एका लंगोटी-कुडत्यानिशी एकनाथ घरातून पळून गेला. या वेळी त्यांचे वय सुमारे आठ वर्षांचे होते. साधारणपणे शके १४६३ मधील ही गोष्ट. सकाळी उठल्यावर आजी आजोबांनी एकनाथाला खूप हाका मारल्या. पण कोठूनच उत्तर येईना. त्यांनी नेहमीच्या सर्व जागा शोधल्या पण तो कोठेच सापडला नाही. तो कोठेच नाही असे वाटू लागल्यावर मात्र मनात काळजी उत्पन्न झाली, आणि ते शोक करू लागले. मनच ते ! एक ना दोन ! ‘ मन चिंती ते वैरी न चिंती ’. मग ते पुराणिकबुवांकडे चौकशी करण्याकरिता गेले. तिथे त्यांना निराशेचा धक्का बसला. त्यांना असे कळले की, पुराणिकबुवाच मुळी बाहेरगावी गेले आहेत. त्यांच्या मनात साहजिकपणे संशय आला की, पुराणिकबुवांनीच आपल्या नातवाला नेले नसेल ना ? पण करणार काय ? पुराणिकबुवांचाही शोध लागेना. रोज शोध चालूच असे. रोज सकाळी सगळीकडे शोधावे आणि हताश होऊन परत यावे. कोणीही नवीन मनुष्य गावात आला की, त्याला विचारावे, आमचा एकोबा कुठे पाहिलात का हो ? होता होता अशी चौदा वर्षे गेली. त्यांना असेच वाटत असे की, पुराणिकबुवांनीच आपल्या एकनाथाला पळवून नेला. चौदा वर्षांनंतर एक दिवस पुराणिकबुवा परत आले. चक्रपाणींनी त्यांना भेटून सगळी हकीगत सांगितली आणि नातवाला पळवून नेल्याचा त्यांच्यावर आरोप केला. बिचारा पुराणिकबुवा साधा, सरळ, प्रेमळ, प्रामाणिक, नाकासमोर चालणारा. तो आपण मुळीच अपराधी नाही म्हणून म्हणाला. पिंपळेश्वराच्या देवालयात पुराण सांगत असे त्या वेळची सर्व आठवण करण्याचा त्याने प्रयत्न केला. आठवले ! त्याने एकदा जनार्दनस्वामींच्याबद्दल एकनाथाला सांगितले होते की तेच एक गुरू करण्यास योग्य असे साधूपुरुष त्याच्या पाहण्यात होते. त्याच्या निष्कपटी बोलण्यावर आजोबाआजींचा विश्वास बसला आणि त्यांनी देवगिरी किल्ल्यावर, चौदा वर्षांनी का होईना, पण जनार्दनस्वामींची भेट घेण्याकरिता जाण्याचे ठरविले.

## आजोबा-आजी गडावर जातात

देवगिरीचा किल्ला इतका दूर आणि हे दोघे तर अगदी म्हातारे. पण त्यांचे शरीर जसे कणखर तशी त्यांची मने आणि इच्छासुद्धा बळकट होती. थोड्याच दिवसांत ते देवगिरी किल्ल्यावर पोहोचले.* जनार्दनस्वामींची आणि त्यांची गाठही पडली. स्वामींना पाहाताच आजा-आजींच्या मनांत त्यांच्याबद्दल पूज्यभाव निर्माण झाला. आपला नातू एकनाथ याच्याबद्दल विचारल्यावर स्वामींनी मागच्या चौदा वर्षांतला सर्व इतिहास त्यांना सांगितला आणि म्हणाले, "तुमचा एकोबा खरोखरी मोठा ब्रह्मज्ञानी झाला आहे. तुमच्या जीवनाचे सार्थक झाले, कुळाचा उद्धार झाला आणि त्याचे स्वतःचे जीवन कृतार्थ झाले" हे सगळे ऐकून आजोबा-आजींना अतिशय आनंद झाला आणि धन्यता तर वाटलीच; परंतु त्याचबरोबर एकोबाला पाहण्याची इच्छाही द्विगुणित झाली. त्यांनी स्वामींच्या जवळ एकच हट्ट धरला की, मरण्यापूर्वी आम्हाला एकोबा भेटवा. स्वामी म्हणाले की तो उत्तर हिंदुस्थानात तीर्थयात्रेला गेला आहे. दक्षिणेकडे जाण्याच्या आधी तो पैठणास येईल. त्या वेळीं त्याला भेटावे, आणि ठेवून घ्यावे. तो गुरू-आज्ञेशिवाय राहाणार नाही अशी शंका आजी-आजोबांना आली. तेव्हा स्वामींनी एकनाथाला देण्याकरता पत्र दिले. त्यातील मजकूर असा—— "हे पत्र मिळताच तेथेच राहावे. आजी-आजोबांना म्हातारपणी एकटे सोडून जाऊ नये. त्यांची सेवा करून त्याना संतुष्ट करावे. गृहस्थाश्रम पत्करावा, आणि संसार परमार्थी करावा". एकनाथाने गुरूंची आज्ञा कशी शब्द न् शब्द पाळली हे आपल्याला पुढे दिसेलच. आजी-आजोबांना एकनाथांबद्दलचे सर्व ऐकून आणि ते पत्र वाचून परम समाधान झाले. ह्या समाधानात व्यावहारिक आनंद तर होताच, पण पारमार्थिक आनंद त्याहून अधिक होता. आपले वडील फार मोठे भक्त तर नातू त्याहून सवाई. इतक्या लहान वयात ब्रह्मज्ञानी. आजोबा आणि आजी मोठ्या उत्साहाने पैठणला परत आली. रोज एकनाथाची वाट पाहात दिवस घालवू लागली. ज्या-अर्थी स्वामींनी सांगितले आहे त्या अर्थी तो पैठणला नक्की परत येईल, अशी त्यांची खात्री होती.

## गुरुगृही वास्तव्य

मुंज झाल्यावर साधारण तीन वर्षांनी म्हणजे वयाच्या आठव्या वर्षी एकनाथ एक दिवस पहाटे पळून गेला हे मागे सांगितलेच आहे.

पैठणहून निघाल्यावर लोकांची नजर चुकवीत आणि वाट विचारीत काही दिवसांनी एकनाथ दमलेल्या, मळलेल्या आणि भुकेल्या अवस्थेत देवगिरी किल्ल्यावर

* काही लेखकांच्या मताप्रमाणे आजा-आजी त्यांच्या वयामुळे देवगिरीस गेलेच नाहीत. ही कामगिरी पुराणिकबुवांनीच केली आणि गुरुदेव जनार्दनस्वामींचे पत्र पण त्यांनीच आणून आजोबांना दिले. आधार—"स्वकरे चंदन घाशी" वरून जोशीलिखित.

येऊन पोहोचला. ह्याच निश्चय, आणि हीच श्रद्धा ! पहारेकऱ्यांनी जनार्दनपंतांना वर्दी दिली की अगदी दीन स्थितीत असलेला एक बटू त्यांना भेटण्याची इच्छा करीत आहे. एके दिवशी सकाळी ध्यानस्थ बसलेले असताना दत्तात्रेयाच्या मूर्तीऐवजी एका बटूचाच चेहरा सारखा त्यांच्या डोळ्यासमोर येत होता. तेही अस्वस्थ झाले होते. म्हणून स्वामींनी पहारेकऱ्यास त्या बटूला आत आणावयास सांगितले. तो काय आश्चर्य ! ज्या बटूचा चेहरा त्यांना त्या दिवशी सकाळी ध्यान करीत असताना दिसला होता, तोच हा बटू. स्वामींनी ममतेने त्याची पुष्कळ चौकशी केली. " मला आजोबा आणि आजीशिवाय कोणीही नाही. मला परत जावयाचे नाही. मी आपल्याला शरण आलो आहे. मी आता येथून जाणार नाही. माझे वाटेल ते करा " अशा निश्चयाच्या शब्दांत एकनाथाने स्वामीना सांगितले. आणि त्यांच्या पायांवर डोके ठेवले. स्वामींचे अंत:करण भरून आले. एवढ्या लहान वयात केवढी ही निष्ठा ! गुरुदेव दत्तात्रेयांच्या संकेताचा अर्थ आता त्यांना समजला. स्वामींनी एकनाथाला प्रेमाने उचलून धरला.—तो कायमचाच धरला; आणि तो कायमचाच उचलला. गुरुपत्नीने त्याला आपल्या मुलाप्रमाणे सांभाळला.

## गुरूची भेट

एकनाथ लहान असतांना त्याला जनार्दन पंतांच्याकडे जा, तेच योग्य गुरू आहेत हा आदेश कसा मिळाला याबद्दल काही कीर्तनकार एक निराळी कथा सांगतात :

पिंपळेश्वराच्या शिवालयात संध्याकाळी प्रवचन ऐकल्यावर त्याबद्दल रात्री एकनाथ नेहमी विचार करीत असे. एके दिवशी सकाळी त्याने आपल्या आजीला विचारले, "आजी काल संध्याकाळी आपण देव आणि ज्ञान ह्याबद्दल ऐकले. देव कुठे ग असतो आणि ज्ञान म्हणजे ग काय ?" मोठमोठ्या विद्वानांना ज्याचा उलगडा होत नाही त्याबद्दल ती माउली काय सांगणार ! ती म्हणाली, " एकनाथ ह्याचे उत्तर फक्त सद्गुरूच देऊ शकतात. प्रवचनकारसुद्धा तुला काही सांगू शकणार नाहीत."

त्या दिवशी एकनाथ गोदावरीवर स्नान करण्यास गेला असता त्याची एकदम समाधी लागली. समाधीत साक्षात गोदामाई प्रगट झाली आणि तिने एकनाथाला सांगितले की, " तुझा गुरू दौलताबादला आहे. त्याच्याकडे तू जा." ह्याच वेळी आजीला पण अशाच तऱ्हेचा दृष्टांत झाला. स्नान करून आल्यावर एकनाथाने आजीला सर्व हकीगत सांगितली आणि गुरूकडे जाण्याची इच्छा पण दर्शवली. आजीने मोठ्या आनंदाने परवानगी दिली. थोडेच दिवसात एकनाथ दौलताबादला येऊन पोचला. तिथे त्याला एक वेषधारी साधू भेटला. त्याने आपणच जनार्दन स्वामी म्हणून सांगून एकनाथाला ठेवून घेतला. बरेच दिवस

झाले. एकनाथाला काही समाधान वाटेना. गोदामाईने पुन्हा दर्शन दिले आणि सांगितले की, " जनार्दन स्वामी जनार्दनपंत ह्या नावाने ओळखले जातात आणि ते किल्ल्यावर राहतात."

लगेच एकनाथ किल्ल्यावर गेला. त्या दिवशी सर्व दरवाजे बंद होते. पण तेवढ्यात त्याला एक तेजस्वी ब्राह्मण दिसला. हेच जनार्दनपंत असावेत असे समजून एकनाथ त्यांच्या पाया पडला आणि मिठी मारून त्यांची सेवा करण्याचा निश्चय सांगितला. त्या ब्राह्मणाने त्याला वर उठवला आणि सांगितले की, " जनार्दनपंत किल्लेदार वेगळे आहेत आणि त्यांचे दर्शन गुरुवारी होऊ शकेल."

गुरुवार उजाडताच एकनाथ स्नान आटोपून जनार्दनपंतांच्या दर्शनास गेला. तो तिथे खूपच गर्दी होती. बऱ्याच वेळाने त्याला पाया पडण्याची संधी मिळाली. जनार्दतपंतांनी त्याची सगळी चौकशी करून तो सर्व काम करण्यास तयार असेल तर त्याला राहण्याची परवानगी दिली.

अशा रीतीने गुरु-शिष्यांची प्रथम भेट झाली.

## गुरुसेवा सुरू झाली

शके १४६३ फाल्गुन वद्य षष्ठीचा हा दिवस. ह्या दिवसापासून एकनाथांची गुरुसेवा सुरू झाली. त्यांचे कपडे धुणे, उष्टे काढणे, देवघर स्वच्छ करणे, पूजेची तयारी करणे इतकेच काय पण शौचकूपसुद्धा साफ करणे अशी सगळी कामे तो करीत असे. अंग चेपणे, त्यांच्या आधी उठणे, नंतर निजणे, हे तर नित्याचेच असे. ही सर्व स्थूल शरीरसेवा झाली. पण त्यांचे मनोधर्मसुद्धा तो कटाक्षाने सांभाळीत असे. ज्या ज्या गोष्टींमुळे ते संतुष्ट होतील ते ते तो करीत असे. अशा प्रकारच्या सेवेने त्याचा सगळा अहंकार झडून गेला. मन निर्विकार आणि निर्विकल्प होऊन तो गुरूशी एकरूप होऊ लागला. गुरू अधिकाधिक प्रसन्न होऊ लागले आणि दोन मने जवळ आली. गुरूच्या मनाशी एकरूप होणे हीच खरी गुरुसेवा. स्वामींचे हिशेब सुद्धा एकनाथ लिहीत असे.

एका रात्री स्वामींनी जागे होऊन उजेड पाहिला, तो एकनाथ हिशेब लिहीत होता. एका पैशाची चूक सापडत नव्हती. बऱ्याच वेळाने सापडली. त्याची एकाग्रता पाहून स्वामी प्रसन्न झाले, आणि ही संधी योग्य वाटून स्वामींनी त्याला उपदेश केला. त्यावेळेपासून एकनाथाची आत्मोन्नती वेगाने होऊ लागली, कारण त्याच्या सेवेला आता मार्गदर्शनाचे साहाय्य मिळाले.


**" कानी जे पेरिले, डोळा ते उगवले ।**
**व्यापक भारले, तोचि हरी ।। "**

अशा रीतीने गुरुसेवेत आणखी काही वर्षे गेली आणि एकनाथ गुरुकृपेस पात्र आणि मनानही तयार आहेत असे जनार्दनस्वामींना वाट लागले, लवकरच त्यांनी




पिंपळेश्वर (गाढेश्वर) मंदिरातील शिवलिंग [ पान ११ ]


☆ ☆ ☆ ☆ ☆



दौलताबादचा किल्ला [ पान १४ ]



दौलताबादच्या किल्ल्यावरील
विजयस्तंभ [ पान १४ ]



जनार्दनस्वामी (दौलताबादच्या
किल्ल्यावर) ज्या देवळात बसत
असत त्या देवळाचा फोटो [ पान १८ ]

एकनाथाला सगुणसाक्षात्कार करून देण्याचे ठरविले. एक दिवस अगदी लवकर उठल्यावर त्यांनी एकनाथाला आपल्याबरोबर येण्यास सांगितले. त्यालाही मोठा आनंद झाला. चालता चालता गुरूंनी त्याला बऱ्याच बोधपर गोष्टी सांगितल्या. विशेष एक सांगितले की ज्या ठिकाणी ते जात होते, तेथें पोहोचल्यावर त्याने काही एक न बोलता आणि न भिता जे जे काही दिसेल ते ते गप्प राहून पाहावे. गुरू बरोबर असल्यावर भीती कशाची आणि का म्हणून वाटावी ?

## सगुण साक्षात्कार

बरेच लांब चालून गेल्यावर एका दाट अरण्यात ते एका सत्यलिंग नावाच्या सरोवराकाठी येऊन पोहोचले. तेथे एक मोठी शिळा होती, तिच्यावर स्वामींनी पूजेची तयारी करून आपल्या इष्टदेवतेची म्हणजे गुरुदेव दत्तात्रेयाची मूर्ती स्थापन केली. त्यांनी एकनाथाला जरा पलीकडे जवळच एका झाडाआड बसावयास सांगितले. मूर्तीची पूजा वगैरे करून स्वामी ध्यानस्थ बसले. काही वेळाने सबंध वातावरणात एकाएकी बदल झाला, आणि काहीतरी असामान्य घडणार आहे असे एकनाथाला वाटू लागले. तो काय चमत्कार ! गुरुदेव ज्या ठिकाणी ध्यानस्थ बसले होते त्याच्या समोरच एक औदुंबराचे झाड होते, ते एकदम दुभंगले आणि त्यातून हातात त्रिशूळ आणि एक कटोरा घेतलेला एक मलंग बाहेर पडला. त्याच्या मागोमाग लाल डोळे असलेले काही उग्र कुत्रेही बाहेर आले. हे दृश्य पाहून एकनाथ भयभीत झाला. पण आपला पाठीराखा—आपले गुरुदेव—जवळच आहेत याचे स्मरण झाल्यावर त्याची भीती पार नाहीशी झाली. तो मलंग जनार्दनस्वामींच्या जवळ येऊन बसला आणि त्या दोघांची चर्चा सुरू झाली. ही सामान्य माणसाची दृष्टी झाली, पण एकाच शक्तीची ही दोन रूपे किंवा प्रकार होते. एक देवतेच्या रूपात आणि एक मानव-देहाच्या रूपात. थोड्या वेळाने मलंग आणि जनार्दनस्वामींनी त्या कटोऱ्यातील अन्न भक्षण केले. नंतर स्वामींनी एकनाथाला हाक मारली आणि त्या मलंगास नमस्कार करून तो कटोरा धुऊन आणण्यास सांगितला. एकनाथ जरा घाबरतच होता, पण गुरूंची आज्ञा आणि गुरूंचे सान्निध्य असल्यावर भिण्याचे कारण काय ? मलंगाला नमस्कार करून एकनाथ तो कटोरा घेऊन सरोवराकाठी आला. देवतेचे उच्छिष्ट भक्षण करण्याची संधी जनार्दनस्वामींनी एकनाथाला मिळवून दिली. नित्या-प्रमाणे त्या कटोऱ्यात असलेले उच्छिष्ट त्याने गुरुप्रसाद म्हणून ग्रहण केले. हा प्रसाद ग्रहण केल्यावर एकनाथाला अलौकिक शांततेचा अनुभव आला. इकडे स्वामींनी सद्गुरू दत्तात्रेयांना एकनाथावर कृपा करण्याची विनंती केली. तो कटोरा स्वच्छ करून आणल्यावर स्वामींनी एकनाथाला त्या मलंगाच्या पाया पडण्यास सांगितले.

त्या मलंगाच्या चरणस्पर्शाने एकनाथाला एक अद्भुत अवर्णनीय अनुभव आला. त्याचे मन शांत, स्तब्ध झाले. तो निर्विकल्प झाला. त्याच्या सर्व वृत्ती निमाल्या. तो वर पाहातो तो मलंग अदृश्य होऊन त्याच्या जागी श्रीसद्गुरू दत्तात्रेयांची मूर्ती त्याला दिसू लागली. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी गुरुकृपेचे अंतिम साफल्य म्हणून आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला. त्याच्या ऐहिक जीवनाला संरक्षण देऊन त्याचे भूतलावरचे जीवन कृतार्थ केले. जनार्दनस्वामींच्या रूपाने मानव-देहातील गुरूची कृपा तर आधी होतीच. त्यांच्याच आशीर्वादाने त्यात आता श्रीदत्तात्रेयासारख्या देवतेच्या कृपेची भर पडली. जीवनाचे आणखी साफल्य ते काय ?

## आणखी थोडी सेवा

श्रीदत्तात्रेयाचा सगुणसाक्षात्कार झाल्यापासून एकनाथाचे सर्व जीवन गुरु-कृपेच्या छत्राखाली आणि विश्वशक्तीच्या संरक्षणाखाली गेले. अशा व्यक्तीचे आणि तिच्या जीवनाचे कोणी आणि काय वर्णन करावे ? एकनाथाची गुरुसेवा चालूच होती, आणि त्याला आता स्वानुभवाच्या सगुणभक्तीची जोड मिळाली.

एकनाथांनी, गुरू सेवा कशी असावी या संबंधी जे काहीं लिहीले आहे त्यांपैकी काही ओव्या येथे देत आहे.—

**गुरु माता गुरु पिता, गुरु स्वामी कुळदेवता ।**
**गुरूवाचोनि सर्वथा, आणिक देवता स्मरेना ।।**
**मुखी सद्‌गुरूचे नाम, हृदयी सद्‌गुरूचे प्रेम ।**
**देही सद्‌गुरूचे कर्म, अविश्रम अहर्निशी ।।**
**गुरुसेवेसी गुंतले मन, विसरला स्त्री-पुत्र-धन ।**
**विसरला मनाची आठवण, मी कोण हे स्फुरेना ।।**
**गुरुस्मरण करिता देख, स्मरणे विसरे तहानभूक ।**
**विसरला देह गेह सुख, सदा सन्मुख परमार्थ ।।**

रोजचा कार्यक्रम असा असे की सकाळी जनार्दनस्वामी ध्यानस्थ बसले की त्यांच्या आत्मानुसंधानात व्यत्यय येऊ नये म्हणून एकनाथ देवघराच्या बाहेर पहारा करीत असे. एके दिवशी किल्ल्यावरच्या पहारेकऱ्याने लखोटा आणला की किल्ल्यावर परचक्र येत आहे, तरी किल्लेदाराने,म्हणजे जनार्दनस्वामींनी सैन्य घेऊन त्याला तोंड द्यावे. एकनाथांनी तो मजकूर वाचला. गुरूच्या ध्यानसेवेत तर अडचण येता कामा नये आणि प्रसंग तर तातडीचा ! त्याने त्या पहारेकऱ्याला जाण्यास सांगितले, आणि एक ठरवले. आपणच स्वामींचा पोषाख चढवला, ढाल-तलवार

घेतली आणि घोड्यावर स्वार होऊन सैन्यासह शत्रूवर चाल करून गेला. एकनाथाचा आणि तलवारीचा कधी संबंधच आला नव्हता. आणि लढाईचा अनुभव तर मुळीच नव्हता; पण गुरुकृपेचा आणि ईशशक्तीचा पाठिंबा होता ना ! मग आणखी काय पाहिजे ? शत्रूचा पराजय केला आणि एकनाथ परत फिरला. किल्ल्यावर परत पोहोचण्यापूर्वीच स्वामी ध्यानातून जागे झाले. बाहेर आले, तो त्यांना ते पत्र सापडले. पण पाहातात तो त्यांचा पोषाख, ढाल, तलवार, काहीच जाग्यावर नाही, आणि एकनाथ सुद्धा नाही ! हा सर्व प्रकार काय असावा असा विचार करताहेत तोच एकनाथ लढाई जिंकून परत येत होता. सर्व परिस्थिती त्यांच्या लक्षात आली, आणि उलगडा झाला. एकनाथाच्या धैर्याचे आणि आत्मविश्वासाचे गुरूंना कौतुक वाटले. परत आल्यावर, एकनाथाने जे केले त्याबद्दल गुरूंनी क्षमा करावी म्हणून त्यांच्या पायावर मस्तक ठेवले. क्षमा कसली, सद्‌गुरूची ही कृपाच होती. एकनाथाची परीक्षा घेण्याकरिता ईशशक्तीने मुद्दाम घडवून आणलेली परिस्थिती होती.

## आत्मदर्शनाचा अनुभव

अशा सेवेत आणखी काही काळ गेल्यानंतर स्वामींना वाटू लागले की एकनाथाच्या जीवनाचा पूर्ण विकास होण्याची वेळ आली आहे. म्हणून स्वामींनी त्याला जवळच्या एका डोंगरावर जाऊन ध्यानस्थ बसण्यास सांगितले. रोज सूर्योदयापासून माध्यान्हकाळापर्यंत ध्यान करावे आणि तिथेच एकट्याने वसती करून राहावे. गुरु-इच्छेप्रमाणे एकनाथाचा ध्यानमार्ग—परमार्थातील शेवटचा टप्पा—सुरू झाला.

शूलभंजन डोंगरावरील त्या अरण्यात ज्या ठिकाणी एकनाथ ध्यान करण्यासाठी बसत असत, त्या अरण्याच्या जवळच राहणाऱ्या एका गुराख्याला ही ध्यानस्थ बसलेली व्यक्ती दृष्टीस पडली. विश्वशक्तीने एकनाथांच्या अन्नाची सोय केली. तो गुराखी 'मी रोज दूध आणून देईन, त्याचा स्वीकार व्हावा' अशी विनंती करता झाला, आणि ही सर्व बातमी घरी परत गेल्यावर आपल्या धर्मपत्नीला त्याने सांगितली. तिलाही मोठा आनंद झाला की आपल्या घरातल्या अन्नाने एका साधूला तृप्त करण्याची संधी मिळाली. सात्त्विक वृत्तीच्या माणसांना दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची संधी मिळाली की नेहमी आनंद होतो. जनसेवा ही प्रभुसेवा असे त्यांना वाटत असते. ह्याप्रमाणे तो गुराखी रोज दूध आणून देऊ लागला. एक दिवस तो दूध घेऊन येतो तोच त्याला एक भयंकर दृश्य दिसले. एकनाथ ध्यानस्थ बसले आहेत आणि त्यांच्या पोटाभोवती वेढे घालून आणि आपला सबंध फणा एकनाथांच्या मस्तकावर पसरून एक भयंकर नाग बसला होता. तो गुराखी अत्यंत भयभीत झाला. तो उभा होता त्या जागेवरच खिळला आणि त्याच्या तोंडातून एक किंकाळी निघाली. त्याबरोबर एकनाथ जागृतावस्थेत आले. अंगाची हालचाल होताच त्या नागाने

आपले विळखे सोडले आणि चटकन आपले बिळात निघून गेला. ही सगळी घटना पाहून त्या गुराख्याचे तर भानच हरपले. त्याच्या भीतीत आणखी आश्चर्याची भर पडली. ज्याला आपण रोज दूध देतो तो साधू म्हणजे कोणीतरी असामान्य, अवतारी देहधारी व्यक्ती आहे, अशी त्याची खात्री झाली. ही सर्व हकीगत कालांतराने जनार्दन स्वामींच्या कानावर आली. आपल्या शिष्याला आत्मदर्शन झाले अशी त्यांची खात्री झाली आणि त्यांनी एकनाथाला परत बोलावले. "आदि मध्य अंत अवघा हरि एक" अशीच एकनाथांची वृत्ती झाली आणि त्यात विवेक, वैराग्य नांदू लागले.

## पवित्र देहाचा स्पर्श म्हणजे काय ?

वर वर्णन केलेला प्रकार आणि अशाच इतर गोष्टी घडतात तरी कशा ? संतपुरुषांच्या बोलण्याचा आणि दृष्टीचा काय परिणाम होतो हे थोड्या-अधिक प्रमाणात बहुतेक सर्वांच्याच अनुभवाचे आहे. आत्मज्ञानी व्यक्तीच्या स्पर्शाचा काय परिणाम होत असेल ! रामकृष्ण परमहंसांनी नरेन्द्राच्या अंगाला पायाच्या अंगठ्याने नुसता स्पर्श केला तो नरेन्द्र कित्येक तास निर्विकल्प समाधीत राहिला. ईव्हाने त्या सिद्दी मुलीला सुद्धा नुसता हात लावल्यावर तिच्या वृत्तीत एकदम पालट झाला ( अंकल टॉम्स केबिन ). तो विषारी नाग पहिल्याने दंश करण्याच्याच बुद्धीने आलेला असणार. पण त्या पवित्र देहाचा स्पर्श होता क्षणीच त्याची बुद्धी निर्वैर झाली, आणि तो साधूच्या सान्निध्यात आनंद मानू लागला, आणि म्हणूनच पुन: पुन्हा येऊ लागला. एका साधुपुरुषाच्या अंगाला स्पर्श करण्याची संधी मिळाली ही सुद्धा त्या नागाच्या गतजन्मातील पुण्याईच असली पाहिजे. त्या स्पर्शाने तो नाग उद्धरून कशावरून गेला नसेल ? असो.

## यात्रेला निघाले – चंद्रभट

एकनाथ परत आल्यावर स्वामींनी त्याला कडकडून आलिंगन दिले. "तुझे जीवन कृतार्थ झाले," असा आशीर्वाद दिला.

सामान्य माणसांच्या रीतीप्रमाणे आणि शिष्टाचार मोडू नये म्हणून त्याने आता तीर्थयात्रेस जावे असे गुरूने सुचविले. पण एकनाथ गुरुसेवा सोडून जाण्यास तयारच होईना.* तीर्थयात्रा करून अधिक काय मिळणार ? गुरुसेवेत सर्व काही

---

* सद्‌गुरूचे देखिल्या पाय । तहानभूक तत्काळ जाय ।
कल्पना उठोचि न लाहे । निजसुख आहे गुरुचरणी ।।

ग्रं. क्र. १४४८८



मिळते, मग गुरुसेवा सोडा कशाला ? एकनाथ म्हणाले की, “ — यात्रेला जायचेच असेल तर गुरुदेवांनीही माझ्या बरोबर तीर्थयात्रेस चलावे आणि आपण जर बरोबर येत असाल तरच मी तीर्थयात्रेस जाण्यास कबूल आहे. ” म्हणजे तीर्थयात्रेबरोबर गुरुसेवा करण्याचा आनंदही मिळाला असता.

शेवटी जनार्दनस्वामींनी आपल्या शिष्याची सेवा आणि योग्यता लक्षात घेऊन काही दिवस तरी त्याच्या बरोबर यात्रेस जाण्याचे कबूल केले आणि शके १४७७ मध्ये गुरुशिष्य तीर्थाटनास देवगिरीहून बाहेर पडले. मजल दरमजल करीत थोड्या दिवसांनी ते नाशिकक्षेत्री पोहोचले आणि तेथून जवळच पंचवटीस आले. ह्याच ठिकाणी हजारो वर्षापूर्वी प्रभू रामचंद्रांनी वसती केली होती. ह्या खेडेगांवी चंद्रभट नावाचा एक ब्राह्मण रहात होता. तो रोज भागवतावर पुराण सांगे. त्याने चतुःश्लोकी भागवत लिहीले होते. त्याच्याच घरी जनार्दनस्वामी आणि एकनाथ यांनी राहाण्याचे ठरविले. त्या दिवशी नित्याप्रमाणे संध्याकाळी चन्द्रभटाचे पुराण झाले. या गुरुशिष्यांनी सुद्धा ते ऐकले. चन्द्रभटाच्या उद्धाराचा क्षण जवळ येत होता. जनार्दनस्वामी आणि एकनाथ आल्यापासून त्या सदाचारी, धर्मनिष्ठ आणि भाविक ब्राह्मणाला घरातील वातावरणात फरक जाणवू लागला. ह्या दोन पाहुण्यांची हालचाल आणि एकंदर वागणूक पाहून त्यांच्याबद्दल चन्द्रभटाला आदर वाटू लागला. त्याच्या आग्रहावरून स्वामींनी आणखी काही दिवस त्याच्या घरी राहण्याचे कबूल केले. चंद्रभटाच्या आयुष्यातील हे दिवस पारमार्थिक आणि मोठ्या आनंदाचे असे ठरले. जनार्दनस्वामींनी पुराण ऐकले त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी हे चतुःश्लोकी भागवत एकनाथाला प्राकृतात लिहिण्यास सांगितले. गुरूंची आज्ञा. एकनाथाने गुरुचरणी लीन होऊन ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला आणि थोडेच दिवसांत तो पूर्ण केला.

नाथांचा हा पहिलाच ग्रंथ आणि पहिलेच लिखाण. तो वाचून गुरुदेव जनार्दनस्वामी अगदी प्रसन्न झाले. गुरूच्या आज्ञेने, गुरुकृपेने आणि गुरूच्या सहवासात लिहिलेला ग्रंथ चांगला झाला यात काय नवल ? तो वाचून चंद्रभट तर इतका तल्लीन झाला, की तो रोज त्याचेच पारायण करू लागला. चंद्रभटाने स्वामींच्या बरोबर जाण्याची परवानगी मागितली आणि राहिलेले आयुष्य त्यांच्याच सेवेत घालविण्याची इच्छा दर्शविली.

नंतर काही दिवसानी तिघेही त्र्यंबकेश्वरी आले तेथे निवृत्तिनाथांच्या समाधीचे आणि ब्रह्मगिरीवर गोदावरीच्या उगमाचे दर्शन घेतले. नंतर सर्वजण परत फिरले. जनार्दनस्वामी आणि चंद्रभट देवगिरीवर परत आले. आणि एकनाथ गुर्वाज्ञेप्रमाणे उत्तर भारतातील तीर्थक्षेत्रांची यात्रा करण्यास निघाले. चंद्रभट इहलोक सोडीपर्यंत जनार्दनस्वामींच्या सेवेतच राहिला. चंद्रभटाची समाधी* देवगिरी

* हल्ली ही समाधी (देवगिरी किल्ल्यावर) कोठेही सापडत नाही.

किल्ल्यावरच आहे. यवनांनी ती उद्ध्वस्त करू नये म्हणून जनार्दनस्वामींनी ती मुसलमानी थाटाची बांधली अर्थात् अजून ती तिथे आहे.

जनार्दनस्वामींच्या पादुकासुद्धा किल्ल्यावर अजून एका गुहेत आहेत. त्या पाहण्याकरिता त्या गुहेत गुढघाभर पाण्यातून जावे लागत असे. हल्ली त्या गुहेत पाणी नाही.

## एकनाथ पैठणला परत आले

एकनाथ लहानपणी आपल्या आजी-आजोबांना वन्दन करून पळून गेल्यानंतर सुमारे पंधरा वर्षांनी एक दिवस एक तरुण बैरागी पैठण गावाच्या बाहेर एका वडाच्या झाडाखाली येऊन उतरला. त्याची अंगकांती दिव्य असून त्याच्या मुखावर परमशांतीचे ओज आणि तेज झळकत होते. तो बैरागी गावात येऊन भिक्षा घेऊन जाई. थोडेच दिवसात एक प्रसंग घडला. चक्रपाणी नित्याप्रमाणे एकनाथाची मार्गप्रतीक्षा करून निराशेने घरी परत येत होते. त्यावेळी एका घरी भिक्षा मागत असलेला हा तरुण वैरागी त्यांच्या दृष्टीस पडला. हातात त्रिशूळ, कमंडलू आणि चिमटा असून सर्वांगाला भस्म चर्चिलेले होते. एकनाथांनी आपल्या शरीरावरच्या मायेचे खरोखरीच भस्म केले होते. ते काही केवळ—

**जटिलो मुण्डी लुञ्चितकेशः काषायाम्बरबहुकृतवेषः ।**
**पश्यन्नपि च न पश्यति मूढ उदरनिमित्तं बहुकृतवेषः ।।**

असे वेषधारी वैरागी नव्हते.

या तरुण बैराग्याला पाहताच चक्रपाणींच्या मनात एकदम संशय निर्माण झाला. ते त्याच्याकडे पुनःपुनः निरखून पाहू लागले. त्यांना खात्री वाटू लागली की हा एकनाथच असला पाहिजे. आणि त्यांनी आपल्या पत्नीला बोलावले. त्या माउलीची सुद्धा खात्री झाली. त्या दोघांनी त्याला त्याच्या नावाने हाक मारून अडविले. पण दक्षिण भारतातील यात्रा अजून करावयाच्या राहिल्या होत्या. आणि म्हणून एकनाथांनी जरी आजी-आजोबांना ओळखले होते, तरी ते ओळख दाखवीत नव्हते. घरी जाऊन राहण्यास अजून त्यांची तयारी नव्हती. त्यांची वृत्ती पूर्ण निर्मोह झाली होती. जेथे " विश्वचि माझे घर ' ही दृष्टी आली आहे, तेथे विशिष्ट घराचे काय महत्त्व वाटणार ? त्यांनी आजा-आजीला निक्षून सांगितले की ' गुरु-आज्ञेप्रमाणे दक्षिणभारताची यात्रा प्रथम करणे हेच माझे कर्तव्य आहे. गुर्वाज्ञा हेच सगळ्याचे प्रमाण '. म्हातारे आजोबा या वाक्याचीच वाट पहात होते. जनार्दनस्वामींचे पत्र ते नेहमी बरोबर घेऊनच असत. न जाणो एकनाथ कसा आणि कुठे भेटेल, काय सांगावे ? एकनाथांनी गुरु-आज्ञेचे प्रमाण सांगितल्याबरोबर

आजोबांनी गुरू जनार्दन स्वामींचे पत्र त्यांच्या हाती दिले. मग काय विचारता ? सगळेच गाडे फिरले. ते पत्र शिरसावंद्य मानून एकनाथ ज्या जागी पत्र मिळाले त्याच जागी उभे राहिले. गुर्वाज्ञेप्रमाणे आजोबा-आजींच्या चरणावर मस्तक ठेवून आयुष्य-भर त्यांची सेवा करण्यास उत्सुक झाले. ज्या जागी पत्र मिळाले तीच जागा पवित्र समजून तेथेच राहाण्याचे ठरविले. हळूहळू त्या जागी लहानसे घर बांधण्यात आले आणि कालांतराने त्याच जागी एकनाथांचा वाडाही बांधला गेला.

सकाळी प्रात:स्मरण करून स्नानसंध्या झाल्यावर पूजा आणि ध्यान करावे, माध्यान्हस्नान झाल्यावर मग जेवण, दुपारी पुराण सांगावे, संध्याकाळी पुन्हा स्नान संध्या व जेवण, आणि रात्री रामायण, कृष्णचरित्र किंवा अशा तऱ्हेची चरित्रे वाचावीत. कधी कधी कीर्तन करावे. रात्री निजण्यापूर्वी आजी-आजोबांचे पाय चेपावेत. अशा तऱ्हेने रोजचा जीवनक्रम सुरू झाला. एकनाथांच्या सच्चरित्राची महती सगळीकडे पसरू लागली

## एकनाथांचा विवाह

म्हाताऱ्या आजी–आजोबांचे बरेच वय झाले होते. त्यांच्या मनांत तर होतेच, पण शिवाय गुरुदेव जनार्दनस्वामींची आज्ञा असल्यामुळे एकनाथ लग्न करण्यास तयार झाले. ह्याच सुमारास विजापूरला* श्रीधरपंत नावाचा एक सच्छिल आणि श्रीमान ब्राह्मण रहात असे. त्याची कन्या उपवर झाली असून तो योग्य स्थळ पाहा-ण्याच्या विचारात होता. एक दिवस त्याला असा दृष्टांत झाला की तू तुझी कन्या एकनाथ नावाचा सत्त्वशील तरुण ब्राह्मण पैठणक्षेत्री आहे त्यास द्यावीस. ह्या आदेशाप्रमाणे तो एक दिवस पैठणगावी आला. दुपारी तो इतर काही लोकांच्या बरोबर एकनाथांचे पुराण ऐकण्यास आला. पुराण ऐकून त्याला समाधान वाटले. त्याने चौकशी करता हे पुराणिकबुवा म्हणजेच एकनाथ हे कळल्यावर तर त्याला अतिशय आनंद झाला, आणि त्याने आपल्या मनाने एकनाथाला मुलगी देण्याचे ठरविले. चक्रपाणींजवळ त्याने आपली इच्छा प्रगट केली आणि त्याना झालेल्या दृष्टांताची हकीगतसुद्धा सांगितली. त्याची सुलक्षणी, सुलोचनी, सुकुमार आणि सुशील मुलगी चक्रपाणींच्या मनात एकदम भरली, आणि पत्रिकेप्रमाणे सुद्धा छत्तीस गुण जमले. पण एकनाथ लगेच संमती देईनात, ते म्हणाले की, ‘ जसा श्रीधरपंतांना दृष्टांत झाला तसा जर मला झाला तरच मला कबूल आहे.ψ ’ असो.

* गिरिजाबाई विजापूरची नसून वैजापूरची होती. (प्रा. बेलसरे–प्रसाद ऑगस्ट १९६५).

ψ ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत आणि आईचे वडील यांना पण असाच दृष्टांत झाला आणि मगच त्यांचे लग्न झाले. दोन्ही घटनांत किती विलक्षण साम्य !

त्या रात्री एकनाथांना पण होकारार्थी दृष्टांत झाला, आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी विवाह करण्यास मान्यता दिली. त्यांचा होकार मिळाल्यावर श्रीधरपंतांस साहजिकच फार आनंद झाला आणि ते विजापूरास लग्नाची तयारी करण्याकरिता परतले. आपल्या एकुलत्या एका मुलीला इतका सत्त्वशील आणि विद्वान योग्य वर मिळाला हे पाहून आई-वडिलांना परमानन्द झाला, ह्यात काय नवल ! ते चांगले सधन होते. त्यांनी सालंकृत कन्यादान करावयाचे ठरविले. चक्रपाणीसुद्धा घरचे सुखी होते. चक्रपाणींचा एक लांबचा, उद्धव नावाचा नातेवाईक विजापूरास रहात असे. त्याला त्यांनी लग्नाच्या निमित्ताने बोलावून घेतले आणि नंतरही त्यांनी एकनाथांच्या जवळ राहावे अशी त्यांची इच्छा होती आणि त्याप्रमाणे उद्धव राहिलाही. साधूचा सहवास कोणाला सोडावासा वाटणार ?

काही दिवसांनी सुमुहूर्तावर पैठण गावी एकनाथांचा विवाह-समारंभ आनंदात पार पडला. आणि त्यांच्या गृहस्थाश्रमी जीवनाला सुरवात झाली. एकनाथांना किती योग्य सहचारिणी मिळाली हे आपल्याला पुढच्या अनेक प्रसंगांवरून समजेलच. खरोखरी विश्वशक्तीने जमवून आणलेला हा पुरुष प्रकृतीचा, शिव-शक्तीचा जोडा होता. "विवेक आणि शांती यांचे ऐक्य झाले" (पांगारकर). आत्मदर्शन झालेले एकनाथ यथार्थ दृष्टीने पुराणपुरुषच होते. मुलीचे नाव गिरिजा असे ठेवले. किती योग्य नाव ! मुलीच्या आई-वडिलांनी परत जाताना आपल्या मुलीला जो थोडासा उपदेश केला, तो गोड उपदेश ऐकण्यासारखा आहे--

> **अभ्युत्थानमुपागते गृहपतौ तद्भाषणे नम्रता**
> **तत्पादार्पितदृष्टिरासनविधौ तस्योपचर्या स्वयम् ।**
> **सुप्ते तत्र शयीत तत्प्रथमतो जह्याच्च शय्यामिति**
> **प्रोच्चैः पुत्रि निवेदितः कुलवधूसिद्धान्तधर्मागमः ।।**

## एकनाथांचा गृहस्थाश्रम-दिनचर्या

गृहलक्ष्मी गिरिजाबाई घरात आल्यापासून एकनाथांच्या गृहस्थाश्रमी जीवनाला सुरवात झाली. खऱ्या गृहस्थाश्रमी पुरुषाची जबाबदारी त्यांनी कशी व्यवस्थित पार पाडली ते पुढील अनेक प्रसंगांवरून लक्षात येईलच. ज्याचा ब्रह्मचर्याश्रम योग्य रीतीने पार पडला असेल तोच पुरुष गृहस्थाश्रम व्यवस्थितपणे घालवू शकतो. गृहस्थाश्रम इतर तीनही आश्रमांचा आधार आहे. गृहस्थाश्रमी माणसे नसतील तर मधुकऱ्याला आणि संन्याशाला अन्नदान कोण करील ? ह्या आश्रमात त्यागवृत्ती आणण्याची संधी मिळते. 'काम' आणि 'अर्थ' यांना 'धर्मा'च्या बंधनात ठेवून त्यांचा योग्य उपभोग घ्यायला इथेच शिकावयाचे असते. आपले धार्मिक आणि सामाजिक



जनार्दनस्वामी ज्या देवळात (देवगिरीच्या किल्ल्यात) ध्यानस्थ बसत असत त्या देवळातील गणपतीची मूर्ती [पान १८]

☆ ☆ ☆ ☆



दौलताबादच्या किल्ल्यावरील जनार्दनस्वामीच्या पादुका

[ पान २२ ]



दौलताबादच्या किल्ल्यावरील महालाचा फोटो
[ पान १८ ]

☆



एकनाथ महाराजांच्या वाड्यात
जाण्याचा दरवाजा [ पान २३ ]

ऋण फेडण्याची इथेच सोय असते. प्रकृतीच्या साहाय्याने द्वैतात सत्कर्म करीत करीत वासनांचा क्षय करून परमार्थाची तयारी इथेच करावयाची असते.

एकनाथांच्या संतवृत्तीची लोकांना जसजशी खात्री पटू लागली, अनुभव येऊ लागला. तसतशी त्यांची कीर्ती दूरवर पसरू लागली. त्याचबरोबर लोकसंग्रहही वाढू लागला. त्यांच्या पुराणश्रवणास सर्व जातीचे लोक मोठ्या संख्येने येऊ लागले. त्यांची संकीर्तने तर प्रसिद्धच झाली. रामकृष्ण-चरित्र-श्रवणास सुद्धा गर्दी होत असे. ह्या सगळ्या बरोबर अर्थप्राप्ती सुद्धा खूप होत असे. ही सर्व बाह्य गोष्ट आहे. पण हे सर्व द्रव्य ईश्वराचे आहे, केवळ संग्रह करण्यासाठी ते नव्हे, अशी बुद्धी असल्यामुळे ते सर्व खर्च होत असे. 'अतिथिदेवो भव' या न्यायाने कोणीही विन्मुख गेला नाही. कोणीही केव्हाही येवो, त्याला अन्न मिळाले नाही असे कधीच झाले नाही. त्यांच्या घरी सदावर्ते होत. त्यांना कधीही काहीही कमी पडले नाही. इतकेच काय, पण त्यांच्या घरी दररोज पुरणावरणाचे जेवण असे, आणि ब्राह्मण-अतिथी जेवून, संतुष्ट होऊन, आशीर्वाद देऊन जात असत. अशी सात्त्विक प्रसिद्धी ह्या जगात कोणाला कशी पाहवणार ? त्यांच्याच गावात त्यांचा द्वेष करणारा एक गट निर्माण झाला, आणि हे कुटाळ लोक एका कट्ट्यावर बसून ह्या साधुपुरुषाची निंदा करीत, आणि फजिती करण्याच्या संधीची वाट पाहात. जिथे गाव तिथे महारवाडा असणारच. पैठण गावात एका पिंपळाला पार आहे, तिथे हे लोक बसत, म्हणून त्या पाराला कुटाळकट्टा म्हणत. हे कुटाळक्या करणारे बहुतेक सर्व विद्वान्, ब्राह्मण, पंडितच होते. त्यांना विद्वत्ता होती, पण ती मुरली नव्हती, म्हणून तिचे रूपांतर आचरणात होत नव्हते. ह्याच गावी, अशाच रीतीने, असल्याच लोकांनी असल्याच ब्रह्मज्ञानी चार भावंडांना नव्हते का छळले ? तीर्थक्षेत्रात राहणाऱ्या विद्वान् लोकांचे काय हे आचरण ! या कुटाळ लोकांनी काय काय प्रयत्न केले आणि ते विश्वशक्तीपुढे कसे विफल ठरले हे पुढे दिसेलच. एकनाथांचा गृहस्थाश्रम म्हणजे परमार्थच होता. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे

**"ओळखिला हरी, धन्य तो संसारी, मोक्ष त्याचे घरी, सिद्धीसहित ॥**

ज्या माणसाच्या जीवनाला गुरुकृपेचा आशीर्वाद आहे, आणि ईशशक्तीचे संरक्षण आहे, त्याला अपाय आणि त्याच्यावर आघात कोण करू शकणार ? देव तारी त्याला कोण मारी ! खऱ्या अर्थाने गृहस्थाश्रमाचे जीवन चालवणाऱ्या व्यक्तीच्या आयुष्यातील काही विशेप प्रसंगांचे आता आपण अवलोकन करू.

## गोकुळाष्टमीचा उत्सव

नाथांचा गृहस्थाश्रम सुरू झाल्यावर एक-दोन वर्षांतच गोकुळाष्टमीचा उत्सव मोठ्या थाटाने करावा अशी त्यांना इच्छा झाली. ह्या उत्सवाकरता पांडु-

रंगाची मूर्ती असणे जरूर होते. तरी ती कशी व कोठून आणावी या विचारात नाथमहाराज होते.

एक दिवस केरळ प्रांतातला एक धनाढ्य गृहस्थ पांडुरंगाची मूर्ती घेऊन नाथांच्या घरी आला. त्याने विठ्ठल-रखुमाईच्या सुंदर मूर्ती करविल्या होत्या. त्याच्या मनात एक देऊळ बांधून तेथे त्या मूर्ती स्थापन करावयाच्या होत्या. पण एक दिवस त्याला असा दृष्टांत झाला की नाथमहाराज पैठणला गोकुळाष्टमीचा उत्सव करणार आहेत. तरी त्यांनाच या मूर्ती नेऊन द्याव्या. म्हणून तो त्या घेऊन आला होता. हा वृत्तांत ऐकून नाथांनाही फार आनंद झाला. त्या मूर्ती त्यांनी आपल्या घरातच ठेवून घेतल्या आणि नंतर त्यांची गुरुदेव जनार्दनस्वामींच्या हस्ते स्थापना केली. त्या उत्सवाकरिता जनार्दनस्वामींना बोलवावे म्हणून देवगिरीला योग्य प्रकारे आमंत्रण पाठविले. जनार्दनस्वामींनाही फार आनंद झाला आणि आपल्या आत्मज्ञानी शिष्याचे वैभव पाहाण्यात त्यांना हौस आणि कौतुक वाटले.

जनार्दनस्वामी पैठणला येत आहेत ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि सर्व लोकांचा उत्साह दुणावला. त्यावेळचे किल्लेदार ते ! आपल्या लव्याजम्यासह ते पैठणला आले. ते जो वाड्याजवळ येतात तो तेथला चमत्कार पाहून आपल्या शिष्याबद्दल त्यांनी उद्‌गार काढले, "धन्य धन्य तुझी एकनाथा !" नाथांच्या घराच्या देवडीवर गुरुदेव दत्तात्रेय स्वतः हातात त्रिशूळ घेऊन पहारा करीत असत. जनार्दनस्वामी आल्याची बातमी महाराजांना त्यांनी लगेच कळविली. नाथांनी सामोरे जाऊन गुरुदेवांच्या चरणावर मस्तक ठेवले, आणि त्यांना आत आणून आसनावर बसविले. आजोबा आणि आजी गुरूंचा योग्य मानसन्मान ठेवावयास हजर होतीच. जनार्दनस्वामींना मूर्तीची सर्व हकीगत ऐकून आश्चर्य, आनंद आणि समाधान वाटले. त्यांच्याच हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि स्थापना केली. अशा रीतीने मोठ्या आनंदात आणि उत्साहात गोकुळाष्टमीचा सण पार पडला. नंतर सर्वांना आशीर्वाद देऊन जनार्दनस्वामी देवगिरी गडावर परत गेले.

## आजी–आजोबा गेले

ह्यानंतर थोड्याच काळात आपल्या नातवाचे सर्व वैभव पाहून आजोबा आणि आजीने मोठ्या समाधानात इहलोकीची यात्रा संपविली.

मनुष्य मरण्यापूर्वी त्याच्या मनात काय विचार येतात आणि त्याचा काय परिणाम होतो हे कधीच कुणाला कळणे शक्य नाही. मनुष्याने एखाद्या दिवशी जर दुष्कृत्य केले तर त्याला त्या रात्री शांत झोपसुद्धा लागत नाही. काही डॉक्टरांचे म्हणणे आहे की मनुष्याच्या मनाची स्थिती झोप येण्यापूर्वी जशी असते, तशीच मृत्यूपूर्वीही असते. पण हे केवळ अनुमान आहे. आपण पुन्हा जागे होणार नाही

याची कल्पना असल्यावर मनाची काय स्थिती होत असेल ? पण एक गोष्ट निर्विवाद आहे की, ज्या माणसाला काळजी कमी आणि समाधान जास्त तो मनुष्य मनाने अधिक सुखी असतो. चक्रपाणी एका भक्ताचे चिरंजीव आणि दुसऱ्या ब्रह्मज्ञानी भक्ताचे आजोबा. दोघांचेही वैभव प्रत्यक्ष पाहिलेले, सगळे जीवन सदाचरणात घालविलेले, केवढे समाधान असेल ! अशा मनुष्याला मृत्युसमयी कशा यातना होणार ? पण असा मनुष्य निरिच्छ असेल असे मात्र नाही. उलट सर्व सुखे मिळाल्यामुळे तीच मिळत राहावीत असेच वाटण्याचा अधिक संभव. म्हणजे वासना राहिल्याच. पुनर्जन्म जर खरा असेल, आणि विचार केला तर खरा मानावाच लागतो, तर मृत्यूपूर्वी अगदी निरिच्छ स्थिती असणे अत्यंत आवश्यक आहे. पुनर्जन्म टाळण्याकरता केवळ शांत आणि समाधानी वृत्ती पुरणार नाही. वासनारहीतच झाले पाहिजे. मनुष्य निरिच्छ असताना गेला तर त्याच्या पिंडाला कावळा ताबडतोब स्पर्श करतो याचा तरी दुसरा काय अर्थ आहे ? पण ह्याची प्रचीती मात्र येते. मरण्यापूर्वी मनुष्य खरोखरीच निरिच्छ होता की नव्हता हे कळणे मात्र अशक्यच आहे.

कावळ्याने पिंडाला स्पर्श करण्याबद्दल निरनिराळे तर्क आहेत. एका मताप्रमाणे देहावसान झालेल्या मनुष्याच्या वासना जर अतृप्त असतील तर त्याचा वासनादेह त्या पिंडाभोवती हजर असतो. जो कावळा त्या पिंडातला भात खाण्याकरता येतो तो त्या वासनादेहाला घाबरून पिंडाला स्पर्श करीत नाही. वासना तृप्त झालेल्या असतील तर त्याच्या नावाचा पिंड पवित्र असतो, आणि कावळ्याला त्याची भिती वाटत नाही.

दुसऱ्या मताप्रमाणे जो जीव कावळ्याच्या योनीत असून त्याची उद्धरून जाण्याची वेळ आली असेल तोच कावळा स्पर्श करतो. जे कावळे तिथे असतील त्यांच्यापैकी एकाचीही उद्धरून जाण्याची वेळ आली नसेल किंवा तो पिंड जर पवित्र नसेल तर तो स्पर्श करीत नाही.

तिसऱ्या मताप्रमाणे तो वासनादेह त्याच्या नावाने ठेवलेल्या पिंडाचे ग्रहण करतो. मग ते केवळ अन्न म्हणून राहाते. आणि कावळा ते खावयास भीत नाही पण त्या सूक्ष्म देहाच्या वासना जर शिल्लक असतील तर अर्पण केलेला पिंड तो स्वीकारीत नाही, आणि त्यामुळे कावळा त्याला स्पर्श करावयास धजत नाही.

## श्रीखंड्या आला

एक दिवस वैश्वदेव, ब्रह्मयज्ञ वगैरे आटोपल्यावर नाथमहाराज काकवली टाकण्याकरता बाहेर गेले. सर्व दृष्टीने महाराज जरी या सर्व कर्माच्या अतीत होते,

तरी त्यांनी अजून चतुर्थाश्रम स्वीकारला नव्हता. आणि म्हणून ते ' वर्णाश्रमविहित कर्म करणे हा प्रथम धर्म ' असे मानीत असत. स्वत: भगवान् नाही का म्हणाले, "यद्यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरो जनः ।" ते बाहेर येतात तोच त्यांची वाट पहात एक ब्राह्मण बाहेर उभा असलेला त्यांना दिसला. नाथांनी लगेच त्याला भोजना-करिता आत येण्याची विनंती केली. पण तो ब्राह्मण येईना. त्याने सांगितले की काम केल्याशिवाय तो कोठेही अन्न घेत नाही. तरी नाथांची सेवा करण्याची पर-वानगी असेल तरच तो जेवावयास येईल. नाथांनी विचारल्यावरून त्या ब्राह्मणाने सांगितले की तो द्वारकेचा राहणारा, आणि त्याचे नाव श्रीखंड्या. नाथांची कीर्ती ऐकून तो असाच फिरत फिरत त्यांची सेवा करण्याच्या उद्देशाने आला होता. तो म्हणाला की "तुमची सर्व सेवा मी करीन. पूजेची तयारी, गंध उगाळणे, पाणी भरणे, एवढेच काय पण उष्टी सुद्धा काढीन." नाथांनी विचारले की, "उष्टी का म्हणून काढणार ?" त्यावर तो म्हणाला, उष्टी काढण्याची मला फार दिवसापासून सवय आहे." अशी थोडी चर्चा झाल्यावर तो ब्राह्मण घरात आला आणि त्या दिवसापासून नाथांची सेवा करीत तो तेथे बरीच वर्षे राहिला.

नाथांची जीवनयात्रा सुरळीत चालली होती. पतिव्रता गिरिजाबाई घरातील सर्व सांभाळी आणि बाहेरच्या संपूर्ण कामाची व्यवस्था उद्धव ठेवी. ह्यात आता आणखी श्रीखंड्याची भर पडली. राहिलेले सर्व काम हाच पाहू लागला. तेव्हा-पासून तर घरात सदा शांती आणि सदानंदच नांदू लागला. नाथांना आता चोवीस तास वेळ परमार्थात घालवण्याकरिता मिळू लागला. श्रीखंड्या कोण होता हे पुढे कळेलच. प्रारब्ध सुखरूप चालावे म्हणून प्रारब्धाने गिरिजाबाई आणि उद्धव यांची गाठ घालून दिली होती. त्याच दृष्टीने नाथांचे पारमार्थिक जीवन व्यत्यय न येता नीट चालावे म्हणून विश्वशक्तीने श्रीखंड्याची योजना केली होती. आश्चर्य हे की शेवटपर्यन्त श्रीखंड्या कोण आहे हे नाथमहाराज ओळखू शकले नाहीत. काही झाले तरी एकनाथ महाराज म्हणजे उत्क्रांत दशेला पोहोचलेला परन्तु मानवदेहच आणि श्रीखंड्या ही मानवदेहरूपाने वावरणारी ईशशक्ती. एकनाथांच्या देहाला प्रारब्धगती होती. श्रीखंड्याचा देह प्रारब्धरहीत होता. तो मुळी देह नव्हताच. म्हणून ओळखली न जाता ती शक्ती श्रीखंड्याच्या रूपाने राहू शकली. असो !

नाथांना तीन मुले झाली. थोरली मुलगी गोदाबाई, दुसरा मुलगा हरी आणि तिसरी मुलगी लग्न झाल्यावर कर्नाटकात राहाण्यास गेली. गोदाबाईचा मुलगा लहानपणी मुका होता. नाथांच्या कृपेने तो पुढे बोलू लागला, आणि मुक्तेश्वर या नावाने कवी म्हणून प्रसिद्ध झाला. हरी शिकून विद्वान पंडित झाला. आणि नाथांची थोरवी कळल्यावर त्यांच्या चरणी लीन होऊन ज्ञानी झाला.

एकनाथ महाराजांनी ईशशक्ती आपली करून घेतली होती. म्हणूनच म्हणतात—

**ज्या घरी हरिचा कर आहे । त्या घरी हरि चाकर आहे ।।**
**ज्या घरी हरिचा कर नाही । त्या घरी हरि चाकर नाही ।।**

## कृष्णदास लोळे

एकनाथांचा होत असलेला उत्कर्ष आणि लोकसंग्रह कुटाळ लोकांना सहन होईना. कृष्णदास लोळे नावाचा विद्वान ब्राह्मण एक दिवस पैठण क्षेत्री आला. त्याच्यावर सरस्वतीदेवीची कृपा झाली होती. त्यामुळे रामायण, कृष्णचरित्र, आणि अशाच तऱ्हेची प्रासादिक चरित्रे तो मोठ्या आकर्षक काव्यमय भाषेत सांगत असे. ही त्याची सिद्धी कळल्यावर त्या कुटाळ लोकांनी त्याला आपल्या हाती धरले. एकनाथांचा नक्षा उतरविण्याची ही संधी चांगली आहे असे त्यांना वाटू लागले. कृष्णदासाला त्यांनी सांगितले की तू इथे या वाड्यासमोर कीर्तन-प्रवचन करीत जा. आम्ही तुझी सर्व व्यवस्था करू. त्या ब्राह्मणाने द्रव्याच्या आशेने यात वावगे काहीच नाही असे समजून अधिक चौकशी न करता त्यांची सूचना मान्य केली. सुरुवातीला काही दिवस नावीन्य म्हणून लोक जमत असत, पण नंतर ते पुन्हा नाथांच्याच प्रवचनास जाऊ लागले. कृष्णदासाच्या कीर्तनात माधुर्य, रंजकता आणि विद्वत्ता भरपूर असे. त्याला सरस्वतीचा आशीर्वादच होता. पण त्याची बुद्धी गुरुकृपेविना खऱ्या अर्थाने विनम्र झाली नव्हती. त्याच्या बोलण्यात अहंकाराची छटा नेहमी डोकावत असे. म्हणून चातुर्य आणि विद्वत्ता असूनही भावनेच्या अभावी त्याच्या कीर्तनाचे आकर्षण कमी-कमी होऊ लागले. आपल्या कीर्तनाला लोक का येत नाहीत आणि हा एकनाथ आहे तरी कोण याची त्याने चौकशी केली. खरी माहिती मिळाल्यावर या कुटाळ लोकांचा हेतू त्याच्या लक्षात आला. त्याची मूळची सद्वृत्ती जागृत झाली. एकनाथांची योग्यता आणि अधिकार त्याला समजला आणि तो स्वतः त्यांना शरण गेला.

कृष्णदास रामायण लिहीत होते. एकदिवस त्यांना असा दृष्टान्त झाला की त्यांना इहलोक लवकरच म्हणजे दुसऱ्याच दिवशी सोडावा लागणार आहे. हे लक्षात आल्यावर त्यांना फार वाईट वाटले. कारण रामायण पूर्ण होईपर्यंत तरी जगावे अशी त्यांची फार इच्छा होती. ते नाथमहाराजांकडे गेले, आणि त्यांना सर्व हकीगत सांगितली. नाथ म्हणाले, " बरे तर ! तुम्ही रामायण लिहीत राहा. हे रामायण संपायला जे अकरा दिवस लागणार आहेत, तितके दिवस तुम्ही रामाच्या कृपेने जगाल. निर्धास्त असा." कृष्णदासांना मृत्यू येण्याच्या वेळी नाथमहाराज त्यांच्या

घरी गेले आणि त्यांना रामायण लिहीत बसण्यास सांगितले. नेमलेल्या वेळी यमदूत आले, पण संतश्रेष्ठ एकनाथ–ज्यांना ' कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् ' अशा विश्वशक्तीचे संरक्षण मिळाले होते–याना पाहून त्या उग्र यमदूतांना सुद्धा कृष्णदासांना घेऊन जाण्याचे धाडस होईना.

कृष्णदास अकरा दिवस जगले. एकनाथ कोण आहेत हे त्यांना पूर्णपणे समजले. अकरा दिवसांनी रामायण पूर्ण लिहून झाल्यावर लगेच मृत्यूने त्यांना ताब्यात घेतले. साधू सदाच निर्वैर असतात, आणि म्हणून दयाळू असतात. एकनाथांनी कृष्णदासावर कृपा केली, आणि शरण आलेल्या जीवाला शान्त केले. झाले, सगळाच डाव फसला, आणि कुटाळकट्टा तोंडघशी पडला.

समर्थ रामदासांच्या आयुष्यात अशाच तऱ्हेचा एक प्रसंग घडला. त्यांच्या शिष्यांपैकी एकजण भिक्षा मागावयास गेलेला असताना त्याने एका घरासमोर

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळी कोण आहे ।।**
**जयाची लिला वर्णिती लोक तिन्ही ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।**

हा श्लोक म्हटला. त्या घरात वाक्‌सिद्धी प्राप्त झालेला एक गर्विष्ठ गृहस्थ राहात असे. त्याने हा श्लोक ऐकताच त्याला कमीपणा वाटला. तो त्या शिष्याला म्हणाला, " समर्थाचा सेवक काय करणार आहे ? समर्थ का त्याला वाचवणार आहेत ? मी तुला शाप देतो की तू उद्या संध्याकाळी मरशील. तुझे समर्थ आता काय करतात ते तरी पाहू ! त्या बिचाऱ्या शिष्याला काहीच उलगडा होईना. आपण भिक्षा काय मागितली आणि हा गृहस्थ आपल्याला विनाकारण शाप काय देतो ! शेजारपाजारच्या माणसांनी सांगितले की ह्या माणसाला वाक्‌सिद्धी आहे. त्याने आता म्हटल्याप्रमाणे तू उद्या संध्याकाळी खास मरशील. ह्या देहाचा मृत्यू कुणाला पाहिजे असतो ? तो शिष्य घाबरला आणि त्याने ती सर्व हकीगत रामदासांना सांगितली. रामाचे दासच ते ! श्रीराम त्यांच्यासाठी काय करणार नाही ? रामदास त्या शिष्याला म्हणाले, " काही हरकत नाही. उद्या दुपारपासून तू माझे पाय चेपीत बैस, आणि काही झाले तरी मी ज्या चटईवर निजलो असेन त्यावरून उठू नकोस आणि माझे पाय सोडू नकोस. " त्याला जरा धीर वाटला पण बिचारा अजूनही घाबरत होता. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी समर्थांनी सांगितल्याप्रमाणे तो त्यांचे पाय चेपीत बसला. ठरलेल्या वेळी यमदूत त्याला नेण्यासाठी आले, पण तो जोपर्यंत ईशशक्तीच्या सान्निध्यात होता तोपर्यंत ते यमाचे दूतसुद्धा त्याला हात लावू शकेनात. ते दूत त्याला निरनिराळ्या प्रकारे बोलावीत होते, पण तो त्यांना म्हणाला तुम्हीच जवळ या. नामस्मरण हे सुद्धा विश्वशक्तीचे एक प्रकारचे सान्नि-

ध्यच आहे. म्हणूनच महाराज म्हणतात, 'हरि मुखी गाता हरपली चिंता।' असो. यमदूताचा आणि त्या शिष्याचा बराच वाद झाला. पण त्यांच्या निरनिराळ्या आमिषांना भुलून त्याने पाय सोडले नाहीत. शेवटी ठरलेली वेळ चुकली आणि मृत्यू टळला.

दुसऱ्या दिवशी सकाळी नित्याप्रमाणे तो शिष्य त्याच माणसाच्या घरी भिक्षा मागण्यासाठी गेला. तो मनुष्य चकितच झाला! असे काहीतरी घडल्याशिवाय गर्विष्ठ माणसाचे डोळे उघडत नाहीत. त्या माणसाच्या उद्धाराचा काळ जवळ आला होता. सिद्धी सुद्धा संतांच्या पुढे टिकाव धरू शकत नाही हे त्याला कळले. सिद्धी जर ईशशक्तीपासून निर्माण झालेली आहे, तर ज्याने ईशशक्तीच आपलीशी करून घेतली त्याच्यापुढे सिद्धीचे काय चालणार? असो. तो मनुष्य रामदासस्वामीना शरण गेला आणि कृतार्थ झाला.

मार्कंडेयाच्या चरित्रावरून आपण हेच शिकतो. जोपर्यंत भक्तीने आपण ईशशक्तीच्या सान्निध्यात वावरत असतो तोपर्यंत अन्य कोणतीही शक्ती आपल्यावर आघात करू शकत नाही. आणि असे म्हणतात की आपण जो वेळ नामस्मरणात किंवा ईशपूजनात घालवतो तो आपल्या आयुष्यातील म्हणून गणला जात नाही. आपले आयुष्य तेवढ्या काळाने वाढते. व्यावहारिक मानसशास्त्राच्या दृष्टीनेही आपल्याला हे खरे मानावे लागते, कारण नामस्मरणात किंवा ईशपूजनात जेवढा वेळ जातो तेवढा वेळ आपले मन शांत असते. जेवढे मन अधिक शांत राहील तेवढा प्रकृतीवर जास्त चांगला परिणाम होतो. मनस्ताप असलेल्या माणसांच्या स्वभावावर आणि प्रकृतीवर कसा परिणाम होतो ते आपल्याला माहीत आहेच. तावाताव करणाऱ्या माणसाला ब्लडप्रेशरसारखे रोग होतात हे प्रसिद्धच आहे. इतकेच काय, पण कॅन्सरसारखे भयंकर रोगसुद्धा काही अंशी मनाच्या ठेवणीवर अवलंबून आहेत असा काही तज्ज्ञांचा कल होऊ लागला आहे. पोटातील 'अल्सर' सुद्धा मन शांत झाल्यावर बरे होते. एक प्रख्यात उदाहरण श्रीमान् रॉकफेलर यांचेच आहे. वयाच्या साठ वर्षांपर्यंत त्यांनी धडपड करून कोटयवधी डॉलर्स मिळविले. पण पोटात अल्सर झाले. काहीही खाता-पिता येईना, आणि ते मरणोन्मुख पडले. डॉक्टरांनी सांगितले की जगावयाची इच्छा असेल तर त्याग करा, दान करा, म्हणजे मन शांत होईल. झाले! मिळविलेल्या कोटयवधी डॉलर्सचे त्यांनी दान केले. गरिबांना, विद्यार्थ्यांना, शाळांना, दवाखान्यांना वगैरे मदत करण्यात पैसा ओतला. पोटातील अल्सर खडखडीत बरा झाला. सुदृढ प्रकृतीने वयाच्या नव्वदाव्या वर्षापर्यंत जगून त्यांनी शांतीने देह ठेवला. त्यांनी एकंदर १,२००,०००,००० रुपये धर्मादाय म्हणून दिले.

संतांच्या सान्निध्यात मृत्यूसुद्धा परत फिरतो. मग शत्रूची काय कथा! तुकाराम महाराजांचे कीर्तन ऐकण्याकरिता एकदा शिवाजीमहाराज बसले होते.

औरंगजेबाचे सैन्य सारखे पाळतीवर होतेच. त्यांना ही बातमी मिळाली. लगेच सैन्याची एक तुकडी शिवाजीमहाराजांना गिरफदार करण्यासाठी मंडपात घुसली. तुकाराममहाराजांनी सर्वांना जोरात भजन करण्यास सांगितले. भजनाला खूपच जोर चढला आणि काय आश्चर्य ! त्या दांडगाई करणाऱ्या शिपायांना शिवाजी-महाराज कुठले हेच ओळखेना. कारण प्रत्येकजणच त्यांच्यासारखा दिसू लागला. सगळीकडे शिवाजीच शिवाजी ! आणि खरेच आहे, प्रत्येक देहात शिवाजीचा अवतार आहेच ! या गोष्टीला तुम्ही मेस्मेरिझम् म्हणा किंवा काहीही म्हणा, पण हल्लीसुद्धा अशा तऱ्हेच्या गोष्टी घडतात.

एका जादुगारांनी एकदा परदेशात असताना जाहीर केले की आजचा खेळ ९-३० वाजता होईल. परंतु प्रत्यक्ष मात्र त्यांना यावयास उशीर झाला. दहा वाजता ते आल्यावर बसून राहिलेल्या प्रेक्षकांनी आरडा-ओरडा केला. तेव्हा जादूगार म्हणाले, आताच ९-३० वाजले आहेत. पाहिजे तर आपापल्या घड्याळात पाहा. तेव्हा सर्वांना आपापल्या घड्याळात ९-३० च वाजलेले दिसले. सगळीकडे शांतता झाल्यावर जादूगार पुन्हा म्हणाले, "काय वेडे आहात !" अहो खरोखरी आता दहाच वाजले आहेत ! " आता प्रत्येकाला आपल्या घड्याळात दहा वाजलेले दिसले. हाच खेळ, हीच माया ! जे आपल्याला दिसते किंवा वाटते तसेच ते असेल असे नाही. 'शिवप्रिया 'चे फूल पहा—एक चमत्कारच आहे. ते एकदाच रात्री बरोबर बारा वाजता उमलते. त्या वेळी कोणी त्याच्या सौम्य सुगंधावर खुश होतो तर कोणी अप्रतिम शुभ्र रूपावरच मोहून जातो. पण सकाळी पाहावे तर तेच फूल म्हणजे केवळ एक मिटलेली, घाण येणारी कळी होते. मानवजातीवर उपकार करणाऱ्या संतांचे देह सुद्धा हे आत्मतत्त्व गेल्यावर कोमेजून जातात.

**परिमळ गेलिया वोस फूल देही ।**
**आयुष्याशेवटी देह तैसा ।।**

सीतेने जर लक्ष्मणरेषेचे उल्लंघन केले नसते तर रावण तिला नेऊ शकला नसता. पण सीतेला तशी बुद्धी होणारच होती. तिने लक्ष्मणावर अन्यायी आरोप केले होते. साधुपुरुषाचा अवमान केला होता. त्यामुळे तिचे मन शांत नव्हते. तिची लक्ष्मणावरची श्रद्धा उडाली होती. म्हणूनच तिला रेषा ओलांडावयाची बुद्धी झाली.

कोणी असे विचारतील की असे जर आहे तर ज्ञानदेव इतक्या लहानपणी कालवश का झाले ? विश्वशक्तीची इच्छा हेच त्याला उत्तर ! आणि शिवाय काहींच्या मते ते कालवश झालेच नाहीत. ईशशक्तीने नेमलेले कार्य त्यांनी पूर्ण केले आणि हालता-चालता-बोलता देह त्यांनी स्तब्ध केला. तसे नसते तर झाडाच्या मुळीचा वेढा बसल्याचा दृष्टान्त एकनाथांना कसा झाला असता ? मृत देहाला झाडाच्या मुळ्यांचा थोडाच त्रास होणार आहे ! आणि पुन्हा इतके दिवस, म्हणजे

सुमारे साडेतीनशे वर्षे जमिनीत ठेवलेला देह सुस्थितीत कसा राहिला असता? विश्वशक्तीचे हे खेळ अनिर्वचनीय आहेत.

## मुंजीकरिता पैसे

नेहमीप्रमाणे कुटाळकट्ट्यावर बसून कुटाळक्या करीत असलेल्या कंपूला एक दिवस एक गरीब ब्राह्मण नव्यानेच गावात येत आहे असे दिसले. तो जवळ आल्यावर त्यांनी त्याची विचारपूस केली. त्याचा आपल्या मुलाची मुंज करण्याचा बेत होता आणि कोणीतरी द्रव्यसहाय्य करावे म्हणून तो या गावात आला होता. त्याला शे-दीडशे रुपयांची अपेक्षा होती.

शांतीचा पुतळा म्हणून एकनाथांची गावात प्रसिद्धी होती. ती ह्या कुटाळ लोकांना सहन होत नसे. त्यांना वाटले की एकनाथांना छळायला ही संधी बरी आहे. त्यांनी त्या माणसाला सांगितले की तू जर ह्या साधू म्हणवणाऱ्या एकनाथाला राग आणशील तर आम्ही तुला दोनशे रुपये देऊ. द्रव्यलोभाने त्याने ही अट कबूल केली, आणि त्यांनी दाखविलेल्या एकनाथांच्या वाड्याकडे तो आला. त्यावेळी एकनाथ पूजा करीत होते. तो ब्राह्मण जो आला तो एकदम जोडे घालूनच नाथांच्या मांडीवर जाऊन बसला. एकनाथ शांतच होते. त्याच्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले, "बाळाला काय हवे आहे?" तो ब्राह्मण ह्या शांतवृत्तीचा अनुभव घेऊन चकितच झाला. कुटाळकंपूचे लोक डोकावून काय प्रकार घडतो ते पाहातच होते. नाथांचे शब्द ऐकून त्यांना धक्काच बसला. त्या ब्राह्मणाने फार भूक लागल्याचे सांगितले. पूजा होत आली असून नैवेद्याची वेळ झालीच होती. नाथांनी गिरिजाबाईस लवकर आटपण्यास सांगितले, आणि लवकरच पाने मांडून ती मंडळी जेवा-वयासच बसली. गिरिजाबाई खाली वाकून वाढीत असताना ह्या मूर्ख प्राण्याने उडी मारली आणि बाईंच्या पाठीवर बसला. लगेच एकनाथ धर्मपत्नीला म्हणाले, "सांभाळ ग! बाळ पाठीवर बसला आहे, खाली पडेल. त्याला खूप भूक लागली आहे म्हणून तो असे चाळे करतो आहे." काय ही शान्त वृत्ती! आपल्या घरी जर असा एखादा मनुष्य येऊन आचरटासारखा वागला तर आपण काय केले असते याची कल्पनाच करा. गिरिजाबाईंनीही तितक्याच शांतपणे उत्तर दिले, "काही काळजी करू नका. आपल्या हरीला पाठीवर घेऊन वाढण्याची मला सवय आहेच." याला म्हणतात जोडीदारीण! तो ब्राह्मण बिचारा थिजूनच गेला. त्याचा मूर्खपणा त्याला समजला आणि त्याबरोबरच एकनाथांची थोरवीही त्याला उमगली. त्याने लगेच त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांची क्षमा मागितली.

नाथांनी चौकशी केल्यावर त्या ब्राह्मणाने येण्याचे कारण सांगितले. तेव्हा नाथ म्हणाले, "अरे हे मला आधीच का नाही सांगितलेस ? असो. आता मी तुझ्यावर रागावतो." असे म्हणून हातात एक काठी घेऊन रागाचा खोटा आवेश आणीत, आरडा-ओरडा करीत त्याच्या अंगावर धावून गेल्याचा त्यांनी देखावा केला. तो वाड्याच्या बाहेर पळत आला आणि नाथ त्याच्यामागे धावत आरडाओरडा करीत आले. हे दृश्य पाहून कुटाळकंपूला फार आनंद झाला आणि ब्राह्मणाचे काम झाले.

काही चरित्रकार या प्रसंगाचा शेवट असा करतात—ब्राह्मणाने सर्व हकीगत सांगितल्यावर नाथ म्हणाले, "अरे, हे मला आधीच का नाही सांगितलेस ?" आणि त्यांनीच त्याला आवश्यक ती मदत देऊन घरी पाठवून दिला.

'लोभ हा पापाचा बाप' ही म्हण काही खोटी नाही. लोभ नसता तर हा माणूस असा का वागला असता ? लोभामुळेच ही दुर्बुद्धी त्याला झाली.

## चार अतिथी

पावसाळ्याचे दिवस होते. एका रात्री बाहेरगावचे चार ब्राह्मण पैठण गावात आले, आणि कोठे राहण्याची आणि जेवण्याची सोय होईल का, याची चौकशी करू लागले. यावेळीसुद्धा कुटाळकट्ट्यावर काही लोक होतेच. रिकमटेकडेच ते ! त्यांनी नाथांच्या वाड्याकडे बोट दाखवून सांगितले की त्या वाड्यात सदावर्त आहे, तिथे तुमची सोय होईल. ते बिचारे नाथांकडे आले.

नाथांनी लगेच गिरिजाबाईंना स्वयंपाक करण्यास सांगितले. उद्धव लाकडे आणण्यास गेला होता. पण पहातो तो सर्व लाकडे ओली. एकही वाळलेले सापडेना. आता काय करावे ? काय अडचण आहे म्हणून नाथांनी विचारले. उद्धवाने अडचण सांगितली. नाथ म्हणाले, "एवढेच ना ? अरे, पाट फोडून लाकडे करा." काय हा त्याग ! दुसऱ्याला मदत करण्याची संधी मिळाली, त्यापुढे पाटांची काय किंमत ? पाट पुन्हा करता येतील, पण अशी संधी काही पुन्हा मिळणार नाही— जनसेवा हीच ईश्वरसेवा ! दुसऱ्याने आपल्या मदतीचा स्वीकार करणे यालासुद्धा पुण्य लागते. असो. रात्री जेवण झाल्यावर त्या वाटसरूंनी विश्रांती घेतली आणि दुसऱ्या दिवशी ते निघून गेले. कुटाळकट्ट्यावरच्या लोकांची फजिती झाली; ती गप्प बसून सहन करणे भागच होते.

हे चौघेजण ईशप्रेरणेने एकनाथांची सत्त्वपरीक्षा घेण्याकरता तर आले नव्हते ना ? ईशशक्ती केव्हा आणि कुठल्या रूपाने आपली परीक्षा घेईल—अर्थात आपली परीक्षेला बसण्याची पात्रता असेल तरच हा प्रश्न—हे सांगता येणार नाही. म्हणून आपल्यात चाल आहे की, कोठल्याही अतिथीला विन्मुख परत घालवू नये. हा

४००६९ १२५१ चारित्र

विचार मनात येतो तेव्हा हेही लक्षात ठेवले पाहिजे की कालाप्रमाणे पुष्कळच गोष्टी बदलत असतात. हल्लीच्या दिवसांत भीक मागणे आणि भीक मागणाऱ्यांना पैसे देऊन मदत करणे हा सुद्धा कामचुकार लोकांचा धंदा झाला आहे. मुंबईत तर भिकाऱ्यांची संस्था आहे म्हणतात ! त्यात कोणी कुठे आणि कशी भीक मागायची हे सर्व योजून ठरविले जाते. काही व्यापारी लोकांचा, भीक मागण्याकरिता लहान मुले, लुळे-पांगळे आणि आंधळे भाड्याने देण्याचा धंदा आहे. काही वर्षांपूर्वी एक विलक्षण आणि मनाला प्रक्षुब्ध करणारा धंदा उघडकीस आला. काही लोक पाच ते आठ वर्षांच्या मुलांना पळवून नेत. त्यांना पकडून नेऊन आंधळे केले जाई, आणि त्यांच्यावर भीक मागण्याचा धंदा लादला जाई. काय हा क्रूरपणा ! आणि असल्या दुष्टांचे म्हणे तुरुंगात हृदयपरिवर्तन करायचे आणि हलकी शिक्षा द्यावयाची ! भूतदयेचे सागर नाथमहाराज ते सुद्धा म्हणतात

**" अंधापुढे दीप, खरासी चंदन । सर्पासी दुग्धपान करू नये ।। "**

अशा वस्तुस्थितीत खरा अतिथी कोण हे सुद्धा कळणे कठीण. 'अतिथी देवो भव' याच्यावर लोकांचा विश्वास तरी कसा बसावयाचा ? ललिताप्रसाद-सारखे लोक जोपर्यन्त मोकाट सुटले आहेत (केसरी दिवाळी अंक १९६४. शरच्चंद्र गोखले—करपलेल्या कळ्या, पान १३८), तोपर्यंत हे खोटे धंदे चालणारच. पण हे लोक सापडायचे तरी कसे ? समाजाच्या दुबळ्या वृत्तीमुळे आणि राजशासन ढिले असल्यामुळे अशा लोकांना फूस मिळते.

## आधी पिंक थुंकणारा—मग बंदगीबुवा

ज्या रस्त्याने एकनाथमहाराज रोज गोदावरीचे स्नान करण्यास जात असत, त्या रस्त्यावर एका वेश्येचे घर होते. एक दिवस संत एकनाथ स्नान करून परत येत असताना त्या घरातून एका यवनाने विडा खाऊन त्यांच्या अंगावर पिंक थुंकली. संतमहाराज परत नदीवर गेले आणि पुन्हा स्नान करून आले.

दुसऱ्या दिवशी त्या यवनाने दोनवेळा पिंक थुंकली. नाथमहाराज काही एक न बोलता दोन वेळा स्नान करून आले. त्या यवनाने महाराजांना छळावयाचेच ठरविले होते असे दिसते. एक दिवस त्यांच्या अंगावर तो दुष्ट चांडाळ सोळा वेळा थुंकला. संतश्रेष्ठ तर शांततेची मूर्तीच ! ते सोळा वेळा अंघोळ करून आले. तरी-सुद्धा त्या मूर्खाचे डोळे उघडले नाहीत. उघडतील कसे ? कामांध झालेला तो. अती कामुकाला लाजही नसते. तो उलट त्यांच्याच अंगावर खेकसला आणि रागावून म्हणाला, " मी इतके थुंकलो तरी तुम्हाला कसे काहीच हो वाटत नाही ? " ते शांतपणे म्हणाले, " काय वाईट केलेस ! तू तर माझ्यावर उपकार केलेस,

मला इतके वेळा गोदावरीचे स्नान करण्याचे पुण्य मिळवून दिलेस, " त्या उत्तराने तर तो फारच चिडला. त्या यवनाचे तोंड म्हणजे

**' नामावीण मुख सर्पाचे ते बीळ । जिव्हा नव्हे काळसर्पाची तो ।। '**

एक दिवस त्या यवनाने थुंकण्याचा सपाटाच चालविला आणि त्याने आपल्या दुष्टपणाच्या आणि मूर्खपणाच्या कमालीचे प्रदर्शन केले. पण हा दुष्टपणाच त्याच्या उद्धाराला कारण झाला. तो नाथमहाराजांच्या अंगावर एकशेआठ वेळा थुंकला आणि नाथांनी शांतपणे एकशेआठ वेळा अंघोळ केली. पापी चांडाळसुद्धा उद्धरून जातो. तितक्याच तीव्रतेचा पश्चात्ताप मात्र झाला पाहिजे. त्याच्या प्रत्येक थुंकण्या-बरोबर तो आपले पाप थुंकून टाकत होता. आणि संतकृपेने शुद्ध होत होता. नाथांच्या मनात त्यावेळी संत येशू ख्रिस्ताचेच विचार आले असतील नाही का ? ' परमेश्वरा त्यांना क्षमा कर ! ते काय करताहेत ते त्यांना समजत नाही.'

१०८ ही विशिष्ट संख्या आहे. २१,६०० चा २०० वा भाग आणि जपाच्या माळेचीही हीच संख्या. आपण दिवसातून साधारणपणे २१६०० वेळा श्वासोच्छ्वास करतो म्हणून दोनशे माळा जप करावा. १०८ वेळांत त्याने आपले पाप थुंकून टाकले. त्याच्या उद्धाराचा क्षण जवळ आला. त्याच्या कृत्याचा त्याला परमावधीचा पश्चात्ताप झाला. तो माडीवरून झटकन् खाली आला आणि महा-राजांच्या चरणावर मस्तक ठेवून क्षमा मागू लागला. दयाळू-कृपाळू संतच ते. ते ईश्वरी संकेत सुद्धा बदलू शकतात. त्यांनी त्या यवनाला उठविले आणि उपदेश केला. तो त्यांचा परमभक्त झाला. आणि पुढे बंदगीबुवा या नावाने प्रसिद्ध झाला.

काही चरित्रकार एक लहानसा पण मार्मिक संवाद सांगतात. तो यवन जेव्हा नाथांना शरण जाण्याकरिता तातडीने खाली येऊ लागला तेव्हा त्या वेश्येने विचारले की, " आपण आता कधी भेटणार ?" त्यावर त्याने उत्तर दिले, "भेटलोच तर आपली भेट नरकात होईल." असो.

काही काळ गेल्यावर एक दिवस नाथांनी बंदगीबुवाला विचारले की, " तुम्ही जे माझ्या अंगावर इतक्या वेळा थुंकलात ते तुम्हाला मी दिसलो नाही म्हणून, का मुद्दाम थुंकलात ? " तो म्हणाला, " कावळ्याला रात्री दिसत नाही, वटवाघळाला दिवसा दिसत नाही, पण कामी मनुष्याला रात्रंदिवस पहात असूनही दिसत नाही. तो सदा आंधळा असतो."

षड्रिपूंपैकी अहंकार अती बलवान आहे. अहंकार नसेल तर सर्व पापाचे मूळ नाहीसे होईल. मुख्य म्हणजे अहंकार जर गेला तर क्रोध नाहीसा होईल. सुरुवातीला गुरुसेवेने आणि नंतर आत्मज्ञानाने एकनाथ महाराजांचा अहंकार पार नष्ट झाला होता. ' मीच तो ' असा अनुभव आल्यावर मग थुंकणारा आणि ज्याच्यावर थुंकला तो हे, दोघेही जर एकच तर रागवावयाचे कोणावर ? राग असल्यावर संतकार्य

तरी कसे होईल ? परमार्थातले सहा शत्रू--काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर तर पूर्णपणे जिंकलेच पाहिजेत. अहंकार तर गेलाच पाहिजे. अहंकार हा जात, कुल, लोभ, रूप, तप, धन, विद्या आणि अधिकार यांनी बळावतो.

## महादू महाराचे जेवण

एक अंत्यज व त्याची धर्मपत्नी मोठ्या भक्तिभावाने नाथमहाराजांचे पुराण-प्रवचन-कीर्तन ऐकावयास रोज नियमाने जात असत. असा बराच काळ लोटला. एक दिवस त्यांच्या मनात आले की, त्यांच्या घरी नाथमहाराजांनी भोजनास यावे. पण ही विनंती करणार कशी ? आणि हे घडणार तरी कसे ? ही चारशे वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. जेव्हा वर्णाश्रम बंधने हल्लीपेक्षा जास्त दक्षतेने पाळली जात असत, त्यावेळची गोष्ट आहे. पण धीर करून त्याने महाराजांना विचारावयाचे ठरविले. इतक्या मोठ्या ब्राह्मणाशी एका अंत्यजाने धिटाईने बोलणे म्हणजे सुद्धा मोठा उद्धटपणा आणि अपमानकारक वागणे असे त्यावेळी समजत असत.

एक दिवस नाथमहाराज नदीवरून स्नान करून परत येत असताना तो महार मोठ्या अदबीने वाटेच्या बाजूला उभा राहिला. तोंडासमोर उपरणे धरून तो मोठ्या नम्रतेने "महाराजांना एक विनंती करू का" असे विचारू लागला. कुटाळकट्ट्यावरचे सभासद पाळतीवर होतेच. ते सगळ्या अवयवांचे केलेले कान टवकारून काय बोलणे चालले आहे ते ऐकू लागले. त्या महाराने एकनाथमहाराजांना त्या दिवशी भोजनास येण्याची विनंती केली. महाराज म्हणाले, "तुझे मनोरथ पूर्ण होतील." हे उत्तर ऐकून महादू मोठ्या आनंदाने घरी आला, आणि आपल्या पत्नीला उत्तम, सुग्रास अन्न तयार करण्यास सांगितले. तिनेही मोठ्या उत्साहाने पुरणा-वरणाचा स्वच्छ स्वयंपाक केला. त्यांनी महाराजांना अर्पण करण्यासाठी एक उपरणे आणि मुंडासे सुद्धा आणले. 'साधुसंत येती घरा. तोची दिवाळी दसरा.' ह्या मनोवृत्तीने ते दोघेजण महाराजांची वाट पहात बसले. इकडे काय झाले, महाराजांनी महाराला भोजनास येईन म्हणून सांगितल्याची बातमी गावभर पसरली, आणि सगळ्या कुटाळकट्टा-सभासदांनी ठरविले की महाराजांना, वेळ पडली तर दंगामस्ती करून सुद्धा आज जेवायला जाऊ द्यावयाचे नाही. काय ही घमेंड ! ईशशक्तीशी हा जड मानवदेह झगडणार ? आणि तो कसा काय ? हाच तर अहंकार, आणि हीच माया !

सर्व सभासदांनी मिळून महाराजांच्या घरापासून तो थेट त्या महाराच्या घरापर्यंत पहारा करावयाचे ठरविले. आणि लपून बसून सारखी नजर ठेवली. वाईट उद्देशाने का होईना नाथमहाराजांचा स्पर्श झाला असता तर ते कुटाळ लोक

सुद्धा कदाचित् सुधारून उद्धाराच्या मार्गाला लागले असते; पण बिचाऱ्यांचे तेवढे सुद्धा नशीब नव्हते.

ते दोघेजण वाट पहात होते. संध्याकाळपर्यंत जेव्हा महाराज आले नाहीत तेव्हा ते अगदी निराश झाले, आणि विचार करू लागले—आपण एवढे का पापी आहोत, की महाराजांनी कबूल करूनसुद्धा भोजनास येऊ नये. आणि आपण इतके पापी असलो तर जगण्यात तरी काय अर्थ आहे ? असा विचार करून त्या दोघांनी फास लावून घेऊन आत्महत्या करण्याचा निश्चय केला. लगेच दोन फास तयार केले. आणि आढचाला टांगले. तो महार वर चढला आणि डोके फासात घातले. आता फास ओढणार इतक्यात दारावर थाप पडली, आणि महाराजांचा आवाज ऐकू आला. "महादू, दार उघड." हाच परमानंदाचा आणि उद्धाराचा क्षण ! लगेच महादू महार खाली उतरला आणि दार उघडून दोघेजण महाराजांना सामोरे गेले. त्यांच्या पायावर पाणी घालून त्यांना आत आणले, आणि त्यांचे पान वाढले. महाराज म्हणाले, "आपण सगळेच बरोबर भोजन करू." परंतु महादू तयार होईना. तो म्हणाला, "आपले उच्छिष्ट प्रसाद म्हणून ग्रहण करणे हीच आमची सेवा." असे म्हणून तो आणि त्याची पत्नी विनम्रतेने बाजूला उभी राहिली. नम्रतेशिवाय आशीर्वाद मिळत नाही.

कुटाळकट्टा सभासद पाळतीवर होतेच. महादूच्या दारावर थाप पडलेली ऐकली तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. आपण इतका पहारा करीत असताना एकनाथ येथे आले तरी कसे ? आश्चर्य तर खरेच. पण आता ही बातमी इतरांना सांगावी म्हणून, काही लोक एकनाथांच्या वाडचासमोर पहारा करीत होते तेथे ते आले, आणि त्यांना सर्व हकीगत सांगितली. त्या लोकांना काहीच समजेना. आणि त्या बातमीदारांना त्यांनी वेडचात काढले. ते म्हणाले की, "नाथ तर इथे ओटचावर बसले आहेत." बातमीदार जाऊन पाहातात तो खरेच ! महाराज नेहमीप्रमाणे त्यांच्या ओटचावर स्वस्थ बसले होते. ही काय भानगड ? सगळाच घोटाळा ! म्हणून ते सगळेजण महाराच्या घरी आले. पाहतात तो तेथ एकनाथ शांतपणे भोजन करीत होते. हा काय चमत्कार ! ते सगळे भांबावून गेले. त्यांचा त्यांच्या डोळचावर विश्वास बसेना. पण करणार काय ? हताश झाले. चमत्कार तर खराच, पण दिव्यदृष्टी आणि भावनाप्रद मन झाल्याशिवाय याचा उलगडा होण्यासारखा नव्हता.श्रीकृष्ण आपल्या सगळचा बायकांच्याकडे एकाच वेळी नसे का ? असो. भोजन झाल्यावर महादू महाराने नाथांना वस्त्रे अर्पण केली, आणि नाथ महाराज परत गेले. संध्याकाळी नित्याप्रमाणे महादू आणि त्याची पत्नी रामचरित्र-कीर्तनश्रवणास आली, आणि नाथांनी ते मुंडासे घातलेले पाहून त्यांना आनंद झाला. कीर्तन संपल्यावर महादू पाया पडला आणि नाथ भोजनास आल्याबद्दल उपकार मानू लागला. पहिल्यांदा नाथांना उलगडाच होईना. पण मग

सकाळचे संभाषण आठवले आणि भोजनास कोण गेले असेल याचाही त्यांनी आडाखा बांधला. "महादू, तुझे जीवन सफल झाले." असा त्यांनी त्याला आशीर्वाद दिला.

महाराच्या घरी भगवान् तरी जेवावयास का गेले? महार काय आणि इतर काय,

**हरीचिया दासा हरी दाही दिशा । भावे जैसा तैसा हरी एक ।।**

जाणे भागच होते. न गेल्यास महादू देहत्याग करण्यासैसुद्धा तयार झाला होता. इतकी त्याची इच्छा उत्कट होती हे एक कारण. संतवचन खरे झाले पाहिजे हे दुसरे कारण.

अती उत्कट इच्छा असल्याशिवाय कशाचीच खरी प्राप्ती होत नाही. स्वामी विवेकानंदांकडे एकजण गेला. आणि देव दाखवा असे म्हणू लागला. "तुला देव भेटावा अशी अतिशय इच्छा आहे का?" असे स्वामींनी विचारता तो म्हणाला, "हो तर"! काही दिवस गेल्यावर एक दिवस स्वामी त्याला आपल्या बरोबर नदीवर स्नानाला घेऊन गेले. तिथे पोहत असताना त्याची मानगूट धरून त्याला पाण्यात बुडवला. तो तडफड करू लागला. थोड्या वेळाने त्याला वर येऊ दिले, आणि विचारले, "तुला काय पाहिजे होते?" तो म्हणाला "हवा." स्वामी म्हणाले, "इतकी जेव्हा तुला देव भेटण्याची तळमळ लागेल, तेव्हा तो नक्की भेटेल." त्या महादू महाराला नाथांनी जेवायला यावे म्हणून इतकी तळमळ लागली होती.

अगदी अलीकडचा अनुभव म्हणजे वासुदेवानंद सरस्वतींच्या आयुष्यातील एक घटना. असे म्हणतात की, एकदा काही लोक आपल्या मित्रांना सांगू लागले की "आज सकाळी वासुदेवानंद सरस्वती पंचगंगेवर स्नान करीत होते. आणि त्यांच्याकडून वहात आलेल्या पाण्यात स्नान करण्याचे भाग्य आम्हाला लाभले." या मित्रांनी त्यांना खोट्यात काढले. ते म्हणाले की त्याच दिवशी सकाळी त्याच वेळेस त्यांना पण वाडीस वासुदेवानंद सरस्वती स्नान करीत होते, त्यांच्या खालच्या बाजूला स्नान करण्याचे भाग्य लाभले. यांतील खरे कोण? का दोघेही थापाडे?

महादू महाराच्या मनःस्थितीत आणि मुमुक्षूंत काय फरक आहे? काही लोक म्हणतात की एकापेक्षा अधिक ठिकाणी एकाच वेळी दिसणे यात आश्चर्य करण्यासारखे काहीच नाही. योगाभ्यासाने प्राप्त होणारी ती एक सिद्धी आहे.

## मठाधिपतीचे काशीस बोलावणे

नाथमहाराजांनी भागवत प्राकृतात लिहिण्यास प्रारंभ केला. आणि दोन अध्याय लिहून झाले. आपल्या हिंदूधर्माचे महान् तत्त्वज्ञान सोप्या भाषेत लिहिले तरच सर्वांना समजेल, केवळ याच सदिच्छेने त्यांनी ते मराठीत लिहिले. संस्कृत

भाषा कठीण आणि ती सर्वसामान्य लोकांना समजत नाही. हे दोन अध्याय नाथांच्या एका भक्ताने उतरवून घेतले आणि तो काशीस गेला. तेथे या दोन अध्यायाचे तो रोज पारायण करीत असे. एक दिवस तेथील मठातल्या एका विद्यार्थ्याने हे पाहिले आणि ही गोष्ट मठाधिपतींना सांगितली. हिंदू धर्मातील संस्कृत पुस्तकाचा मराठीत अनुवाद करणारा हा शिष्ट कोण म्हणून त्या माणसाला बोलावून सर्व विचारपूस केली त्याने सर्व खरी हकीगत सांगितली. पैठण क्षेत्री एकनाथ नावाचे एक महान् आत्मज्ञानी भक्त आहेत. त्यांनी केलेला हा अनुवाद आहे. त्या काळी असे करणे म्हणजे संस्कृत भाषेचा मोठा अपमान करणेच समजले जात असे. म्हणून मठाधिपतींना नाथांचा फार राग आला.

त्यांनी आपले दोन शिष्य नाथांना काशीस घेऊन येण्याकरिता पैठणला पाठवले. नाथ जर येण्यास कबूल नसले तर शक्य झाल्यास बळजबरीने आणावे, तेही न जमले तर तेथील ब्रह्मवृंदाने त्यांना वाळीत टाकावे, अशी त्यांनी शिफारस केली. हे पत्र घेऊन ते दोन शिष्य मजल-दरमजल करीत पैठणक्षेत्री आले. कुटाळकट्ट्यावरचे फुकट-फौजदार हजर होतेच. हे पत्र वाचून त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांची खात्री झाली की आता तरी एकनाथांचा नक्षा नक्की उतरणार. त्यांनी त्या दोन शिष्यांना नाथांचा वाडा खुणेने दाखवला. ते दोघे शिष्य वाड्यापाशी आले. तेव्हा ते जरा ताठ्यातच होते. नाथांनी त्यांना पाहताच त्यांचे स्वागत केले आणि त्यांना येण्याचे कारण विचारले. नाथ म्हणाले, " तुम्ही दमलेले दिसता, तरी थोडा आहार करून विश्रांती घ्या. मग आपण बोलू." नाथांची शांत मूर्ती पाहून आणि सौम्य भाषण ऐकून त्यांचा गर्व पार नाहीसा झाला. नाथांची त्यांच्यावर मोहिनीच पडली आणि त्यांच्या सांगण्याप्रमाणे ते वागू लागले. नाथांनी सुचविल्याप्रमाणे आहार-विश्रांती झाल्यावर नाथांच्यासह ते दोघे परत काशीला येण्यास निघाले. मजल-दरमजल करीत ते थोड्याच दिवसांनी काशीस पोहोचले.

असल्या पापी माणसाचे तोंडसुद्धा पाहू नये म्हणून नाथमहाराज आणि मठाधिपती या दोघांमध्ये एक पडदा बांधण्यात आला. आणि अशा रीतीने त्या दोघांची चर्चा सुरू झाली. मठाधिपतींच्या प्रश्नाला महाराजांनी उत्तर दिले, " सर्व लोकांना भगवंताचा उपदेश नीट आणि सहज समजावा याच्याशिवाय दुसरा काहीही उद्देश नाही. मी लिहिलेले आपण वाचून पाहा. आणि तरीही जर मी आपणांस अपराधी वाटत असेन तर आपण सांगाल ती शिक्षा भोगण्यास किंवा प्रायश्चित्त घेण्यास मी तयार आहे. मी जे लिहिले आहे त्याचे आपण वाटेल ते करावे." हे सरळ, सौम्य आणि आदराचे भाषण ऐकून जो इष्ट तोच परिणाम झाला. पडदा बाजूला करून नाथांना पाहण्याची मठाधिपतींना इच्छा झाली. पडदा बाजूला झाला—अज्ञानाचा तो पडदा—आवरण गेल्यावर काय राहणार? नाथांची ती

परम शांत मूर्ती पाहून मठाधिपतींचा गैरसमज आणि अहंकार अजिबात लयास गेला आणि ते स्वत: त्यांना शरण गेले. नाथ म्हणाले, " हे काय ? आपण चतुर्थाश्रमी, आम्हीच तुम्हाला वंदन करणे इष्ट आहे. डोळ्यावरचे अभ्र गेलेले मठाधिपती— केवळ नाथांच्या दृष्टिक्षेपाने विक्षेप गेला—म्हणाले, " महाराज, आम्हांला क्षमा करावी. आपली योग्यता आम्हाला कळली नव्हती. तेव्हां आता इथेच राहून समग्र ग्रंथ पूर्ण करावा." मग नाथमहाराज ग्रंथ पुरा होईपर्यंत काशीसच राहिले. कालांतराने ही वार्ता पैठणला पोहोचली. आपल्या कुटाळकट्ट्यावरच्या सभासदांची तोंडे नक्कीच पाहाण्यालायक झाली असतील !

काही चरित्रकार हा प्रसंग थोड्या निराळ्या पद्धतीने सांगतात. काशीक्षेत्री पोहोचल्यावर मठाधिपतींनी शिष्यांस सांगितले की नाथांना मठात एका बाजूला बसवा. त्या मठात तीनशे यतिवर्ग होता. मठाधिपतींनी सर्वांस सांगितले की पैठणहून आलेल्या त्या ब्राह्मणाला प्रत्येकाने आपल्या दंडाने पाच फटके मारावेत. चौकशी न करता असली कठोर शिक्षा करणे शिष्यांना योग्य वाटेना. त्यांनी असे ठरविले की आपण प्रत्येकाने नाथांशी बोलावयाचे आणि योग्य वाटल्यासच शिक्षा करावयाची. जो यती नाथांशी बोलण्यास जाई, त्याला नाथांच्या जागी चतुर्भुज श्रीकृष्णमूर्ती दिसे आणि तो मोहिनीअस्त्र टाकल्यासारखा तटस्थ उभा राही. अशी सगळ्यांची स्थिती झाली. ही गोष्ट त्यांनी मठाधिपतींना सांगितली. हा काय प्रकार आहे, हे आपण स्वत:च जाऊन पाहावे असे मठाधिपतींनी ठरविले. न जाणो, हा मनुष्य कदाचित् चेटूक करीत असेल, म्हणून त्यांनी पडद्याआडून नाथांशी बोलावयाचे ठरविले आणि त्याप्रमाणे व्यवस्था झाली. पडद्याआडून त्यांनी पाहिले तो तीनशे संन्याशी विदेह स्थितीत उभे असलेले त्यांना दिसले. नाथ म्हणाले, " महाराज आपल्या चरणी मी माझे मस्तक नम्र करतो. हा अंत:पट आपण आता काढून टाकावा." हे शब्द ऐकल्यावर मठाधिपतीस काही सुचेनासे झाले, आणि त्यांची न्यायबुद्धी जागृत झाली. इतर शिष्यांनीही सांगितले की भगवान् श्रीकृष्णच एकनाथांच्या रूपाने आपल्या मठात आले आहेत, तरी आपण पडदा दूर करावा. मठाधिपतींनी ते मान्य केले. मायापटलच ते ! ते दूर होताच नाथांच्या जागी प्रत्यक्ष श्रीकृष्णमूर्तीच त्यांना दिसली. त्या क्षणी सर्व अहंकार नाहीसा झाला, अष्टभाव जागृत झाले आणि नाथांना त्यांनी साष्टांग प्रणिपात केला. दयाळू संत नाथांनी त्यांना वर उचलून त्यांच्याच चरणी मस्तक ठेवले, आणि म्हणाले, " महाराज, आपण मला वंदन करावे हे उचित नाही. चतुर्थाश्रम हा सर्व आश्रमांत श्रेष्ठ आहे. आम्हा गृहस्थाश्रमी लोकांनी केलेले वंदन ग्रहण करण्याचा आपला अधिकारच आहे." नंतर मठाधिपतींच्या विनंतीवरून भागवत ग्रंथ आणि रुक्मिणी-स्वयंवर नाथांनी तेथेच पूर्ण केले.

मठाधिपती केवळ विद्वान होता आणि आश्रमधर्म पाळण्याचा त्याला मोठा अहंकार होता. परमार्थात अहंकाराइतकी मोठी दुसरी कोणतीच अडचण येत नाही. आणि हा अहंकारच त्याला नडत होता.

गृहस्थाश्रम उच्च की संन्यासाश्रम उच्च याबद्दल एक गोष्ट आहे.

एकदा एक राजा होऊन गेला. संन्याशांना बोलावून कोणता आश्रम श्रेष्ठ याबद्दल तो वाद करी. ते जर संन्यासाश्रम उच्च असे सिद्ध करू शकले नाहीत तर त्यांना गृहस्थाश्रम स्वीकारावयास लावी. एक संन्यासी चर्चा न करता म्हणाला की 'ज्याचे उचित रीतीने पालन केले जाते तो आश्रम उच्च.' राजा म्हणाला, 'हे सिद्ध करा.' सांगितल्याप्रमाणे राजाने संन्याशाचा वेश घेतला, आणि ते दोघे बाहेर पडले. फिरता फिरता ते एका गावी आले. ते नगर श्रृंगारलेले होते. चौकशी, करता असे कळले की, राजकन्यचे स्वयंवर आहे. हे दोन संन्याशी स्वयंवर पाहण्या-करता मंडपाजवळ उभे राहिले. त्या राजकन्येला जमलेल्यांपैकी कोणताच राजपुत्र पसंत पडेना. इतक्यात तिने एक तरुण तेजस्वी यती जाताना पाहिला. तो तिच्या मनात भरला आणि त्याच्या गळयात तिने माळ घातली. पण ह्या यतीने माळ काढून टाकली. राजा तेथे आला आणि त्याने सांगितले, "माझ्यानंतर ही मुलगीच वारस आहे त्यामुळ हे सर्व राज्य तुला मिळेल." तरी तो कबूल होईना. शेवटी तो रानाकडे पळू लागला. मुलगीही त्याच्या मागोमाग जाऊ लागली. आमचे दोन संन्याशीसुद्धा त्यांच्या मागे जाऊ लागले. काही वेळाने तो यती अरण्यात नाहीसा झाला. आणि ही राजकन्या एकटीच राहिली. या दोन संन्याशांनी तिला धीर दिला आणि तिघेही त्या रात्री एका झाडाखाली राहिले. त्या झाडावर एक पक्षी, पक्षीण आणि त्यांची तीन पिल्ले रहात असत.

रात्री थंडी पडू लागली तेव्हा पक्षी म्हणाला की, "हे तीन अतिथी आपल्या आश्रयाला आले आहेत. तरी आपण त्यांच्या थंडीची आणि भुकेची सोय केली पाहिजे." त्या पक्ष्याने एक जळकी काडी त्यांच्यासमोर आणून टाकली. संन्याशांनी त्याच्यावर पाचोळा टाकला आणि चांगली शेकोटी तयार केली. अशा रीतीने थंडीचे निवारण झाले. आता भुकेची सोय काय? पक्षी म्हणाला, "मी ह्या अग्नीत उडी मारतो, म्हणजे माझे भाजलेले मांस खाऊन यांची भूक भागेल." त्याप्रमाणे पक्ष्याने उडी मारली. पक्षिणीला वाटले, एवढ्याशा मांसाने तिघांची भूक कशी भागणार? म्हणून तिनेही उडी घेतली. राहिलेली तीन पिल्ले म्हणाली की आपणही त्याग केला पाहिजे. म्हणून त्यांनीही आगीत उड्या मारल्या. काय हा त्याग! ह्या दोन्ही उदाहरणांवरून हेच सिद्ध होते की दोन्हीही आश्रम उच्च आहेत. भगवंतांनीच म्हटले नाही का

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।**
**स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥**

## दासोपंत देशपांडे यांची भेट

दासोपंत हा दिगंबरपंत देशपांडे यांचा एकुलता एक मुलगा. लहानपणी दासोपंत तेजःपुंज आणि अतिशय देखणे होते. दासोपंतांचे वडील ज्या यवन राजाकडे देशपांडेगिरी करीत असत, त्याला मुलगा नव्हता. त्याच्या मनात हा मुलगा भरला. त्याच्या मनातून या मुलाला बाटवून आपला वारसदार करावा अशी इच्छा होती. काहीतरी कारण काढून देशपांड्यांकडून वसुलीचे दोन लाख रुपये येणे आहे असे त्याने दाखविले आणि ही रक्कम एक महिन्याच्या आत न दिल्यास मुलाला इस्लामी धर्माची दीक्षा देऊ असे बजावले. महिना संपायच्या सुमारास दत्ताजीराव नावाच्या सरदाराने दोन लाख रुपये सरकारात भरून मुलाची सुटका केली. पण ह्या घटनेचा दासोपंताच्या मनावर इतका परिणाम झाला की त्याने घरदार सोडून ईशप्राप्तीकरिता तप-ध्यान सुरू केले. विंध्याद्रीमध्ये नर्मदा नदीकाठी दत्तोपासना केली. काही वर्षांनी त्यांना साक्षात् श्रीदत्तदर्शन झाले आणि ते महान् साधू पुरुष म्हणून प्रसिद्ध झाले. कोठल्याही संताने त्यांच्या इतके वाङ्मय लिहिले नाही. त्यांची भगवद्गीतेवरची टीका एक लाख ओव्यांची आहे. अशी आख्यायिका आहे की त्यांना रोज ढबू पैशाच्या वजनाइतकी शाई लागत असे, इतके ते लिहीत असत.

एकनाथ व दासोपंत हे दोघेही मोठे संत होते. आणि दोघांनाही श्रीदत्तात्रेयांनी सगुणसाक्षात्कार दिला होता. इतक्या उच्चपदावर पोहोचलेल्या संतांच्या मनांतसुद्धा स्पर्धा कशी उत्पन्न होते हे एक आश्चर्यच आहे. पण मनच ते, त्याला आवरणे किती कठीण आहे हेच यावरून सिद्ध होते. मनाइतके चंचल या जगात दुसरे काहीही नसेल. एका क्षणात पृथ्वीप्रदक्षिणा मन करू शकते. आणि सबंध आयुष्याचा आढावा घेऊ शकते.

एकनाथांच्या घरी साक्षात् दत्तात्रेय पहारा करतात, याबद्दल दासोपंतांच्या मनात नेहमी किन्तू उत्पन्न होत असे. एकनाथ महाराज दत्तात्रेयाला काम कसे करू देतात असे त्यांना वाटे. काशीहून परत येताना दासोपंत आणि एकनाथ यांची गाठ पडली. चर्चा सुरू झाल्यावर एकनाथ म्हणाले, " काय करावे मी नको म्हणत असताना दत्तमहाराज ऐकत नाहीत. आणि माझ्या घरी पहारा करतात. " आपल्या मनातले एकनाथांनी ओळखले असे दासोपंतांना वाटले. मनातील या मत्सरभावामुळे दत्तात्रेयाने दासोपंतांना सांगितले, " तू एवढे वाङ्मय लिहिलेस तरी एकनाथांच्या लिखाणाइतका त्याचा प्रकाश पडणार नाही. " आणि तशीच परिस्थिती आहे हे खरे.

## महाराचे मूल

एक दिवस माध्याह्नस्नान करून नाथमहाराज नदीवरून परत येत होते.

नदीचे वाळवंट अतिशय तापलेले होते. आणि पायाला चटके बसत होते. ते परत येत असताना त्यांना एका लहान मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला, आणि ते मूल सारखे 'आई-आई' म्हणून ओरडून हाका मारत होते. ते त्या तापलेल्या वाळवंटात बसले. साहजिकच त्याला चटके बसत होते. नाथमहाराज त्या मुलाजवळ गेले आणि चटकन् त्याला कडेवर उचलून घेतले. ते मूल बोट दाखवून आपल्या आई-कडे जाण्याचा रस्ता दाखवू लागले. त्या दिशेने ते जाऊ लागले. तो महारवाड्या-कडे जाण्याचा रस्ता होता. थोड्याच वेळात ते तिथे पोहोचले. नाथमहाराज येताना दिसताच तिथले सगळे लोक जमा होऊन त्यांच्या पाया पडू लागले. ही चारशे वर्षां-पूर्वीची गोष्ट आहे, की जेव्हा जातीची आणि वर्णाश्रमाची बंधने जास्त कटाक्षाने पाळली जात असत. सामान्य माणसाच्या विचारसरणीप्रमाणे नाथांचे हे भयंकरच मनोधाष्टर्य होते. पण साधूला भूतदयेपुढे जातीची काय प्रतिष्ठा ? थोड्याच वेळात त्या मुलाची आई आली आणि तिने आपले लेकरू नाथांच्याकडून घेतले. काय तिचा आनंद ! ती पाणी आणण्याकरिता गेली होती. त्यावेळी ते तिच्या पाठोपाठ हळूहळू गेले, पण ती परतली तेव्हा ते चुकले. वाळवंटात चटके बसू लागले म्हणून ते मूल रडत तेथेच बसले होते.

काही लोक म्हणतील की त्यांनी यात विशेष काय केले ? केले तर ! नाही कसे ? हल्लीच्या काळात जातीची बंधने इतकी ढिली आहेत तरी सुद्धा काही लोक स्वच्छतेच्या नावाखाली महाराच्या मुलांना किंवा रोग झालेल्या मुलांना हातसुद्धा लावायला कचरतात.

भूतदया ही मनाची एक अकल्पित वृत्ती आहे. एखादे भुकेलेले भिकाऱ्याचे मूल पाहून एखादा मनुष्य नुसता त्याच्याकडे पाहून चालू लागेल. दुसरा मनुष्य म्हणेल, "अरेरे, काय हे दारिद्र्य !" तिसरा मनुष्य एखादा पैसा काढून देईल, तर चौथा हे दृश्य पाहून इतका विव्हळेल की लगेच एखाद्या अनाथाश्रमाला देणगी देईल. एकच दृश्य पण परिणाम किती भिन्न ! आपण सर्वजण दरिद्री माणसे, रोगी आणि मरणोन्मुख माणसे नेहमीच पाहतो. पण आपल्यापैकी गौतमबुद्धासारखे वैराग्य किती जणांना येते ? नरसम्मासारख्या फसवणूक होऊन 'नरकात लोळणाऱ्या मुली,' 'विकृत जीवनात कुजलेला शंकर' आणि 'थिजलेल्या डोळ्यांचा कृष्णा' (शरच्चन्द्र गोखले-'करपलेल्या कळ्या,' केसरी दिवाळी अंक, १९६४) यांच्यासारखी आज आपल्या समाजात थोडी का उदाहरणे आहेत ? अशा घटना टाळण्याकरता आपण काय प्रयत्न करतो हे प्रत्येकाने आपल्या मनाला विचारावे हेच बरे. साधुसंतांचे वैशिष्ट्य तर हेच की कुठल्याही पीडिताला शक्य तितकी मदत करणे. रोहिदास चांभाराने आपल्या हातात होते ते सर्व पैसे त्या भिकारी ब्राह्मणाला दिले. म्हणून तो संत ! आणि आमच्याजवळ पैसे असूनही आम्ही रंक.

अनाथ आणि फुटपायरीवर निजणाऱ्या मुलांचा प्रश्न केवळ समाजाने हाताळण्याइतका सोपा नाही. याच्या बुडाशी दारिद्र्याचे अधिष्ठान आहे. समाजातील एक टक्का दारुबाज लोकांना सुधारण्याकरता महाराष्ट्राने दरवर्षी कोटयवधी रुपये खर्च करणे चांगले, की तितके पैसे दारिद्र्य कमी करण्यात आणि ह्या कळ्या करपू न देण्यात खर्च करणे चांगले याचा विचार आमच्या पुढाऱ्यांनी करणे जरूर आहे. शिक्षणाशिवाय दारिद्र्य जात नाही, आणि खऱ्या धार्मिक शिक्षणाशिवाय चारित्र्य घडत नाही. राष्ट्रात नीतिमान् प्रजा पाहिजे असेल तर हिंदू तत्त्वज्ञानाचे शिक्षण देणे आवश्यक आहे हे जगातल्या कोणत्याही विचारवंताला कबूल करावे लागेल. काळ्याबाजारात पैसे मिळविलेल्या लखपतींनी त्यांच्या प्राप्तीपैकी १/१०० हिस्सा जरी गुप्तपणे या सुधारणेकडे वापरला तरी अनेक ' करपलेल्या कळ्या ' उमलतील, आणि त्यांच्या सुवासाच्या दिशेने गेले तर ह्या लोकांना सुद्धा स्वर्गाचा मार्ग न चाचपडता सापडेल.

## कुष्ठरोगी

एक दिवस नाथमहाराज काकबली टाकण्यासाठी बाहेर आले, तो त्यांच्या अंगणात एक कुष्ठ रोगाने गांजलेला ब्राह्मण उभा दिसला. नाथांनी त्याला वंदन करून जेवावयास आत येण्याची विनंती केली. पण ती त्याने नाकारली. म्हणून नाथांनी त्याची इच्छा विचारली. त्याने आपली सर्व हकीगत सांगितली.

तो त्र्यंबकेश्वरचा राहणारा, आणि त्याला बरीच वर्षे हा रोग होता. त्याला स्वत: त्र्यंबकेश्वराने आदेश दिला की तू पैठणला जा. तिथे एकनाथ नावाचे एक साधुपुरुष आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी एक महाराचे मूल घरी नेऊन पोचविले. त्याचे जे पुण्य झाले ते तू त्यांच्याकडे माग. त्या पुण्याने तू बरा होशील. म्हणून तो त्या पुण्याचे दान मागण्यासाठी आला होता. नाथ म्हणाले की त्यांनी काहीच पुण्य केले नाही. आणि तेही खरेच होते. कारण जिथे द्वंद्वच नाहीसे झाले तिथे सकाम कर्मच नाही, मग पाप किंवा पुण्य कसे असणार ? नाथांनी त्यांच्या देहाकडून होणाऱ्या सर्व कर्मांचे भस्म केले होते. पापपुण्य हे शब्दच असे आहेत की पापपुण्यावर विश्वास नसलेल्या एखाद्या माणसालासुद्धा आपले पुण्य दुसऱ्याला द्यावयास जिवावर येते कारण परंपरेने आपल्या धर्म-विश्वासाचा एक अंकुर मनात असतोच की, पापपुण्य एवढेच फक्त आपल्याबरोबर येणार आहे, दुसरे काहीही येऊ शकत नाही. नाथ म्हणाले की, त्यातूनही तुझी तशी इच्छा असली तर मी माझे सर्व पुण्य द्यावयास तयार आहे. पण त्या रोग्याला फक्त तेवढ्याच कृत्याचे पुण्य पाहिजे होते. शेवटी त्यांनी हातावर पाणी सोडले आणि त्याला पुण्य अर्पण केले. त्याच क्षणी त्या रोग्यात

बदल झाला. त्याचे सर्व व्रण बरे झाले आणि घोंघावत असलेल्या माशा निघून गेल्या.

नाथ महाराज किती उदार होते हे पाहण्याकरिताच तर ईशशक्ती कुष्ठ-रोग्याच्या रूपाने आली नसेल ना ?

बहुतेक सर्व संतांच्या चरित्रात रोगी बरे केल्याचे चमत्कार आपण वाचतो. काही डॉक्टरांच्या हाताला गुण आहे असे म्हणतात. याचा तरी अर्थ दुसरा काय? आत्मशक्तीचेच हे दर्शन आहे. नाथांच्या गोष्टीत आणि येशू ख्रिस्ताच्या गोष्टीत थोडे साम्य आहे. येशू ख्रिस्त एका गावाहून जात असताना त्याच्याकडे सात महारोगी आले. त्याने रोग्यांसाठी देवाची प्रार्थना केली. आणि त्यांच्या अंगावरून हात फिरवला. तत्क्षणी ते सर्व रोगमुक्त झाले. पवित्र देहाचा स्पर्श आणि साधूची कृपाळू दृष्टी यांत एक अद्‌भुत शक्ती असते.

नाथमहाराज आपले सर्व पुण्य द्यावयास तयार झाले होते. गोड बोलावयास एका पैशाचाही खर्च येत नाही, पण ते सुद्धा आपण करीत नाही. तर आपले एवढे श्रमाने मिळवलेले पुण्य आपण द्यावयास तयार होऊ का ? छे, छे, भलतेच ! पुण्य मिळविल्याचा अहंकार सुद्धा आपण काळ्याबाजारात विकू !

बरे, पाप आणि पुण्य म्हणजे तरी काय ? दुसऱ्याचे वाईट व्हावे या बुद्धीने, किंवा दुसऱ्याचे काहीही होवो, माझे मात्र चांगले व्हावे या बुद्धीने केलेले काम म्हणजे पाप, आणि दुसऱ्याचे भले व्हावे या बुद्धीने केलेले कार्य म्हणजेच पुण्य !

## कैद्याची सुटका

एकदा रात्रीचे कीर्तन संपल्यावर सर्व मंडळी घरी गेली आणि वाड्यातील माणसे आवराआवर करीत होती. इतक्यात नाथमहाराजांना कण्हण्याचा आवाज ऐकू आला. नाथ आणि उद्धव जाऊन पाहतात तो त्यांना एक अगदी रोड झालेला माणूस त्यांच्या अंगणात पडलेला दिसला. त्याने खुणेनेच आपल्याला भूक लागल्याचे सांगितले. नाथांनी लगेच त्याला थोडेसे खाऊ घातले आणि मग त्याची विचारपूस केली.

काही अपराधाबद्दल त्याला कारावासाची शिक्षा देण्यात आली होती. तुरुंगात त्याचे हाल झाले, आणि पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे तो अगदी अशक्त झाला. अशा स्थितीत तो कुठेही पळून जाणे शक्य नाही म्हणून पहारेकऱ्याने त्याला पटांगणात बेड्या काढून आणून ठेवला. तेथे पडलेला असताना त्याला कीर्तनाचा आवाज ऐकू आला. सर्व शक्ती एकवटून तो रखडत रखडत, बसत बसत, आवाजाच्या दिशेने आला, आणि नाथमहाराजांच्या अंगणात येऊन पडला. संतांच्या आश्रयाला आल्यावर त्याला काय कमी पडणार आणि कोण त्याला त्रास देणार ? नाथांनी त्याला आपल्या वाड्यातच तो चांगला बरा होईपर्यंत ठेवून घेतला. कायद्याचा भंग होऊ नये म्हणून

दुसऱ्या दिवशी सकाळी सरकारकडे कळविले की अमुक एक कैदी माझ्याकडे ठेवून घेतला आहे आणि बरा होईपर्यंत तो माझ्याकडेच राहील.

जो तो मनुष्य आपल्या कर्मसंचिताप्रमाणे प्रारब्ध भोगतच असतो. त्यात दुसऱ्याला ढवळाढवळ करता येत नाही. आपण आपले कर्तव्य करीत असताना निष्काम बुद्धी असेल तर फारच उत्तम. म्हणजे कर्मवासना आणि पापपुण्य आपल्याला चिकटणार नाही. पण हे शक्य नसेल तर निदान प्रत्येक कर्म करताना सदिच्छा तरी असावी. संतांची सर्व कर्मे निष्काम असतात, म्हणून वासनांचा नेहमी क्षय होत असतो.

## ब्रह्मसमंधाला सद्‌गती

नदीवरून स्नान करून येत असताना एक दिवस एक ब्रह्मसमंध नाथांच्या समोर आला आणि म्हणाला की, "त्या कैद्याला आश्रय दिल्यामुळे मिळालेले पुण्य मला द्या." नाथ म्हणाले की," पुण्य मिळण्यासारखे मी काहीच केलेले नाही, आणि जर माझ्या जवळ पुण्यसंचय असेल, तर मी ते द्यावयास तयार आहे". ब्रह्मसमंधाने फक्त तेवढेच पुण्य मागितले. नाथांनी लगेच पाणी सोडून त्या पुण्याचे दान केले. यामुळे ब्रह्मसमंध त्या योनीतून मुक्त झाला, आणि त्या जीवात्म्याला सद्‌गती मिळाली.

अदृश्य योनी खरोखर अस्तित्वात आहेत का, ? हा एक प्रश्नच आहे. आपण जर पुजर्जन्म मानला तर अदृश्य योनी तरी नाकबूल करण्याचे काय कारण ? केवळ आपल्या डोळ्याला एखादी गोष्ट समजत नाही म्हणजे ती नाहीच का ? रात्रीच्या वेळी मुंग्यांना आणि झुरळांना अंधारात कसे दिसते ? अल्ट्राव्हायोलेट नावाचे किरण आहेत, ते आपल्याला दिसत नाहीत, पण कीटकांना मात्र या उजेडात दिसते.

मागच्या शतकात बेटोव्हेन नावाचा एक नामांकित पियानोवादक युरोपमध्ये होऊन गेला. त्याने जे लिहिले ते सर्व त्याला ऐकू येत असे. शिवाय तो आंधळा होता. तो केवळ ऐकलेले सर्व लिही. ही आकाशवाणी कुठून येत असेल ? आणि आकाशवाणी होत असेल तर अदृश्य योनी असणे अशक्य आहे का ? आपला विश्वास असो किंवा नसो, पण असल्या गोष्टी घडतात खऱ्या. रॉबर्ट लुई स्टीफन्सन नावाचा एक लेखक होऊन गेला. त्याला रोज सुसंगत अशी स्वप्ने पडत, आणि ती तो लिहून काढीत असे. काही दिवसांनी आपोआप त्याची कादंबरी तयार होत असे. काय विचित्र घटना ही !

अशा विचित्र घटना ऐकल्या—वाचल्या की पुनर्जन्म असलाच पाहिजे असे वाटू लागते. त्याशिवाय ह्याचे समाधानकारक रीतीने विवरण होऊ शकत नाही. वासनातृप्तिकरिता विशिष्ट देह धारण करता येतो. त्या वासना तृप्त झाल्या की

ती वासनाशक्ती तो देह सोडून देतो. नवीन वासना जडल्या असतील तर

'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनम् ।'

सुरूच आहे. पण जर वासना जडल्या नसतील तर तो जीवात्मा या संसाराच्या फेऱ्यातून सुटला पाहिजे. म्हणून निष्कामकर्म इतके महत्त्वाचे आहे, आणि निष्कामकर्म करण्यास प्रवृत्त होण्याकरिता नामस्मरणाची मदत होते. सतत ईशचिंतन हेच सगळ्याचे सार.

'हरी मुखी गाता हरपली चिंता ।
त्या नाही मागुता जन्म घेणे ।

## चोर आंधळे झाले

एके रात्री नाथमहाराजांचे कीर्तन चालू होते, आणि सर्व मंडळी कीर्तनश्रवणात निमग्न झाली होती. ही संधी चांगली आहे असे वाटून चार चोर घरात शिरले. जे काही पाहिजे होते ते त्यांनी गुंडाळून घेतले आणि परत जाऊ लागले. तोच काही तरी भयंकर प्रकार घडला, आणि ते चौघेही एकदम आंधळे झाले. साहजिकच त्यांना पळून जाता येईना. ते तेथेच बसून राहिले.

कीर्तन संपल्यावर नाथमहाराजांना गाठोडे घेऊन बसलेले हे चार लोक दिसले. त्यांनी आपली सर्व हकीगत नाथांना सांगितली. दयाळू संतच ते ! त्यांनी ईशशक्तीची प्रार्थना केली आणि त्या चोरांना दृष्टी प्राप्त करून दिली. "या वस्तूंपैकी काय पाहिजे ते तुम्हांला न्या, आणखीही काही पाहिजे तर मी देतो, असे नाथ म्हणाले. चोरांना खरा पश्चात्ताप झाला होता. ते म्हणाले, "आम्हाला दृष्टी द्या म्हणजे झाले."


त्यांनी योग्य तेच मागितले. खरी दृष्टी आल्यावर मग ह्या आयुष्यात आणखी काय पाहिजे ? आणि संतकृपेशिवाय खरी दृष्टी कोण देणार ? ते चोर नाथांचे दास झाले.

व्यावहारीक दृष्टीने विचार केला तर एकदा गेलेली दृष्टी परत येऊ शकते का ? समर्थ रामदासांनी आपल्या आईचे आंधळेपण नाही का बरे केले ? हल्लीसुद्धा आंधळे असलेले लोक बरे झाल्याची खूप उदाहरणे आहेत.*

---

* जे अठरा वर्षे कैदेत राहून होऊ शकले नाही तेच मॉसिन्योर मोलकमनी जँ व्हालजँच्या मनाचा पालट एका क्षणात नाही का केला ?

( ला. मिझरेबल–व्हिक्टर ह्यूगो )



कुटाळ कट्टा
[ पान २५ ]

☆ ☆ ☆




पिंक थुंकणाऱ्या यवनाच्या
माडीचा फोटो [ पान ३५ ]



एकनाथ महाराजांच्या वाड्यात एकनाथ कीर्तन
करीत, तो महाल [ पान ४८ ]

☆



दंडवतस्वामींनी समाधी घेतली
ती जागा [ पान ७० ]

# रामचंद्रपंत

पैठण गावात रामचंद्रपंत नावाचे एक श्रीमान गृहस्थ राहात असत. ते तरुण होते, त्यांच्या पाशी इतर वैभव होते आणि सुस्वरूप, सद्गुणी सीता नावाची पतिव्रता पत्नी होती. एका व्यसनाखेरीज एरवी तो मनुष्य मोठा दिलदार आणि चांगला होता. पण दुर्जनांच्या संगतीने बाहेरख्यालीची सवय लागली, आणि त्यामुळे संसाराची धूळधाण होण्यास सुरुवात झाली. हळूहळू रामचंद्रपंत सर्व वेळ त्या बाईच्या घरी घालवू लागले, आणि सर्व संपत्तीसुद्धा तिला देऊ लागले. घरी आलेच तर धर्मपत्नीला छळीत, मारहाण करीत आणि निघून जात. विषयलंपट माणसाला तारतम्य राहात नाही. कोठलेही व्यसन लागले की त्या विषयातच सदा रंगून रहावे वाटते. देवाचे व्यसन लागले तर मग विचारायलाच नको. इतर सर्व गोष्टी गौण वाटू लागतात हे योग्यच आहे. एखाद्या व्यावहारीक क्षुद्र आनंदाने जर बाकीच्या गोष्टींचा विसर पडतो तर ज्याला सगुण साक्षात्काराचा किंवा आत्मज्ञानाचा आनंद मिळाला असेल, त्याला इतर गोष्टींची काय मातब्बरी वाटणार ? असो.

एक दिवस तर या सगळ्या वर्तनाचा कहरच झाला. रामचंद्रपंत तारवटलेल्या स्थितीत रागारागाने घरी आले. सीताबाईने काय झाले म्हणून विचारल्यावर त्यांनी जे उत्तर दिले ते ऐकून ती माउली बिचारी सुन्नच झाली. ते म्हणाले, " त्या बाईची इच्छारूपी आज्ञा अशी आहे की, आज तिच्या घरी खास जेवण आहे, तरी ती, तू आणि मी अशा तिघांनी एकाच सुंदर चांदीच्या ताटात जेवण करावयाचे." पतिव्रतेला हे बोलणे ऐकून काय वाटले असेल याची कल्पना बायकाच करू जाणे. काय हा भ्रष्टाचार ? आपण उष्ट्या ताटात जेवावयाचे ते जेवावयाचेच, आणि पतिव्रतेला रखेलीचे घाणेरडे उष्टे खावयास लावावयाचे. ती बाई तर इतर जातीची होती, आणि नसली तरी काय झाले ? स्वखुषीने असे वागणारी बाई ब्राह्मणकुळातील असली तरी इतर जातीचीच समजली पाहिजे. पण इतर जात तरी कोणती म्हणावयाची ? प्रत्येक जातीत सदाचाराला मानाचे आणि महत्त्वाचे स्थान आहेच. दुराचारी हीच एक वेगळी जात समजली पाहिजे.

सीताबाईवर हा कसोटीचा प्रसंगच ओढवला होता, आणि काय करावे ते तिला सुचेना. तिची पुण्याई म्हणूनच ती या प्रसंगातून वाचली. तिला एकनाथ महाराजांची आठवण झाली आणि तेच आपल्याला मार्गदर्शन करू शकतील असे तिला वाटले. पण ते आपल्याला भेटणार कसे ? महाराज नदीवरून परत जाताना त्यांना रस्त्यात भेटावे असे तिने ठरविले, आणि त्यांची वाट पहात उभी राहिली. ते दिसताच त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या पायावर डोके ठेवून रडू लागली. महाराजांनी मुलीला उठवली आणि दुःखाचे कारण विचारले. तिने सर्व सांगितल्यावर नाथ

म्हणाले, " जा स्वस्थ रहा. काही काळजी करू नको. रामाच्या कृपेने सर्व ठीक होईल. संतवचनाने बाईला धीर आला आणि नाथांच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवून ती घरी येऊन स्वस्थ बसली. अर्धवट विश्वासाने शांतता मिळत नाही. उलट काळजी वाटते. नाथमहाराज स्नान करून सोवळ्याने नदीवरून परत येत होते. वाटेत ईश्वरी प्रेरणा झाली आणि नाथांचे पाय त्या बाईच्या घराकडे वळले. " काय हो हा साधू ! दिवसाढवळ्या असल्या बाईच्या घरी जातो आणि पुन्हा तो सुद्धा सोवळ्याने ! शिव, शिव ! ! म्हणे आत्मज्ञानी संत." कुटाळकट्ट्यावरच्या फुकट फौजदारी, आत्मस्तुती आणि परनिंदा करणाऱ्यांचे हे उद्‌गार ! पण एकनाथांना त्याची थोडीच पर्वा होती ! परदुःखनिवारण हेच संतकार्य. नाथमहाराज शांतपणे त्या बाईच्या माडीचा जिना चढू लागले. त्या बाईच्या दासीने महाराजांना येताना पाहिले आणि आश्चर्यचकीत होऊन तिने बाईला वर्दी दिली. तिलाही हे समजेना की ही काय भानगड आहे. नाथमहाराज—जो जितेन्द्रिय सद्‌गुणांचा पुतळा—आणि माझ्या घरी ? एका क्षणात तिच्या मगळ्या विकृत जीवनाचे घाणेरडे व्यंगचित्र तिच्या डोळ्यासमोर उभे राहिले आणि तिला म्हणाले, " अहाऽहा ग बाई ! कुठल्या भ्रष्ट हातांनी ह्या संताची तू आता पूजा करशील ? या विडे खाल्लेल्या किळसवाण्या तोंडाने का तू त्यांची स्तुती करशील ? पण केवढे तुझे भाग्य ! साक्षात् ब्रह्मच तुझ्याकडे येत आहे. आता तरी उद्धार करून घे. " आणि खरोखर तिच्या उद्धाराचा क्षण आला.

**' देवाचिया द्वारी उभा क्षणभरी, तेणे मुक्तो चारी साधियेल्या ।**

देवच तिच्या समोर आला. नाथांना तिने बसण्याकरता पाट मांडला आणि पूजा करण्याकरिता पुष्पहार आणला. देवासमोर, भरून आलेल्या अंतःकरणाने, क्षणभर हात जोडून ती उभी राहिली. त्या क्षणात अहंकार गळून गेला. ती निर्मोह झाली, आणि तिने त्यांच्या पाया पडून मार्गदर्शनासाठी प्रार्थना केली.

आमच्या कुटाळ कामगारांनी इत्थंभूत सर्व वातमी रामचंद्रपंतांना कळविली. "अहो पंत, काय हो, तुमची ती बाई अगदीच लबाड आणि विश्वासघातकी दिसते. शेवटी आपल्या जातीवर गेलीच. तिला पैसे तुम्ही देता ना ? तुमची सगळी इस्टेट गेली की हो तिच्या घरात, आणि तिच्या घरात तर दिवसा ढवळ्या एकनाथ हारतुरे करून घेताहेत. हे शोभते का तिला ?" पंत भडकले, आणि त्या क्षणी तिच्या घरी येण्यास निघाले. तिच्या घराशी येतात तो ही गर्दी ! रामचंद्रपंतांनी रागारागाने लोकांना धक्के-बुक्के देऊन बाजूला केले, आणि ते जिना चढू लागले. त्याच क्षणी गळ्यात हार घातलेली, पीतांबर नेसलेली नाथांची शांत मूर्ती—पांडुरंगाचेच ध्यान ते—खाली उतरत होती. जिन्यातच जीवाशिवाची दृष्टादृष्ट झाली. व्हावयाचा तोच परिणाम झाला. रामचंद्रपंत मान खाली घालून त्याच पावली परत फिरले,

१२५९

तडक घरी आले, आणि गुडघ्यांत डोके खुपसून लहान मुलासारखे ओक्साबोक्शी रडू लागले. इकडे नाथमहाराज शांतपणे घरी गेले. कसले बरे हे रडणे? पश्चात्तापाचे का? नाही. संतकृपेने मागच्या सगळ्या ओंगळ जीवनाचे भस्म झाल्याबद्दल नकळत होत असलेल्या आनंदाचे हे अश्रू! खरा पश्चात्ताप झाला तर मनुष्याला सद्‌गती का मिळू नये?

बाईला तर उपरती झालीच होती. तिने ठरविले की राहिलेले सर्व आयुष्य संतसेवेत घालवावयाचे. ह्या उद्देशाने ती थोड्याच वेळात नाथांच्या घरी गेली. इकडे रामचंद्रपंत रडतच होते. त्यांच्या प्रत्येक अश्रूबरोबर पाप धुवून जाऊन अंतःकरण शुद्ध होत होते. सीताबाईंनी बरीच आर्जवे केल्यावर डोळ्यावरची धुंदी गेलेल्या रामचंद्रपंतांनी घडलेली सर्व हकीगत सांगितली. सीताबाईला गहिंवरून आले. आपल्यासाठी महाराजांनी केवढा लोकाक्षेप पत्करला. ती दोघे जण उद्धारकर्त्याच्या पाया पडण्याकरिता नाथांच्या घरी गेली. तो तेथे ही बाई दृष्टीस पडली. संतांच्या सान्निध्यात देहाचे पापी आकर्षण कोठून उत्पन्न होणार? दोघेही निर्मोह झाले होते. नाथांनी दोघांनाही यथोचित उपदेश केला. दोघांच्याही जीवनक्रमात योग्य पालट झाला. मनात झाला होताच! आता राहिलेले आयुष्य सदाचरणात, सत्कृतीत आणि संतसमागमात गेले. त्या दोघांची **'मनोमार्गी गेला तो तेथे मुकला ।'** अशी स्थिती झाली होती, **हरिपाठी स्थिरावला तोची धन्य ।।** अशी स्थिती नंतर झाली. व्यसनी माणसे नेहमी दुर्बल असतात, आणि वेळ येईपर्यंत त्यांना या दुर्बलतेची जाणीव नसते. अशा माणसावर सदाचारी माणसाच्या त्यागी वर्तनाचा परिणाम होतो. तो जरी सुधारला नाही तरी त्याच्या नीचपणाची जाणीव त्याला नक्कीच होते. ही जाणीव होणे हाच उन्नतीचा अंकुर. सर्वच विषयलंपट माणसे आततायी असतात. पण ह्या आततायीपणाचा एक विशेष गुण आहे. या आततायीपणाची दिशा बदलली की तीच माणसे ईशसाक्षात्कार करून घेण्यास योग्य ठरतात. भक्त तुलसीदासाचे उदाहरण प्रसिद्धच आहे. पत्नीच्या एका वाक्याने त्याचा सर्व आयुष्यक्रम बदलला. प्रेत हा त्याला लाकडाचा ओंडका वाटला, आणि सापावर दोराची कल्पना झाली. हा सर्व मनाचा खेळ, आणि पत्नीच्या ठिकाणी असलेली प्रेमभावना. अशाच प्रकारे आततायीपणाची किंवा एकाग्रतेची दिशा बदलल्यानेच 'तुलसीरामायण' उदयास आले. बिल्वमंगल आणि सूरदास यांच्या कथा अशाच तऱ्हेच्या नाहीत का?

## अग्निहोत्री ब्राह्मण

एकनाथमहाराजांच्या घरी एक दिवस एक अग्निहोत्री ब्राह्मण आला. नाथांनी लगेच त्याची राहण्याची सोय केली. नाथांनाही, आपल्या घरी अग्निहोत्री ब्राह्मण आला म्हणून आनंद झाला. थोड्याच दिवसांनी तो जाऊ लागला. पण नाथांनी

त्याला आणखी राहण्याची विनंती केली. तो चांगला महिनाभर राहिला. पण आश्चर्य हे की तो रोज प्रकृतीने बिघडत होता. रोज चांगले सात्त्विक अन्न खाऊन हा असा का, म्हणून सर्वांना आश्चर्य वाटे.

"आपल्याला काय होते आहे ? काही कमी आहे का ? काही पाहिजे असल्यास सांगा." असे नाथमहाराज म्हणाले, "अशी संकोचित वृत्ती नका ठेवू. मी नाही का तुमच्याशी मोकळेपणाने बोलत ? तुम्ही माझ्या घरी पाहुणे म्हणून राहता. तुम्हाला तृप्त करणे माझे कर्तव्य आहे. तरी तुम्ही मोकळेपणाने सांगा." ब्राह्मणाने पुष्कळ आढेवेढे घेतले. कारण, कारणच तसे लाजिरवाणे होते. शेवटी नाही होय करता करता त्या ब्राह्मणाने सांगितले की त्याला गिरिजाबाईबद्दल कामवासना निर्माण झाली, आणि म्हणून काहीच खाणे अंगी लागत नाही. कामी मनुष्य निर्लज्ज असतो असे म्हणतात ते काही खोटे नाही. ज्या माणसाच्या घरचा पाहुणचार घ्यायचा, त्याच्याच धर्मपत्नीबद्दल, त्याच्याचजवळ असली नीच वासना व्यक्त करायची ! असो. नाथांचे उत्तर तर ऐका ! ते म्हणाले, "अहो, एवढेच ना ? मग मला पूर्वीच का नाही सांगितले ? कशाला उगीच इतके मन दुःखी करून घेतलेत ?" काय हा शांतपणा ! बोलून चालून ठेवलेल्या बाईकडे जरी दुसरा माणूस गेला तरी पहिल्या माणसाला द्वेष, राग आणि मत्सर वाटतो, तर स्वतःच्या धर्मपत्नीबद्दल असे उद्‌गार काढल्यास सामान्य माणसाला काय वाटेल ? ही उद्धटपणाची आणि हलकटपणाची कमाल नाही का ?

नाथमहाराज लगेच आत गेले आणि गिरिजाबाईला सर्व हकीगत सांगून म्हणाले, "आज रात्री तू त्या ब्राह्मणाला, मीच आहे असे समज, आणि त्याची सेवा कर." पतीची आज्ञा. पती वाईट सांगणारच नाही ही श्रद्धा ! पती म्हणजे देव. आणि देव आपल्या वाईटाचे कसे सांगेल किंवा आपले अहित कसे करील ? काही लोक विचारतील की इतकी श्रद्धा ठेवणे योग्य आहे काय ? साधारणपणे कोणीही मनुष्य आपल्या पत्नीची अब्रू जाईल अशी गोष्ट करावयास सांगेल का ? तिला दुराचार करावयास लावील का ? जो असे सांगेल तो पतीच नव्हे ! पण हल्ली एकमेकावरचा विश्वासच कमी झाला आहे, आणि अहंकार वाढला आहे. स्त्रीचे घरातल्यापेक्षा बाहेरचे कर्तृत्वच अधिक महत्त्वाचे अशी कल्पना रूढ होत चालली आहे. हल्ली तरी या वृत्तीमुळे पुरुषांमध्ये गैरस्पर्धा आणि अनीती वाढत आहे. हा पाश्चात्य संस्कृतीचा परिणाम आहे यात मुळीच शंका नाही. पण आमची मने मात्र अजून आमची संस्कृती अजिबात उखडून टाकावयास तयार नाहीत.

एकदा एक मनुष्य म्हणत होता की एअर होस्टेसचे काम फारच चांगले. पगार पुष्कळ मिळतो, इतर देश पाहण्याची संधी मिळते, आणि ती मुलगी जरा मोकळेपणाने, मिळूनमिसळून वागली, तर सर्व बाहेरचा खर्चही निघतो. सुशिक्षित म्हणव-

णाऱ्या हिंदूधर्मीय माणसाचे १९५७ सालचे हे उद्‌गार ! काय ही मानसिक अधोगती! केवळ पैसा हेच माणसाचे ध्येय झाले म्हणजे मग कशालाच किंमत राहात नाही. माणसाची वृत्ती केवळ सुखलोलुप झाली तर ते राष्ट्र कधीही उन्नतावस्थेला जाणार नाही. आणि नेमकी हीच प्रवृत्ती सांप्रतच्या काळात आपल्या देशात वाढत आहे, आणि त्याला पायबंद घालणे हे पुढारी म्हणवणाऱ्या व्यक्तींचे कर्तव्य आहे.

त्या दिवशी रात्री जेवण झाल्यावर, एकनाथांच्या सहवासामुळे उत्पन्न झालेल्या शांततेने गिरिजाबाई त्या ब्राह्मणाच्या खोलीत विडा घेऊन गेली. गिरिजाबाईला पाहिल्यावर तो ब्राह्मण अगदी ओशाळला. पण आनंदितही झाला. तबकात आणलेला विडा त्याने घेतला व खाल्ला. गिरिजाबाई तेथेच उभी होती. विडा चघळल्यानंतर थुंकण्यासाठी तो इकडेतिकडे पाहू लागला. तेव्हा गिरिजाबाई म्हणाली, "जरा थांबा महाराज, मी पात्र घेऊन येते." ती आत गेली आणि थोड्याच वेळात रसरसलेल्या निखाऱ्यांनी भरलेली शेगडी घेऊन आली, आणि तात्पुरता पती समजलेल्या त्या अग्निहोत्री ब्राह्मणास म्हणाली, "या विस्तवावर थुंका महाराज." त्या ब्राह्मणाला थोडा राग आला आणि तो म्हणाला, "मी अग्निहोत्री ब्राह्मण, आणि मला अग्नीवर थुंकायला सांगता ? " गिरिजाबाई नम्रतेने म्हणाली, "त्यात काय मोठेसे ? ज्या पुरुषाला आपल्याला पाहुणचार देणाऱ्याच्या मंडळीकडे पापवासनेने पाहण्याचे धाडस होते, त्याला अग्निनारायणाची काय एवढी पर्वा वाटावी ! अरेरे ? इतकी वर्षे अग्नीची उपासना करूनसुद्धा आपल्या वासनांचे भस्म झाले नाही ना ?" झा. . .ले ! त्या ब्राह्मणाची कामांध दृष्टी खाड्कन उघडली. तो जागा झाला. मातृभावनेने गिरिजाबाईच्या पाया पडला आणि त्याला शिवशक्तीच्या कृपेने उपासनेचा खरा अर्थ कळला.

त्या ब्राह्मणासारखे उपासना करणारे अनेक कर्मठ लोक प्रत्येक समाजात नेहमीच असतात. त्यांतील काहीजणांना उपासनेचा खरा अर्थच कळत नाही. शब्दकोषातील अर्थ जरी पाहिला तरी उपासना म्हणजे पूजा, भक्ती किंवा सेवा असा आहे. एकीकडे देवाची भक्ती करावयाची आणि बाकीचा वेळ लोकांना बुडविण्यात, आत्मस्तुती आणि परनिंदा करण्यात घालवावयाचा. 'शंकर मामंजी'च्या सारखी देवपूजा करायची काय ? पण ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे की स्नान-संध्या-देवपूजा वेळच्या वेळी मोठ्या दक्षतेने करणाऱ्यांपैकी बऱ्याच जणांच्या अंतःकरणांत भूतदया नावालाही नसते. रूढीने चालत आलेले रिवाज त्यातील मर्म न ओळखता पाळण्याचा जो तो प्रयत्न करतो. पुष्कळांना कर्मठपणाचाच इतका अहंकार असतो की, कर्मातील मर्म विसरून जाऊन केवळ कठोरता मात्र उत्पन्न होते. 'प्रत्येकाच्या प्रारब्धान्वये सर्व गोष्टी घडत असतात' या सबबीवर प्रत्येकजण आपली बाजू राखण्याचा प्रयत्न करतो. भुकेने रडत असलेल्या भिकाऱ्याच्या पोराला पाहून,

तरुण पतिव्रता विधवा झालेली पाहून, औषधाअभावी मरणव्याधींनी तडफडत असलेले रोगी पाहून ज्याचे अंतःकरण पिळवटत नाही त्याच्या कर्मठपणाला कवडीइतकी किंमत नाही. भूतदया हेच प्रत्येक कर्माचे सार आणि प्रत्येक धर्माचे ब्रीद असावयास पाहिजे. या तत्त्वाचे, जो धर्म, जो समाज, जे राज्य किंवा ज्या व्यक्ती उल्लंघन करतात, त्यांना कधीही मानाचे आणि अधिकाराचे स्थान मिळणे योग्य नाही. आणि दुर्भाग्याने ते मिळालेच तर त्यामुळे लोककल्याण होत नाही.

## कोठलाही दगड परिसच

पैठण गावात एक दरिद्री ब्राह्मण राहात असे. त्याने एका देवतेची आराधना केली. उपास्य देवता प्रसन्न झाली, तेव्हा ब्राह्मणाने वर मागितला की त्याचे दारिद्र्य जावे, आणि तो श्रीमंत व्हावा. देवता 'तथास्तु' म्हणाली, आणि तिने त्याला एक परिस दिला. कोठल्याही लोखंडाच्या तुकड्याला त्याचा स्पर्श झाला की त्याचे सोन्यात रूपांतर व्हावयाचे. यामुळे त्या ब्राह्मणाची सर्व काळजी दूर झाली, आणि तो आनंदात राहू लागला. काही दिवसांनी त्याने पत्नीसह तीर्थयात्रेला जाण्याचा बेत केला. पण प्रश्न असा पडला की परिस कोणाजवळ ठेवावयाचा? कारण बरोबर नेला तर प्रवासात हरवण्याची भीती होती. त्याच्या लक्षात आले की एकनाथ साधुपुरुष आहेत. त्यांच्याजवळ ठेवला तरच यात्रेहून येईपर्यंत तो सुखरूप राहील.

ब्राह्मण तो परिस घेऊन एकनाथांकडे गेला. त्यावेळी नाथमहाराज पूजा करीत बसले होते. नाथांच्या सांगण्यावरून उद्धवाने ब्राह्मणाला आत पाठवले. परिसाच्या गुणाव्यतिरिक्त नाथांना त्याने यात्रेची सर्व तजवीज सांगितली. नाथांनी तो दगड सांभाळण्याचे कबूल केले, आणि म्हणाले, "तीर्थयात्रेला जाताच आहात तर दानधर्म करण्यात खूप द्रव्य खर्च करा." नाथांनी तो दगड तसाच देव्हाऱ्याच्या खाली सारून ठेवला. निर्माल्यसुद्धा तिथेच ठेवला जात असे. उद्धव किंवा श्रीखंड्या तो निर्माल्य उचलून गंगेत टाकीत असत. एक दिवस त्या निर्माल्याबरोबर श्रीखंड्याने तो दगडसुद्धा नदीत टाकून दिला. नाथ तर त्या दगडाची आठवणही विसरले होते.

दीड दोन वर्षांनी ते दोघेजण यात्रा संपवून पैठणास परत आले. आल्याबरोबर तो ब्राह्मण नाथांच्याकडून तो दगड नेण्याकरिता त्यांच्याकडे आला. यात्रेत परीस जवळ नसल्यामुळे बहुतेक सर्व पैसे संपून गेले होते. त्याने दगड मागितल्यावर नाथांना त्याची आठवण झाली आणि त्यांनी आपल्या दोघा सेवकांना त्याबद्दल विचारले. श्रीखंड्या म्हणाला, "मला त्या दगडाचे काहीच महत्त्व वाटले नाही, आणि आपणही काही सांगितले नव्हते, म्हणून मी तो नदीत टाकून दिला." त्या ब्राह्मणाने नाथांवर चोरीचा आरोप घेतला. कुटाळकट्ट्यावरच्या लोकांना अशी

काहीतरी चुरचुरीत बातमी हवीच होती. त्यांनी लगेच ही चोरीची वार्ता गावभर पसरवली. नाथांना दगड गेल्याबद्दल वाईट वाटले, पण आता इलाज नव्हता. श्रीखंड्याने सुचविले की, महाराजांनी नदीतील कोणताही एक दगड त्या ब्राह्मणाला द्यावा. नाथमहाराज श्रीखंड्याच्या बोलण्याला नेहमी महत्त्व देत असत.

महाराज आणि तो ब्राह्मण दोघे नदीवर गेले. महाराजांनी एक ओंजळभर दगड उचलले आणि त्यांतून त्याला त्याचा दगड घेण्यास सांगितले. ब्राह्मणाला सर्व थट्टाच वाटली. हे सर्व दगड परिस थोडेच असणार ! त्याने परीक्षा करण्याकरिता प्रत्येक दगड लोखंडाला लावून पाहिला. तो काय चमत्कार ! प्रत्येक दगड परीसच होता. ब्राह्मणाचे डोळे चटकन् उघडले. त्याचा पहिला दगड हरवला हे त्याचे भाग्यच ! नाथांचा महिमा त्याला कळला आणि इतक्या थोर साधुपुरुषाला दोप दिल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला.

परिसाचे आणि धनाचे महत्त्व त्याला वाटेनासे झाले. नाथांसारख्या साधुपुरुषाच्या सेवेतच सोने आहे अशी त्याची खात्री झाली. त्याचे यापुढील सर्व आयुष्य संतसेवेत आणि ईशचिंतनात गेले. त्याच्या जीवनाचेच सोने झाले. नामस्मरण हा परीस आहे, आणि सत्कर्म हे सोने आहे. ह्या दोन्हींपैकी कोणालाही काहीही चोरता येत नाही. नामस्मरणरूपी परिसाची शक्ती कमी न होता नेहमी वाढतच जाते; आणि सत्कर्मरूपी सोन्याचा भावही नेहमी वाढतच असतो, आणि हे सोने जितके लुटावे त्याच्या कितीतरी पट मनःशांतीच्या रूपाने आपल्याला परत मिळत असते. त्यात अहंकार मात्र नसावा.

## महाराज चांभाराकडे गेले

एकनाथमहाराज एकदा पूजेला बसलेले असताना एक गृहस्थ त्यांना भेटावयास आला. लक्ष्मीबाई, नाथांची स्नुषा, पारमार्थिक दृष्टीने फार उच्च कोटीतली मुलगी होती. हरिपंडिताच्या आधीच तिला एकनाथमहाराजांची योग्यता कळली होती.

त्या ब्राह्मणाने नाथमहाराज कोठे आहेत म्हणून विचारल्यावर लक्ष्मीबाई म्हणाली, "आपण थोडावेळ बसा. महाराज चांभाराकडे गेले आहेत." तो गृहस्थ बुचकळ्यात पडला. नाथमहाराज तर आत पूजा करीत बसले आहेत आणि ही मुलगी धडधडीत खोटे सांगते आहे हे कोडे त्याला उलगडेना. थोड्याच वेळात पूजा आटोपली आणि महाराज बाहेर आले. जे काही काम होते ते झाल्यावर तो गृहस्थ विचार करीतच निघून गेला.

नाथ आत आले आणि लक्ष्मीबाईला उद्देशून म्हणाले, "बाळे, मघाशी मी पूजेला बसलो असताना तू त्या गृहस्थाला मी चांभाराकडे गेलो आहे म्हणून सांगितलेस

याचा अर्थ काय ?" स्नुषा नम्रतेने म्हणाली, "महाराज, आपण त्या वेळी मनात म्हणत नव्हता का की इतके दिवस झाले पण चांभाराने अजून जोडा आणून दिला नाही, तरी त्याला एकदा विचारले पाहिजे." महाराज हे उत्तर ऐकून थक्क झाले, कारण त्या वेळी खरोखरी हाच विचार त्यांच्या मनात आला होता. पूजेला बसलेले असताना नाथांसारख्या संताचे मनसुद्धा इतके भटकते तर सामान्य माणसाला ध्यान-साधना करणे किती कठीण असेल ! नाथांनी विचारले, "हे खरे, पण हे तुला कसे कळले ?" लक्ष्मीबाई म्हणाली, "आपल्यासारख्या आत्मज्ञानी संतांच्या सहवासात राहिल्यावर काय अशक्य आहे ? आपल्याच कृपेने मला हे ज्ञान आले."

संतसंगतीने पापी मनसुद्धा बदलून निर्मळ होते, तर आधीच निर्मळ असलेल्या मनाला ही शक्ती येणे का कठीण आहे ? लक्ष्मीबाई पतिव्रता होती, आणि पति-व्रतेची शक्ती कशी असते याबद्दल आपल्या पुराणात अनेक कथा आहेत. सावित्री आणि अनसूयेची आख्याने तर प्रसिद्धच आहेत.

एका यतीची गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. एक यती एका झाडाखाली तपश्चर्या करीत बसला होता. त्या झाडावर दोन पक्षी किलबिल करीत होते. या यतीमहाराजांना त्या आवाजाने त्रास झाला. त्यांनी रागाने वर पाहिले. त्यांच्या दृष्टीच्या सामर्थ्याने बिचारे पक्षी मरून पडले. सामर्थ्य आले की त्याच्या जोडीला जर प्रेमाची किंवा नम्रतेची साथ नसेल तर त्या सामर्थ्याचा दुरुपयोगच अधिक केला जातो, आणि त्या सामर्थ्याला अहंकाराची साथ मिळाली तर मग विचारायलाच नको ! नित्याप्रमाणे तो यती गावात भिक्षा मागण्याकरिता एका घरी गेला. घरातल्या गृहलक्ष्मीने सांगितले, "महाराज, जरा थांबा. मी करीत असलेले पतीचे काम संपले की लगेच भिक्षा घालते." यतीला त्याच्या सामर्थ्याचा फार अहंकार होता. तो म्हणाला, "तावडतोब भिक्षा घाला. मी काय सामान्य भिक्षेकरी आहे ?" आतून पतिव्रतेचा आवाज आला. "जरा थांबा. पतिसेवा झाल्याबरोबर भिक्षा घालते. आपण विनाकारण का रागावता ? मी म्हणजे काही रानातील पक्षी नाही." हे वाक्य ऐकताच यतीचा अहंकार तावडतोब गळाला. त्याने अन्नाची भिक्षा न मागता त्या पतिव्रतेजवळ ज्ञानाचीच भिक्षा मागितली. असे सामर्थ्य मिळण्याकरिता तरी बायकांनी पतिव्रता धर्म पाळावा.

## नाथमहाराज ब्रह्मचारी होते

नाथमहाराज गोदावरीच्या ज्या बाजूला राहात असत त्याच्या पलीकडच्या तीरावर एक देऊळ होते. एक दिवस पुरणपोळीचा नैवेद्य घेऊन त्या देवळात दाखवून आणावयाचा असे ठरले. गिरिजाबाई जेव्हा नैवेद्याचे पान घेऊन नदीकाठी आल्या

तेव्हा नदी दुथडी भरून वाहात होती. नदी ओलांडून पलीकडे जाणे शक्यच नव्हते. बाई परत आल्या. महाराजांनी चौकशी केल्यावर तिने परत येण्याचे कारण सांगितले. महाराज म्हणाले, "असे कसे होईल ? तू नदीकाठी जा आणि नदीला सांग की माझे पती जर खरे ब्रह्मचारी असतील तर मला पलीकडे जायला वाट दे." पण गिरिजाबाई म्हणाल्या, "मी असे म्हणू तरी कसे ?" नाथ म्हणाले, "जा आणि मी सांगतो तसे कर तर खरे." ज्या बाईला तीन मुले झाली आहेत तिचा पती म्हणे ब्रह्मचारी !

गिरिजाबाई नदीवर गेल्या आणि नदीला उद्देशून महाराजांनी सांगितल्याप्रमाणे म्हणाल्या. आणि काय चमत्कार ? त्यांनी ते वाक्य उच्चारताच नदीचे पाणी दुभंगले. गिरिजाबाई पलीकडे गेल्या आणि नैवेद्य दाखवून परत आल्या. लगेच पाणी पूर्ववत् वाहू लागले. गिरिजाबाई आश्चर्य करीतच घरी आल्या आणि त्यांनी नाथमहाराजांना ह्या घटनेचा अर्थ विचारला. नाथ म्हणाले, "याचे उत्तर पुन्हा केव्हातरी देईन." आश्चर्य वाटण्यासारखीच ही घटना होती.

नाथमहाराज ब्रह्मचारी कसे आणि नदी कशी दुभंगली हे दोन स्वतंत्र प्रश्न आहेत. पूर्वीसुद्धा असे चमत्कार घडलेले आहेत. वसुदेवाला वाट देण्याकरिता भगवान् कृष्णाच्या अंगठ्याचा स्पर्श होताच यमुना नदी दुभंगली. ही पुराणातली गोष्ट वाटल्यास सोडून द्या. पण तीन हजार वर्षांपूर्वी इजिप्तमधल्या लोकांनी यहूदी लोकांचा छळ केला, म्हणून यहूदी लोक तो देश सोडून जात होते. मोझेस त्यांचा पुढारी होता. तांबडा समुद्र ओलांडून जाण्याचा प्रश्न आला. तेव्हा मोझेसने प्रार्थना केल्यावर सबंध समुद्र दुभंगला आणि लोकांना इस्रायल देशाकडे जाण्यास वाट मिळाली.

काही दिवस गेल्यानंतरची गोष्ट. नाथमहाराजांचे जेवण झाले आणि गिरिजाबाई जेवण करीत होत्या. नाथांनी भयंकर रागावल्याचे सोंग घेतले. डोळे लाल करून हातात तलवार घेतली आणि ते स्वयंपाकघरात गेले. गिरिजाबाईच्या पानात भराभर पुरणाच्या पोळ्या वाढल्या, आणि म्हणाले मी दहा अंक मोजायच्या आत सगळ्या पोळ्या खाऊन टाक. गिरिजाबाई म्हणाल्या, "हे आहे तरी काय? आणि .." नाथ रागाने म्हणाले. "हे नाही आणि ते नाही. एक शब्द बोलू नकोस. दहा अंक मोजायच्या आत सगळ्या पोळ्या खाल्ल्या नाहीस तर डोके उडवीन." बाईंनी भराभरा पोळ्या कशातरी तोंडात कोंबल्या आणि गिळल्या. पतीची आज्ञा आणि देहाचे भय ! नाथांचा खोटाच आणलेला राग तो. जा म्हटल्याबरोबर गेला. नेहमीच्या शांतपणाने त्यांनी आपल्या पत्नीला विचारले, "काय गं आजच्या पोळ्यांतील वेलचीचा स्वाद फार छान होता नाही ?" गिरिजाबाई म्हणाल्या, "कसला स्वाद आणि कसले काय ! पोळ्या कशातरी कोंबल्या झालं ! त्या खाताना कसला आनंद वाटणार ?" नाथ म्हणाले, "आता मिळाले ना तुझ्या प्रश्नाचे उत्तर ?"

**मा कुरु धन-जय-यौवनगर्वं हरति निमेषात्कालः सर्वम् ।**
**मायामयमिदमखिलं बुद्ध्वा ब्रह्मपदत्वं प्रविश विदित्वा ।।**

काळाची तलवार डोक्यावर लटकत असताना आणि मनाने सारखे नामस्मरण चाललेले असताना जो ज्ञानी जागृतावस्थेत आहे, त्याला रामनामाशिवाय इतर कशातही खरा आनंद वाटत नाही.

**ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।**
**आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ।।**

त्याचे शरीर क्रिया करते, परंतु मन त्यात अडकत नाही, आणि मन रमल्या-वाचून कोणत्याही गोष्टीचा आनंद मिळत नाही. ब्रह्मचर्य ही केवळ शरीराची अवस्था नसून मनाचीही असू शकते, हेच सांगण्याचा या गोष्टीचा उद्देश आहे.

## काशीहून हरिपंडित परत येतो

हरिपंडिताला त्याच्या वडिलांच्या काही गोष्टी आवडेनाशा झाल्या. विशेषतः प्राकृतात पुराण सांगणे हे त्याला कमीपणाचे आणि अपमानास्पद वाटू लागले. असे करणे म्हणजे संस्कृत भाषेचा आणि ग्रंथांचा अपमान आहे असे इतर काही पंडितांप्रमाणे त्यालाही वाटू लागले. तसेच, सर्व जातीचे लोक पुराणश्रवणास एकत्र बसतात हेही त्याला आवडत नसे. स्पृश्यास्पृश्यतेबद्दल तो फार कडक बंधन पाळीत असे. त्यामुळेच एकनाथमहाराज कोणाकडेही जेवावयास जातात याचा त्याला फार राग येई. भूतदयेचे खरे मर्म त्याला कळत नव्हते. हा मतभेद विकोपाला नेण्यात कुटाळकट्टयावरच्या लोकांचा थोडाफार हात होताच. बापलेकांचे सख्य पुष्कळ लोकांना पाहवत नाही, आणि आपल्या प्रयत्नाने जर त्यांच्यांत बेबनाव झाला, तर ते स्वतःवर खूप होतात.

ह्या मतभेदामुळे हरिपंडिताने काशीस जाऊन, वडिलांपासून वेगळे राहण्याचे ठरविले. वडिलांची परवानगी घेऊन तो काशीस गेला. तो आणि त्याची पत्नी लक्ष्मीबाई काशीला आल्यापासून त्यांच्या ऐहिक वैभवात पुष्कळच भर पडली होती. हरिपंडित विद्वान् होता. त्याच्या विद्वत्तेवर त्याने पैसा मिळवला आणि एक वाडा विकत घेतला. या वाड्यात दोघांचा जीवनक्रम यथास्थित चालला होता.

नाथ आणि गिरिजाबाई आता वृद्ध झाली होती. आणि स्वतःच्या एकुलत्या एका मुलाने आपल्याजवळ येऊन राहावे असे त्यांना आता वाटू लागले होते. म्हणून त्यांनी हरिपंडितास काशीहून बोलाविण्याचे ठरविले. महाराज एक दिवस स्वतः काशीस गेले. गंगास्नान आणि विश्वेश्वराचे दर्शन झाल्यावर आपल्या मुलाच्या

घरी गेले, आणि त्याला त्यांनी आपला काशीला येण्याचा हेतू सांगितला. विनाकारण मतभेद वाढू नयेत म्हणून हरिपंडित घरी परतण्यास नाखूप होता. पण दोन अटींवर त्याने घरी येण्याचे कबूल केले. त्या दोन अटी अशा—नाथमहाराजांनी प्राकृतात पुराण सांगावयाचे नाही, आणि परान्न घ्यावयाचे नाही. हा वाद म्हणजे अहंकार आणि निरहंकार यांचा अनादी काळापासून चालत आलेला वाद होता. एकनाथमहाराजांची योग्यता कुठे आणि हरिपंडित कुठे ! अहंकाराला सत्य कधीच कळत नाही. हरिपंडित विद्वान् होता. परंतु

**वेदांताचे बीज हरि हरि अक्षरे । पवित्र तो पाहे हरि एक ।।**

हे त्याला अजून कळावयाचे होते. असो. थोडी चर्चा झाल्यावर नाथांनी दोनही अटी कबूल केल्या आणि सर्वजण आनंदाने पैठणला परत आले.

परत आल्यावर नाथांनी जाहीर केले की यापुढे हरिपंडितच पुराण सांगतील. त्याप्रमाणे त्याची पुराणप्रवचने सुरू झाली. नावीन्य हे नेहमी प्रथमतः आकर्षकच असते. परंतु काही दिवसांनी मंडळी हळूहळू कमी होऊ लागली. हरिपंडिताच्या पुराणात विद्वत्ता आणि पांडित्य खूप असे. पण आर्तता, कारुण्य आणि भावना यांचा अभाव होता. लवकरच हरिपंडिताला कळून आले की, केवळ पांडित्यावर लोकसंग्रह होत नाही. त्याने लगेच वडिलांना प्राकृतातून पुराण सांगावयास मोकळीक दिली.

सर्वसाधारण माणसे जरी विद्वत्तेला मान देत असली तरी ती भावनाप्रधान असतात. एखाद्या गूढ विषयावर तर्कशुद्ध, विद्वत्ताप्रचुर भाषण ऐकले तर मनात आदर आणि गांभीर्य निर्माण होते,-पण शांततेचा लाभ होत नाही. पण तेच, सिनेमा-गृहात, कीर्तनात किंवा पुस्तक वाचताना एखाद्या करुण रसात्मक प्रसंगाने अंतःकरण कळवळते, आपण ढसाढसा रडू लागतो. आपण त्या प्रसंगाशी इतके एकरूप होऊ शकतो. विद्वत्तेचे तसे नाही. त्याला अभ्यास लागतो. एकरूपता हेच कोणतेही ध्येय साधण्याचे खरे वर्म आहे. सतत नामस्मरण करण्याचा हेतूही एकात्मता, एकाग्रता हाच आहे. म्हणूनच मुक्तेश्वर म्हणतात,

**रघुकुल टिळकाचे नाम वाचे वसो दे । विषयरतिसुखाचा काम जीवी नसो दे ।**
**मग तुज नलगे ती मुक्ति चिंता कराया । परमगति विमुक्ति आप लागे वराया ।।**

## गाढवाला गंगा दिली

काशीहून परत येताना रामेश्वरला नेण्यासाठी नाथांनी गंगेची एक कावड आणली. इतर यात्रेकरूंनीही आपापल्या कावडी बरोबर आणल्या होत्या. पैठणला पोहोचल्यावर सर्वांनी नदीत स्नान करावयाचे आणि नंतर घरी जावयाचे असा बेत केला, आणि कावडी नदीतीरावर ठेवल्या. एवढ्यात जवळच एक गाढव तडफडताना

दिसले. सर्वांनाच वाटले की त्याला पाणी पाजले आणि त्याच्या अंगावर पाणी शिंपडले की ते तरतरी येऊन शांत होईल.

पाणी आणण्यासाठी म्हणून काहीजण नदीकडे जाऊ लागले. नाथमहाराज म्हणाले, "इथे कावडीत गंगोदक असताना तुम्ही नदीवर कशाला जाता? हा रामेश्वरच गाढवाच्या रूपाने आला आहे." असे म्हणून आपल्या कावडीतले पाणी त्यांनी त्या गाढवाला पाजले आणि त्याच्या अंगावर शिंपडले. गंगेचे पाणी इथेच संपले. लगेच गाढव तरतरीत झाले आणि उठून निघून गेले. आता रामेश्वरास जाण्याचे कारणच उरले नाही. गंगेचे पाणी गाढवाप्रीत्यर्थ वापरल्याबद्दल लोकांनी नाथांची हेटाळणी केली. नंतर ते सर्वजण पुढे यात्रेला निघाले. पण नाथमहाराज पैठणलाच राहिले.

मजल दरमजल करीत यात्रेकरू मंडळी रामेश्वरला पोहोचली. पण तिथे त्यांची फारच निराशा झाली. त्यांना तेथे रामेश्वराची पिंडीच दिसेना. थोडे दिवसांनी सर्व मंडळी पैठणास परत आली. त्यांनी हा सर्व वृत्तांत नाथांना सांगितला. पण त्यांना त्याचे काहीच आश्चर्य वाटले नाही. कारण त्यांनी त्या यात्रेकरूंना आधीच सांगितले होते की रामेश्वर त्या गर्दभाच्या रूपाने त्यांना भेटायला आणि त्यांच्या भूतदयेची परीक्षा पाहायला पैठणला आपण होऊन आला होता. असा अनुभव आल्यावर मात्र त्यांना नाथांची थोरवी समजली. साधू ओळखण्यासाठी आपली सुद्धा तितकी पात्रता असावी लागते.

काही चरित्रकार हाच प्रसंग निराळ्या तऱ्हेने सांगतात. हरिपंडिताने काशीहून येतांना गंगेची कावड आणली. पैठणला पोहोचल्यावर घरी जाण्यापूर्वी तो गोदावरीवर स्नान करण्यास गेला. नदीकाठी कावड ठेवली. त्याला भेटण्यास एकनाथमहाराज तिथे गेले. तो त्याच वेळी त्यांना एक गाढव तडफडताना दिसले. क्षणाचाही विचार न करता नाथांनी कावडीतील गंगोदक गाढवाच्या अंगावर शिंपडले आणि त्याला पाजले. हरिपंडिताला हे पाहून अतिशय राग आला. पण करणार काय? आता रामेश्वराला जाण्यातही काही अर्थ नव्हता. नाथमहाराजांनी त्याला भूतदयेचे महत्त्व पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. पण ते त्याला पटले नाही. नाथांशी मुळीच न बोलता तो घरी आला आणि रागाने झोपी गेला. रात्री त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात एक ब्राह्मण आला आणि म्हणाला, "तुला तुझ्या वडिलांची थोरवी अजून समजली नाही? मी रामेश्वर स्वतः दर्शन देण्याकरिता आलो होतो. तुला फक्त माझे बाह्यरूप दिसले. पण नाथांनी मला ओळखले." सकाळी उठल्यावर हरिपंडिताचा राग उतरला, आणि त्याने वडिलांच्या पायावर डोके ठेवले.

परमात्मतत्त्व अनेक रूपांनी नटले आहे हा अनुभव येणे म्हणजेच ब्रह्मज्ञान. विशिष्ट रूपांनी तो संतांच्याकडे येतो. अशा गोष्टी संतचरित्रांत आहेत. नाम-

देवांच्यावर गुरुकृपा झाली आणि मगच ते श्वानरूपाने आलेल्या पांडुरंगाला ओळखू शकले. आपल्यांत एक चाल आहे. कुठेही घराचे बाहेर किंवा सहलीला गेलो आणि तेथे काही खाल्ले तर आपण खाण्यापूर्वी थोडेसे अन्न काढून ठेवावे. त्याने सूक्ष्म योनींतील जीव तृप्त होतात, आणि आपल्या भूतदयेची परीक्षा पहाण्याकरता आला असलाच तर परमात्माही संतुष्ट होतो. याच तत्त्वावर आपण नैवेद्य दाखवतो. सर्व अन्नच जर त्याचे आहे तर त्याला अर्पण केल्याशिवाय आपण का खावे ? आपल्या धर्मात सर्वत्र भूतदया, कृतज्ञता आणि एकरूपता यांचेच महत्त्व सांगितले आहे.

## नाथांच्या घरी श्राद्ध

दरवर्षीप्रमाणे एकनाथांच्या वडिलांच्या श्राद्धाचा दिवस आला. नित्याप्रमाणे सर्व स्वयंपाक तयार झाला. नाथमहाराज ब्राह्मणांची वाट पहात होते. इतक्यात एक आकस्मिक गोष्ट घडली. नाथांच्या वाड्यावरून एक अंत्यज आणि त्याची पत्नी जात होती. सुग्रास अन्नाचा वास काही अजब आहे. घरात तर सगळीकडे पसरतोच पण घराच्या बाहेरून येणाऱ्या जाणाऱ्यांना सुद्धा आत तयार होत असलेल्या अन्नाची जाणीव करून देतो. त्या अंत्यजापर्यंन्त त्या सुग्रास अन्नाचा स्वाद गेला. लगेच त्याच्या तोंडाला पाणी सुटले. आणि अन्नातल्या चवदार पदार्थांचे चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभे राहिले. आपल्या पत्नीला तो म्हणाला, “पाहा, ब्राह्मणाच्या घरचे अन्न कसे स्वादिष्ट असते. आपल्या नशिबी कुठे आहे असले अन्न ? आपण दुर्दैवी, महारवाड्यात राहाणारे, अस्पृश्य. आपल्याला या जन्मात तरी असले अन्न खायला मिळणार आहे का ?” कर्मधर्मसंयोगाने हे शब्द नाथमहाराजांच्या कानावर गेले. त्यांचे अंतःकरण भरून आले. अन्नही एका दृष्टीने विटाळलेच. ब्राह्मणांना वाढण्याच्या आधी त्या अन्नाचा सुवास दुसऱ्याने घेतला आणि त्या अन्नावर त्यांची इच्छा गेली. त्यामुळे ते अन्न अपवित्र झाले. ब्राह्मणांना वाढण्यास अयोग्य झाले.

नाथांनी लगेच गावातल्या सगळ्या अंत्यजांना बोलावणे केले. आणि आपल्या अंगणात सर्वांना जेवायला वाढले. लगेच घरातील सर्वांनी स्नान करून श्राद्धाचा स्वयंपाक पुन्हा नव्याने तयार केला. काही चरित्रकार गोष्टीचा हा भाग जरा निराळा सांगतात. नाथांकडे स्वयंपाक तयार होतो तोच तीन मलंग आले आणि जेवण मागू लागले. नाथांनी लगेच त्यांना सर्व अन्न दिले आणि ब्राह्मणांकरता पुन्हा स्नान करून नवा स्वयंपाक करविला. हरिपंडिताला हे वागणे मुळीच पसंत पडले नाही. ब्राह्मणांच्या आधी हे मलंग जेवणार कोण ? हरिपंडिताला फक्त ते तीन मलंग दिसले पण नाथ महाराजांना ते तीन मलंग म्हणजे श्रीदत्तात्रेयाची मूर्ती दिसली.

ही सर्व हकीगत गावात पसरली. कुटाळकट्ट्यावरच्या लोकांना संधीच हवी होती. या सर्व घटनेला त्यांनी विपरीत स्वरूप दिले. विटाळलेला स्वयंपाकच वाढणार अशी समजूत करून घेऊन बोलावलेल्या ब्राह्मणांनी जेवावयास येण्याचे नाकारले. नाथांनी सर्वांना समजावून सांगितले आणि येण्याची विनंती केली. पण ब्राह्मण आपला हट्ट काही सोडीनात. आता श्राद्ध कसे पार पडणार अशी नाथांना काळजी वाटू लागली.

साधूवर प्रसंग ओढवला तरी व्यवस्थित पार पडतो. श्रीखंड्याने सुचविले "महाराज, आपण काळजी कसली करता ? तुमचे सामर्थ्य तुम्हाला माहीत नसले तरी मला माहीत आहे. ब्राह्मण न का येईनात, आपण आपल्या आणि त्या ब्राह्मणांच्या पितरांना जेवायला बोलवा."

आपण जेवायला गेलो नाही म्हणजे नाथमहाराज काय करतात हे पाहाण्यासाठी काही ब्राह्मण वाड्यापाशी आले आणि आत डोकावून पाहू लागले. वाड्यातील दृश्य पाहून ते चकितच झाले. स्वतःला चिमटा घेऊन पाहू लागले, पण जागे असल्याची त्यांची खात्री झाली. मग त्यांना भ्रम तर नाही झाला ? हे आहे तरी काय ? ते भ्रमिष्टासारखे बरळू लागले आणि "भूऽत भूऽऽत !" म्हणून ओरडू लागले. प्रत्येकाला वाड्यात आपापले पितर दिसत होते. वाड्यातील दृश्य असे होते. एकनाथमहाराजांचे आणि वाड्याबाहेरच्या ब्राह्मणांचे पितर मोठ्या समाधानाने आत भोजन करीत होते. दिवंगत झालेली माणसे जेवत होती, आणि ती ही सशरीर स्थितीत ! निदान त्या ब्राह्मणांना तरी तसे दिसले.

एक चमत्कार शक्य असेल तर दुसरा का नाही ? शेरेन्झ नॉटझिंग या जर्मन गृहस्थाने 'फिनॉमिनॉ ऑफ मटेरियलायझेशन' म्हणून लिहिलेले पुस्तक आणि इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झालेले 'सोसायटी ऑफ सायकिकल रिसर्च'चे वृत्तांत जरा न्याहाळून पहा.

हल्ली काही सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांचे असे म्हणणे आहे की श्राद्ध करण्यात काय विशेष आहे. केवळ पितरांची आठवण एवढा एकच जर उद्देश असेल तर आम्ही त्या दिवशी त्यांच्या नावाने थोडा दानधर्म करतो. ब्राह्मणांना जेवायला घालण्यातच काय विशेष आहे. मुख्यतः हा श्रद्धेचा प्रश्न आहे. या गोष्टीबद्दल पांगारकर म्हणतात, भोजनाला बोलावलेल्या ब्राह्मणांचे पितर जेऊन गेले असे कोणीच म्हटले नाही. फक्त नाथांचे पितर जेवून तृप्त होऊन जाणे हेच साहजिक आहे.

श्राद्ध केले म्हणजे ते अर्पण केलेल्यांना पितृलोकात पोहोचते. तिथला अधिकारी, ज्या जीवात्म्याच्या नावाने हे श्राद्ध केले असेल त्याला, तो ज्या योनीत असेल तिथे, हे अन्न पोहोचवण्याची व्यवस्था करतो. असल्या गोष्टीवर किती विश्वास ठेवावा हे ज्याचे त्याने ठरवावे.

## वडाऱ्यांची संभावना

एक दिवस काही वडारी नाथांचे कीर्तन ऐकावयास आले. पण त्या दिवशी इतकी गर्दी होती, की, त्यांना उभे राहाण्यास सुद्धा जागा मिळेना. ते नाथांच्या घरात शिरले. नाथांच्या झोपण्याच्या खोलीत गेले आणि त्यांच्या अंथरुणावर वसले. मऊमऊ गादीवर त्यांना झोप लागली.

कीर्तन संपल्यावर उद्धव नाथांचे अंथरूण साफ करण्याकरिता आला तेव्हा त्याला हे लोक निजलेले दिसले. उद्धवाने त्यांना उठविले. तेवढयात नाथ आले. त्यांनी शांतपणे त्यांना घरातच ठेवून घेतले, आणि दुसऱ्या दिवशी दुपारी जेवण झाल्यावर त्यांना जाऊ दिले.

## प्रत्यक्ष गोदावरी

नाथांचे कीर्तन ऐकण्यास दररोज एक बाई येत असे. ती सौभाग्यवती होती आणि अतिशय सुंदर होती. ती ठराविक वेळेला यायची आणि कीर्तन संपल्यावर नदीच्या दिशेने तिच्या निवासस्थानी जायची. ती कोणाशीही बोलत नसे.

बरेच दिवस झाल्यावर तिला रोज पाहून पाहून काही लोकांच्या मनात पापवासना उत्पन्न झाली. चौघाजणांनी तिला त्या रात्री कीर्तन संपल्यावर गाठण्याचे ठरविले. कीर्तन आटोपल्यावर थोडे अंतर ठेवून ते तिच्या मागोमाग जाऊ लागले. गावाची वस्ती संपली तरीही ही स्त्री नदीच्या बाजूला चालतच होती. काही वेळाने ती घाटाच्या पायऱ्या उतरू लागली. आता मात्र त्या चौघांना जरा अचंबा आणि भीती वाटू लागली. ही भानगड आहे तरी काय ? इथेतर एकही घर नाही. आपल्या भीतीने, ही बाई जीवतर देत नाही ना ? या विचाराने त्यांच्या चालण्याची गती जरा मंदावली. ते आश्चर्य करीत घाटाच्या वरच्याच पायरीवर उभे राहिले. ते चौघेजण भीतीने कापू लागले. कारण पाहाता पाहाता त्या सुंदरीने नदीत उडी टाकली आणि क्षणार्धात गोदामाईच्या प्रवाहात ती दिसेनाशी झाली. त्या लोकांना वाटले की आपल्या दुराचारामुळे या बाईने आत्महत्या केली.

दुसऱ्या दिवशी पुन्हा त्या बाईला कीर्तनाला आलेली पाहून त्या चौघांची शुद्धच हरपली. आपण स्वप्नात आहोत की जागे आहोत हे त्यांचे त्यांनाच समजेना.

**“संसारः स्वप्नतुल्यो हि रागद्वेषादिसत्कुलः ।**
**स्वकाले सत्यवत् भाति प्रबोधे सत्यसद्भवेत् ।।” आत्मबोध**

कीर्तन संपल्यावर नाथांनी त्या बाईला विचारले, “आई काल रात्री त्रास नाहीना दिला कोणी तुम्हाला ? पाहिजे तर श्रीखंड्या येईल आज आपल्या

सोबतीला." ती म्हणाली, "नको महाराज, आपली कृपाच मला नित्य सोबत करते आहे, आणि जरूर पडलीच तर श्रीखंड्या काय लांब आहे ?"

इतर श्रोत्यांना काही अर्थबोध झाला नाही. त्या चौघांना मात्र झाला. सर्व मंडळी गेल्यावर या चांडाळचौकडीने नाथांच्या पायावर लोटांगण घातले आणि आपल्या अश्रूंनी त्या पुण्य पदकमलांना अभिषेक केला. म्हणाले, "महाराज, आपल्यामुळेच आम्हाला प्रत्यक्ष श्रीगोदामाईचे दर्शन झाले."

नद्या अशी मानवरूपे धारण करू शकतात का ? काय सांगावे ! तशी दिव्य दृष्टी असलेल्या आणि ज्यांचा उद्धार व्हावयाचा आहे अशांना ही रूपे दिसत असतीलही पुंडलिकाला काशीला असताना चार नद्या चार स्त्रियांच्या रूपाने कुक्कुटमुनींच्या आश्रमांत सडासंमार्जन करीत असताना नाही का दिसल्या ? त्यांचे बोलणे ऐकूनच तर त्याच्या उद्धाराला सुरवात झाली. आत्मतत्त्व जर सर्वत्र असेल तर त्या विश्वशक्तीला अशी निरनिराळी रूपे घेणे काय अवघड आहे ?

## गोविंददास आणि गोपिकाबाई

गोविंददास नावाचे एक गृहस्थ गोपिकाबाई नावाच्या आपल्या पत्नीसह कीर्तन-पुराण-प्रवचनास येत असत. ते स्वतः श्रीमान् होते, आणि पुत्राशिवाय त्यांना सर्व काही वैभव होते. मूल नसल्यामुळे गोपिकाबाईला विशेष खंत वाटत असे.

एक दिवस कीर्तन संपल्यावर पतिपत्नी महाराजांसमोर हात जोडून उभी राहिली. महाराजांनी कारण विचारल्यावर गोविंदराव म्हणाले, "महाराज, आमच्याजवळ विपुल संपत्ती आहे. मुलाशिवाय इतर सर्व वैभव आहे. तर या संपत्तीचा विनियोग कसा करावा ?" महाराज म्हणाले, "फार उत्तम प्रश्न विचारलात. ऐका ! ऐपत आहेच, तर कुटुंबवत्सल पुजारी, पुराणिक, कीर्तनकार आणि वैदिक ब्राह्मण वाड्यात ठेवून त्यांचा चरितार्थ चालवा. देवाची पूजा मात्र स्वतः न चुकता दररोज करीत जा."

थोड्याच दिवसात महाराजांनी सांगितल्याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली, आणि वाड्यात सदावर्त सुरू झाले. महाराजांना हा सर्व वृत्तांत त्यांनी सांगितला. तेव्हा महाराज म्हणाले, "फारच उत्तम केलेत. तुम्हाला मूलबाळ नाही ही ईश्वरी कृपाच समजा." महाराजांनी असे सांगितल्यानंतरही गोपिकाबाई असंतुष्टच राहिली. तिने एक दिवस पुराणिकबुवांना विचारले की पुत्रप्राप्तीसाठी काही नवस वगैरे उपाय नाहीत का ? पुराणिकबुवा म्हणाले, "तुम्ही नाथमहाराजांच्या घरातील विठ्ठलाच्या जागृत मूर्तीला नवस करा, की पुत्र झाल्यास सहस्रभोजन घालीन." त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी नाथांची परवानगी घेऊन त्यांच्या देवघरातील विठ्ठलमूर्तीला त्यांनी नवस केला.

थोड्याच दिवसांत गोपिकाबाईंच्या शरीरात बदल दिसू लागला. यथाकाल त्या प्रसूत झाल्या. पुत्ररत्न झाले. आनंदीआनंद झाला ! गोविंददासांनी खूप दानधर्म करून सर्वांना संतुष्ट केले. तीन महिन्यांनी मुलाला नाथांच्या दर्शनासाठी आणले. महाराज म्हणाले, " ठीक आहे, पण तुम्ही मात्र गुंतून पडलात ! पुराणिकबुवांनी गोपिकाबाईंना नवसाची आठवण केली. गोपिकाबाई म्हणाल्या, " इतकी काय घाई आहे ! मी कुठे जाते का आहे ? मुलगा पाच वर्षांचा झाला की त्याच्याच हातून दक्षिणा देऊन सहस्राच्या सव्वापट भोजन घालीन." पुराणिकबुवांनी पुन्हा सुचविले की सहस्रभोजन लवकर घालावे, लांबणीवर टाकू नये. पण बाईंनी आपला हट्ट काही सोडला नाही. आणि सहस्रभोजन लांबणीवर पडले.

सत्कर्म करावयाचे मनात आले की त्याला विलंब लावू नये. पुढच्या क्षणी काय होणार आहे हे कोणाला माहीत आहे ? आणि आपले चंचल मन कशावरून बदलणार नाही ? एकदा धर्म राजाच्या मनात दान करण्याची इच्छा झाली. आणि त्याने ती भीमाजवळ बोलून दाखवली. भीमसेन म्हणाला, इच्छा आहे तर आताच पुरी करा. त्यावर धर्मराज म्हणाले, उद्या करू. ताबडतोब भीमाने नगारे, घंटा आणि मंगलवाद्ये वाजविण्याचा हुकूम सोडला. धर्म राजाने 'हे काय ?' म्हणून विचारता भीम म्हणाला, " मला अतिशय आनंद झाला आहे. या मृत्युलोकी तुम्हांला उद्यापर्यंत जगण्याची खात्री आहे." मृत्युलोकीं कोणाचीच शाश्वती नाही.

कर्ण एकदा दाढी करण्यास बसला असता एक अतिथी आला. त्याच्या डाव्या हाताला जी पाण्याने भरलेली सोन्याची वाटी होती, ती लगेच त्याने डाव्या हातानेच उचलून दिली. ब्राह्मण अतिथी म्हणाला, " महाराज, डाव्या हाताने का देता ? " कर्ण म्हणाला, " तू वाटी घेऊन चालू लाग. डाव्या हातातून उजव्या हातात घेईपर्यंत मन बदलले तर ? किंवा तेवढ्या क्षणात मृत्यू आला तर ? " म्हणून नेहमी नामस्मरण करत असावे. मृत्यू केव्हाही आला तरी हरीनाम मुखात आहेच !

एक रात्र अशी आली, की त्यावेळी विचित्र अकल्पित प्रसंग ओढवला. कीर्तन वगैरे संपवून गोविंददासांकडील सर्व मंडळी झोपली आणि जिकडेतिकडे सामसूम झाल्यावर मध्यरात्रीच्या सुमारास पाचपन्नास तस्करांनी दरोडा घातला. घराचे सर्व दरवाजे व्यवस्थित बंद होते. पण दरोडेखोर वाड्याची मागची भिंत फोडून आत शिरले. प्रत्येकाच्या हातात शस्त्र होते. वाड्यातील सर्व मंडळीवर त्यांनी हल्ला केला. कोणाला बांधले, कुणाचे हात तोडले. याप्रमाणे सर्वांना घायाळ केल्यावर सर्व संपत्ती, दागदागिने मौल्यवान भांडी आणि वस्त्रे इत्यादी लूट घेऊन ते पसार झाले. गोविंददासांच्या वाड्यात चाललेला हा सर्व प्रकार काही मंडळींना कळला. पण गावातील लोक मदत तरी कशी करणार ? त्या दरोडेखोरांपैकी काहीजण बाहेर उभे राहून पहारा करीत होते. कोणी आलाच तर त्याला दगड

मारीत, किंवा हल्ला करून घायाळ करीत. सहानुभूती व्यक्त करण्यापलीकडे कोणी काही करू शकले नाही.

ज्या गोविंददासांनी कालपर्यंत अनेक लोकांना मदत केली, अन्नदान केले, त्यांनाच आज एका जेवणाकरिता भीक मागण्याची पाळी आली. जे मूल गर्भश्रीमंतीत जन्मास आले, त्याला दूध पाजण्याकरिता आज त्याच्या आईला दुसऱ्याच्या दारापुढे हात पसरून उभे राहावे लागले. श्रीमंतीतून एकाएकी गरिबीत लोटले गेलेल्यांनाच त्यांच्या मनःस्थितीची कल्पना करता येईल. पोटच्या पोराला जगवण्यापुरते अन्नही मिळू नये हे पाहून आईबापांच्या जीवाला होणारी व्यथा कोणाला समजणार ? अनाथाश्रमात आलेल्या देणगीपैकी जर कोणी आपल्या स्वत:साठी त्यातले घेत असेल तर ह्या दुष्कृत्याचा काय परिणाम होईल ! आजारी मुलाला औषधउपचाराकरिता द्रव्य नसल्यास आईबापांचे दु:ख काय असेल ह्याची कल्पना कोण करू शकेल ! हल्लीच्या दिवसांत मजूर वर्गातल्या एखाद्याला नाटक तमाशा पहाण्याकरिता पैसे नसतील तर श्रीमंतांचा हेवा वाटतो. मग ज्याला केवळ जगण्याकरता अन्न मिळत नसेल त्याची मन:स्थिती काय असेल ? ह्या बाबतीत समाजातील प्रत्येक व्यक्तीचे काय कर्तव्य आहे हे ज्यांनी त्यांनी आपआपल्या मनालाच विचारून ठरवावे हे योग्य होईल. पण मनाने आदेश दिल्यावर मग मात्र स्वत:ची फसवणूक करू नये. इतकी दुर्धर स्थिती प्राप्त झाली असताही गोविंददास आणि गोपिकाबाई त्या दिवशी नाथांच्या कीर्तनास जाण्याचे विसरले नाहीत. इतक्या कठीण परिस्थितीतही नीती, आणि देवावरची श्रद्धा कायम असणे ही साधी बाब नव्हे. ते कीर्तनाला आलेले पाहून नाथमहाराजांना आनंद झाला. आणि कीर्तन संपल्यावर ते म्हणाले, " शेवटी आता तुम्ही अगदी मोकळे झालात." दु:खी माणसाच्या जिवाला हे वाक्य किती झोंबले असते ? पण हे संतपुरुषाचे वाक्य आहे हे विसरून चालणार नाही. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा होता की ईशचिंतनावाचून आता दुसरे काहीच करावयाचे राहिलेले नाही. पण त्या लहान मुलाबद्दल चिंता होतीच ना ? असो. वाड्यातील बहुतेक सर्व लोक वाडा सोडून गेले, पण पुराणिकबुवा मात्र राहिले होते.

त्यांनी गोपिकाबाईंजवळ पुन्हा गोष्ट काढली. " बाई, आता सहस्रभोजनाचे काय होणार ? अनुकूल परिस्थिती असतानाच आपण नवस फेडला नाही, आता काय करणार ? आता तर स्वत:लाही खावयास नाही." बाईला अतिशय दु:ख झाले. बाईने यावर पश्चात्तापदग्ध होऊन उपाय विचारला. पुराणिकबुवा म्हणाले, " एक उपाय आहे. ---एका आत्मज्ञानी माणसाला जेवण घालून संतुष्ट केल्यास सहस्रभोजनाचे पुण्य लाभेल." पण असा ब्रह्मज्ञानी कोठे सापडणार ? पुराणिकबुवा म्हणाले, "आपल्या गावातच असा एक साधुपुरुष आहे. आणि तो म्हणजे एकनाथमहाराज. महाराज भोजनास आले तर सहस्रभोजनाचा नवस फिटेल. "

रात्री कीर्तन संपल्यावर मुलासह गोविंददास आणि गोपिकाबाई नाथांसमोर हात जोडून उभे राहिले आणि त्यांनी नाथांना सर्व हकीगत सांगितली. त्यांच्याच घरच्या पांडुरंगाच्या मूर्तीसमोर त्यांनी सहस्रभोजनाचा नवस केला होता. आता नाथमहाराज जेवावयास आल्यानेच तो फिटण्याची शक्यता होती. नाथ तत्काळ होय म्हणाले. पण परान्न भक्षण करणार नाही असे त्यांनी मुलास सांगितले होते, तेव्हा त्याची परवानगी घेणे आवश्यक होते. तेव्हा ते दोघेजण हरिपंडितांनाही जेवावयास बोलावण्याच्या इराद्याने त्यांच्याकडे गेले. हरिपंडितांना याचा फार राग आला. ते म्हणाले, "आम्ही काय भिक्षुक आहोत की काय सगळीकडे जेवावयास जायला. आम्ही येणार नाही. आम्ही परान्न खात नाही." यावर नाथ महाराज शांतपणे म्हणाले, "अरे हरी, आपण असे करू. बाई आपल्याला शिधा देतील आणि तूच स्वयंपाक कर. ते काही परान्न होणार नाही आणि बाईंनाही समाधान मिळेल." हा युक्तिवाद हरिपंडितांना पटला. पण बाई म्हणाली, "तुम्ही माझ्या हातचे काही तरी खायलाच हवे." तेव्हा नाथांनी सुचविले की ते जेवावयास बसल्यावर बाईंनी दोघांना थोडाथोडा शिरा वाढावा. अशा प्रकारे सारा बेत आखला गेला.

दुसऱ्या दिवशी बाईंनी भिक्षा मागून शिधा आणला, आणि सर्व तयारी केली. लवकरच हरिपंडित आले. त्यांनी स्वयंपाक सिद्ध केला. नाथमहाराज आणि हरिपंडित भोजनास बसले. थोड्या वेळाने बाई दोघांना थोडा शिरा वाढून झट्कन आत निघून गेल्या. हरिपंडितांना राग आला, पण करणार काय ? वाढलेले टाकायचे तर नाही आणि पानावरून मध्येच उठायचेही नाही. कसेतरी जेवण आटोपून दोघे उठले. नाथांनी त्यांनाच उष्टी काढायला सांगितले.

हरिपंडितांनी स्वतःची पत्रावळ उचलली आणि नाथांची पत्रावळ उचलण्यास हात लावला मात्र तोच त्याच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. एका उच्छिष्टाखाली दुसरे दिसत होते. बाईंनी चुकून दोन पत्रावळी ठेवल्या असतील असे वाटून त्याने दुसरी पत्रावळ उचलली. पण पाहातात तो खाली पुन्हा उच्छिष्ट ! तेही उचलले तो पुन्हा तोच प्रकार ! हरिपंडित भांबावून गेले, आणि अशा प्रकारे त्यांनी एक हजार उच्छिष्टे उचलली. त्यांच्या उद्धाराचा क्षण आला. त्यांचा अहंकार पार नाहीसा झाला. पांडित्याची विफलता उमगली. गर्वाची क्षुद्रता पटली. क्रोधाचा निरर्थकपणा ध्यानात आला. भूतदयेचा महिमा कळला. खऱ्या पावित्र्याची जाणीव झाली, आणि वडिलांचा अधिकार सामजला. त्यांचे सर्व सात्त्विक भाव जागृत झाले. आणि त्यांनी नाथांच्या चरणावर मस्तक ठेवले. शांतता, तितिक्षा सहिष्णुता, भूतदया आणि समाधान म्हणजेच खरे साधुत्व हे त्यांच्या मनावर ठसले, आणि ते वृत्तीने शांत झाले. हा सर्व प्रकार पाहून गोपिकाबाईंची मती गुंगच झाली. एका आत्मज्ञानी माणसाचे भोजन म्हणजे खरोखरीच सहस्रभोजन होय हे तिला प्रत्यक्ष कळले.

पुराणिकबुवांना ही सर्व हकीगत ऐकून परम समाधान झाले. श्रद्धाळू आणि सदाचारी माणसे नेहमी समाधानी असतात. पण हा श्रद्धाळूपणा जर बुद्धीचा आणि ज्ञानाचा असेल तर तो भक्कम असू शकतो. आंधळी श्रद्धा परीक्षेच्या वेळी केव्हाही टिकाव धरू शकत नाही. पुढे कालांतराने प्रारब्धगती पुन्हा फिरली आणि गोविंददास आणि गोपिकाबाईंना ऐहिक जीवनाचे व वैभवाचे दिवस लाभले.

माणसाच्या जीवनात क्षुल्लक गोष्टीवरूनसुद्धा किती विलक्षण उलटापालट होते हे आपण नेहमीच पाहातो. ‘थोडक्याने चुकले किंवा गेले असे’ आपण अनेकदा ऐकतो. हे ‘थोडक्याने’ होणे याचा अर्थ तरी काय ? हे थोडक्याने का व कसे होते हे आपल्याला समजत नाही. दैववादी माणसे त्याला प्रारब्ध किंवा दैव म्हणतात व इतर लोक आपला अंदाज चुकला असे म्हणतात. हे खरे ! पण हा अंदाज याच वेळी कसा चुकला ? दैववाद आणि प्रयत्नवाद ह्या दोहोंच्याही बाजूने अनेक अनुभव आणि उदाहरणे सांगता येतात पण त्यावरून काहीच सिद्ध होत नाही. पुष्कळ वेळा विचार करून जेव्हा काहीच उत्तर मिळत नाही तेव्हा विचार न करणेच बरे असे वाटू लागते. या देहाकडून होणाऱ्या सर्व क्रिया केवळ प्रारब्धाधीन आहेत असे मानले तर कुणी कुणाला दोष देणे कधीच योग्य होणार नाही. पण देहाच्या सर्व क्रिया वासनेनेच होतात आणि वासनेमुळेच बुद्धी आणि मन प्रवृत्त होते ना ? मग देहाला प्रारब्ध आहे तर बुद्धी-मनालाही ते आहेच, आणि मन जर सर्वस्वी प्रारब्धवश आहे असे मानले तर प्रयत्नाने तरी ते कसे सुधारता येणार, अशा विचारसरणीने आपल्या इच्छेवर काहीच अवलंबून नाही आणि प्रयत्नात सुद्धा काहीच तथ्य नाही असे वाटू लागते. पण प्रयत्नानेच नराचा नारायण होतो असे म्हणतात.” अज्ञानजनबोधाय प्रारब्धं वक्ति वैश्रुतिः । ” पण प्रयत्न आणि प्रारब्ध यांची संगती तरी कशी लागायची ? ह्या जन्मातले प्रारब्ध मागच्या जन्मात केलेल्या सत्-दुष्कृत्यांवर अवलंबून आहे तर मग आपल्या हातात काहीच नाही. ही गाठ सोडविण्याकरिता एक मत असे आहे की, प्रयत्न फक्त परमार्थात उपयोगी पडतो. बाकी सर्व म्हणजे, जन्म, मृत्यू, अर्थ, अन्न आणि अच्छादन इत्यादी सर्व गोष्टी प्रारब्धवश आहेत.

प्रत्येक माणसाला दुष्कृत्य कोणते आणि सत्कृत्य कोणते हे कळते. आणि ही जाणीव सद्सद्विवेक बुद्धीमुळे होते. कर्माच्या या फरकाकडे लक्ष देण्याचे जर सोडून दिले तर तो हळू हळू कमी कमी होऊ लागतो आणि पुढे चांगले कोणते आणि वाईट कोणते हेच कळेनासे होते. ह्याच्या उलट, सद्सद्विवेकबुद्धीला जितका वाव द्यावा तितकी ती जास्त प्रज्वलीत होते.

निष्काम कर्म केल्याने परमार्थात उन्नती होऊ लागली की साहजिकपणेच वासना कमीकमी होऊ लागतात आणि सत्कृत्ये जास्त होतात. अशा वागण्यातूनच शेवटी वासना पार झडून जातील आणि जीवात्मा उत्क्रांत दशेला पोहोचेल.

इशावास्य उपनिषदात हाच मार्ग सांगितला आहे. निष्काम कर्म आणि त्याच्या जोडीला ध्यान केल्याने वासना कमी होतात आणि त्या अचित्य स्वरूपाची जाणीव होऊ लागते. प्रत्येक संताचे चरित्र सुद्धा हेच शिकविते. निष्काम कर्म, कर्तव्याकरता कर्म आणि भूतदया हाच शांत संतजीवनाचा पाया.

## दंडवतस्वामी

पैठण गावात एक सदाचारी ब्राह्मण राहात असे. कालांतराने त्याने चतुर्थाश्रम पत्करला आणि सन्यस्त होऊन कालक्रमण करीत होता. त्याला नाथमहाराजांच्या बद्दल अतिशय पूज्य भाव असे. नाथांच्या अद्वैतवादाचे निरूपण सतत ऐकून त्याच्या मनाची वृत्ती पण तशीच होऊ लागली होती. हळूहळू सर्व प्राणिमात्रांत एकच आत्मतत्त्व अनुस्युत आहे, असा मनोभाव उत्पन्न होऊन तो प्रत्येक प्राण्याला नमस्कार करू लागला. म्हणून चेष्टेने लोकांनी त्याचे नाव 'दंडवतस्वामी' असे ठेवले. सगळ्या प्राण्यांना हा दंडवत करतो यात ढोंग तरी आहे किंवा याचे डोकेतरी हलके झाले आहे असे लोकांना वाटू लागले.

एक दिवस कुटाळ-कट्ट्यावरच्या लोकांनी दंडवतस्वामींची टवाळी करण्याकरता नदीत वहात जात असलेले एका गाढवाचे निर्जीव शरीर त्यांच्यासमोर आणून ठेवले. दंडवतस्वामींनी लगेच त्याला नमस्कार केला. हे पाहून सगळ्या टवाळांनी एकच हशा केला आणि त्याला आव्हान केले की, त्या गाढवात जर आत्मतत्त्व आहे तर ते उठत का नाही. दंडवतस्वामींनी ईशशक्तीची प्रार्थना केली आणि म्हणाले, "माझा मनोभाव जर खरा असेल तर ह्या गाढवाला उठू दे." लगेच ते गाढव सचेतन झाले. हा चमत्कार पाहून सगळे लोक थक्क झाले. आणि स्वामींजवळ सिद्धी आहे अशी त्यांची खात्री झाली.

त्या दिवसापासून दंडवतस्वामींची कीर्ती सर्वत्र पसरली आणि त्यांच्या राहात्या जागी लोकांची गर्दी होऊ लागली. एक ना दोन ! कोणी मुलाकरिता, कोणी बायकोच्या आजारीपणाकरिता, कुणी काही, कुणी काही विचारू लागले. त्या स्वामींचे शांत जीवन जाऊन त्या जागेला जत्रेचे स्वरूप आले. साध्या माणसाच्या, क्षुल्लक गोष्टीकरता कोणी पाया पडला तरी त्याला किती मोठेपणा वाटतो. मग इथे तर रोज कितीतरी लोक पाया पडणार. ही सर्व हकीगत नाथांच्या कानावर गेली आणि त्यांना वाईट वाटले की, एक खरोखर चांगला मनुष्य लोकांच्यामुळे आध्यात्मिक दृष्टीने खाली ओढला जाणार ! नाथांच्या मनात त्या स्वामींबद्दल चुरस किंवा द्वेषभावना मुळीच नव्हती. नाथमहाराज असल्या क्षुद्र वृत्तीच्या पलीकडे पोहोचले होते. त्यांनी स्वामींचा उद्धार करावयाचे ठरविले.

एक दिवस नाथमहाराजांना नदीवर दंडवतस्वामी भेटले. महाराज म्हणाले, " स्वामीजी हा लोकसंग्रह बरा नाही. ह्यामुळे उन्नती होण्याऐवजी तुम्ही या सिद्धीच्या अहंकारातच घोटाळत राहाल, आणि जीवन फुकट जाईल." खरेच आहे. एखाद्या वकीलाने एखादी फिर्याद जिंकली तर आपण काय हुशार आहोत असे त्याला वाटू लागते. एखाद्या शस्त्रवैद्याने अवघड शस्त्रक्रिया करून रोगी बरा केला तर आपण प्रतीदेवच आहोत असे त्याला वाटू लागते. इथेतर सिद्धीच्या जोरावर कितीतरी लोक संतुष्ट होऊन जात, पाया पडत आणि कीर्ती पसरवीत. आकाश दोन बोटेच उरले आहे असे वाटू लागल्यास काय आश्चर्य! अहंकार हा वळावणारच. आध्यात्मिक उन्नतीमध्ये अहंकार मुळीच चालत नाही. स्वामींनी विचारले, " महाराज, मग मी काय करू ?" एकनाथ म्हणाले, " तुम्हांला जर जीवनाचे सार्थक करून घ्यावयाचे असेल तर तुम्ही समाधी घ्या." दंडवतस्वामी मनातून तयारच होते. ते महाराजांना म्हणाले, " बरे तर! आपल्याच हातांनी मला समाधी मिळणार, यापेक्षा अधिक सार्थक ते कोणते ! सांगा, मला केव्हा समाधी देणार ?" महाराज म्हणाले, " आताच समाधी देतो." लगेच नदीजवळ खड्डा तयार केला आणि नाथांनी दंडवतस्वामींना समाधी दिली.

हा हा म्हणता ही बातमी गावभर पसरली,. आणि एकनाथमहाराजांना दंडवतस्वामींचे वैभव पाहवेना म्हणून त्यांनी त्यांना समाधी देऊन त्यांची विल्हेवाट लावली, अशी अफवा उठली. नाथांचे वैभव न पाहवणारी माणसे कुटाळकट्ट्यावर होतीच त्यांनी एक दिवस नाथांची खोड मोडण्याचा घाट घातला.

पैठण गावात नदीकिनाऱ्यापासून जवळच एक पिंपळेश्वराचे देऊळ आहे. त्या शंकराच्या देवळात एक नंदी होता. गावातील काही लोकांनी नाथांना एक दिवस त्या देवळात आणले आणि सांगितले की, तुमचा भक्तिभाव जर खरा असेल, तर या दगडाच्या नंदीला कडबा खावयास लावा. एकनाथांनी ईशशक्तीची प्रार्थना केली, आणि ते म्हणाले, " इथे जमलेल्या सर्व मंडळीच्या मनातून या नंदीने हा कडबा खावा असे आहे. " लगेच त्या नंदीने लांब जीभ काढून कडब्याची पेंडी ओढून घेतली, आणि ती खाऊन संथपणे रवंथ केले. ही बातमी गावात वणव्यासारखी पसरली, आणि काही लोक म्हणू लागले की आम्ही स्वत: पाहिल्याशिवाय खरे मानणार नाही. त्या लोकांनी नाथांना सक्तीने त्या देवळात पुन्हा आणले. आणि त्या नंदीला कडबा खावयास लावण्याचा आग्रह करू लागले. नाथ शेवटी त्या नंदीला म्हणाले, " बघ रे बाबा ! तुला हा दररोजचा त्रास होणार आहे. तुला काय करावयाचे असेल ते कर. " हे ऐकताच तो दगडाचा नंदी उठला आणि त्याने देवळाबाहेर जाऊन नदीत उडी घेतली, ती कायमचीच ! जमलेले लोक त्या नंदीकडे भ्रमिष्टासारखे पाहू लागले. नदीत त्या जागी तो दगडाचा नंदी अजूनही दिसतो असे म्हणतात, पण खरा हल्ली तो दिसत नाही. त्या जागेला पिंपळेश्वर-तीर्थ म्हणतात.*

---

* हल्लीचा गाढेश्वराचे देवापुढील नंदी, पहिल्या नंदीने समाधी घेतल्यानंतर करून बसवलेला आहे.

पोलंड देशात एका इंजिनिअरने एक भरीव संगमरवरी दगडाचा खूप वजनदार पुतळा कित्येक फूट चालवून दाखविला. ('क्लेरव्हॉन्स अॅण्ड मटीरिअलायझेशन,' प्रकाशक फिशर अन्विन. याचा उतारा 'प्राचीन संतकवी'–आजगावकर या पुस्तकात दिला आहे.)

पैठण गावातच सुमारे चारशे वर्षांपूर्वी शके ११०० च्या सुमारास ज्ञानदेवांच्या वर असाच प्रसंग आला होता, त्यावेळी त्यांनी रेड्याला वेद म्हणावयास लावले होते. ज्ञानेश्वरांनीच भिंत चालवली होती. मग एकनाथ महाराजांनी नंदी सचेतन केला यात काय अशक्य आहे ?

## पंढरपूरची यात्रा

मागे सांगितलेली नंदीची हकीगत घडल्यानंतर थोड्याच दिवसांनी पंढरपूरच्या यात्रेस जावे असे नाथमहाराजांना वाटू लागले. त्यांनी उद्धवाला तसे सांगितले, आणि तयारी सुरू झाली. थोड्याच दिवसांत महाराज यात्रेला निघाले. एकनाथांसारख्या साधुपुरुषासमवेत यात्रेला जाण्याची संधी वारंवार थोडीच येते ! अनेकजणांनी या संधीचा फायदा घेण्याचे ठरविले आणि तेही नाथांच्या मागोमाग निघाले. एकनाथमहाराज पंढरपूरला येत आहेत ही बातमी ते तिथे पोहोचण्यापूर्वीच पसरली होती. तेथील लोकांना फारच आनंद झाला. या घटनेला विशेष महत्त्व होते. एकनाथ महाराज स्वतः आत्मज्ञानी साधु-पुरुष, आणि त्यातही, ज्यांच्यामुळे विठ्ठलमूर्तीची पंढरपूरात स्थापना झाली, त्या भानुदासांचे पणतू.

नाथमहाराज पंढरपूरला पोचले तेव्हा लोक त्यांची वाटच पाहात होते. त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी चालली होती. नाथमहाराज आणि बरोबरचे शेकडो लोक पंढरपूरात पोहोचले. चंद्रभागेत स्नान वगैरे झाल्यावर महाराज दर्शनासाठी देवळात आले. जी मूर्ती सचेतन होऊन त्यांच्या पणजोबांशी बोलत असे, जी मूर्ती सूक्ष्म आकार घेऊन भानुदासांच्या समळीतून विजयनगरहून पंढरपूरास आली, आणि ज्या पांडुरंगाच्या कृपेने सुळाचा मोहरलेला वृक्ष झाला, त्या मूर्तीचे दर्शन झाल्यानंतर नाथांच्या मनात काय भावना उत्पन्न झाल्या असतील हे शब्दांत कोणी वर्णन करावे ? या सर्व गोष्टी केवळ अनुभवाच्या आहेत. ऐहिक जीवनातसुद्धा एखाद्या प्रेमातील माणसाची वस्तू दिसली तर मन किती भारावून जाते ! या तर सात्त्विक जीवनातील आणि अत्यानंदाच्या गोष्टी. दर्शन झाल्यावर तेथे जमलेल्या सर्व मंडळींनी नाथांना कीर्तन करण्याची विनंती केली. विशेषतः भानुदासांच्या जीवनातील विशेष प्रसंगाचे आख्यान लावावयाची त्यांनी विनंती केली. नाथांनाही आनंद झाला, आणि अद्वैताचे निरूपण झाल्यावर, भानुदासांनी मूर्ती परत आणल्याच्या प्रसंगाचेच त्यांनी वर्णन केले ते असे :—

"विजयनगरच्या रामदेवरायाने सर्व लोक आणि संतमंडळी यांच्या इच्छेविरुद्ध पांडूरंगाची मूर्ती तेथून उचलून आपल्या गावी नेली. तेथे एक सुंदर मंदिर बांधून तो राजा स्वतः त्या मूर्तीची पूजा करी. त्याच्याशिवाय त्या मंदिरात जाण्याची कोणालाही परवानगी नव्हती. रात्री आरती झाल्यावर देवळाला कुलूप लावून त्याची किल्ली राजा स्वतःजवळ ठेवी. मूर्ती आणली त्यावेळी देवाने राजाला दृष्टान्त देऊन सांगितले की जोपर्यंत तुझ्या राज्यात साधुपुरुषाचा अपमान होत नाही तोपर्यंत मी इथे राहीन. ज्या क्षणी अन्यथा घडेल त्याच दिवशी मी परत जाईन.

इकडे पंढरपुरात आषाढी एकादशी जवळ आली म्हणून संतगण जमू लागले. पण पांडुरंगाविना सर्वच ओसाड होते. देवच नाही तर देवळाला काय शोभा आहे ? सगळे हताश होऊन बसले होते. एवढ्यात भानुदास आले आणि म्हणाले की, " मी पांडुरंगाला विजयनगराहून परत घेऊन येतो. "

थोड्याच दिवसांत भानुदास विजयनगरात येऊन पोचले. गावात कोणीच त्यांना नव्या देवळाचा पत्ता सांगेना. कारण राजाची सक्त ताकीदच होती, की नवागताला देवळाचा पत्ता सांगावयाचा नाही. विचारमग्न होऊन भानुदास एका झाडाखाली बसले. त्यांच्याजवळ एक लहान मुलगा आला. त्याला विचारताच त्याने मात्र पत्ता सांगितला.

रात्री सगळीकडे सामसूम झाल्यावर भानुदास त्या देवळाकडे आले, तो त्यांना कुलुपे दिसली. आता आत कसे जावे याचा विचार करता करता सहज त्यांनी एका कुलुपाला हात लावला. तो काय आश्चर्य ! ते कुलूप आपोआप उघडले. अशी सर्व कुलुपे उघडून त्यांना थेट मूर्तीपर्यंत सहज जाता आले. पांडुरंगाची मूर्ती पाहून त्यांना गहिवरून आले. त्यांनी पांडुरंगाला सांगितले की, "मी तुला घेऊन जाण्यासाठी आलो आहे." बरीच चर्चा झाल्यावर देवाने मान्यता दिली, आणि पहाट व्हावयाची वेळ आली असल्यामुळे त्याने भानुदासांना जाण्यास सांगितले. जाण्यापूर्वी त्याने भानुदासांच्या गळ्यात आपल्या गळ्यातील नवरत्नांचा कंठा घातला. भानुदास देवळातून निघाले आणि तुंगभद्रा नदीवर स्नानसंध्या करण्यात मग्न झाले.

इकडे पहाटेची वेळ झाली. राजा काकडआरतीसाठी देवळात आला. देवाला न्याहाळून पाहात असता त्याच्या लक्षात आले की देवाच्या गळ्यात कंठा नाही. झाले ! आरती बाजूला राहिली, आणि कंठ्याचा शोध सुरू झाला. राजाची भक्ती अहंकारयुक्त होती. मी मूर्ती आणली, मी नवरत्नांचा कंठा आणला, मी पूजा करतो इत्यादी प्रत्येक क्रियेत भक्तिभावापेक्षा 'मी' पणालाच अधिक महत्त्व होते. देवाच्या भक्ताजवळ मीपणा मुळीच असून चालत नाही. कारण मी म्हणजे विशिष्ट व्यक्ती, इतरांहून निराळी. म्हणजेच द्वैतभाव आला. द्वैत आणि अद्वैत एका ठिकाणी कशी राहणार ? पांडुरंग विजयनगरला राहण्यास कंटाळले यात काय नवल ?



पिंपळेश्वर–मंदिरातील नंदीने गोदावरीत समाधी घेतली ती जागा. त्याला हल्ली पिंपळेश्वरतीर्थ म्हणतात.

[ पान ७० ]

☆



एकनाथ महाराजांची समाधी

[ पान ८५ ]

विश्वशक्तीला भावभक्ती आणि एकरूपता पाहिजे असते. मीपणा सगळ्याच्याच आड येतो.

राजाने सर्व पहारेकऱ्यांना दरडावले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण भानुदास आले त्यावेळी ते गाढ झोपले होते, आणि जागे झाले तेव्हा सर्व कुलुपे जशीच्या तशी लावलेली होती. राजाने सगळीकडे तपासासाठी शिपाई पाठविले. थोड्याच वेळात बातमी आली की साधू म्हणवणारा एक गृहस्थ देवाचा कंठा घालून नदीकाठी बसला आहे. तो सांगतो की देवानेच त्याच्या गळ्यात तो कंठा घातला. "लबाड कुठला. इतक्या वर्षांत देव आमच्याशी कधी बोलला नाही आणि कंठा म्हणे देवाने त्याच्या गळ्यात घातला. मूर्तीचे हात हालतात होय ?" मुद्देमालासकट चोर सापडला. राजाने लगेच त्याला सुळावर चढविण्याची शिक्षा फरमावली. जास्त चौकशी करण्याचे कारण काय ? 'विनाश काले, विपरीत बुद्धिः' " इंग्रजी भाषेतही अशी एक म्हण आहे. तिचा अर्थ असा–'ज्याचा नाश करावयाचा असेल त्याला देव आधी वेडा करतो.' खरेच आहे, पण ते वेड त्यावेळी आपणास समजत नाही. पांडुरंगाने राजाची बुद्धी फिरवली कारण देवाला पंढरपूरला परत जायचे होते. गुन्हेगाराला न पाहाता आणि विचार न करता राजाने सुळाची शिक्षा फरमावली. हेच राजाचे चुकले.

भानुदासांच्या खांद्यावर सूळ देऊन ठरल्या जागी तो रोवण्यात आला. सुळावर चढावयाच्या आधी पहारेकऱ्याने काही शेवटची इच्छा आहे का म्हणून विचारले. भानुदास म्हणाले, "होय. मला एकदा पांडुरंगाचे दर्शन घेऊ द्या." शिपायांनी त्याला देवळात आणले. भानुदास मूर्तीला उद्देशून म्हणाले "काय देवा, तुझ्या दासाला चोर म्हणून सुळी जावे लागणार हा तुलाच कमीपणा आहे. तुझ्या भक्तांची जर अशी विटंबना होऊ लागली तर तुझी काय प्रतिष्ठा राहील ? असो. तुझी इच्छा असेल ते कर. " नंतर पहारेकरी त्यांना घेऊन सुळाजवळ आले, तो काय चमत्कार ! त्यांना सूळ कोठेच दिसेना. त्याच्या जागी वसंत ऋतूतली पालवी आणि भरगच्च मोहोर आलेला एक वृक्ष दिसत होता. त्या चमत्काराची वर्दी लगेच राजाला कळविण्यात आली. हे ऐकताच राजा भानावर आला. पण आता करणार काय ? जे होऊ नये ते झाले. त्याच्या राज्यात संतपुरुषाचा अपमान झाला. करार मोडला आणि पांडुरंग पंढरपूरला जाण्यास तयार झाले. राजा भानुदासांच्या पाया पडला. पण आता उपयोग काय ? राजाला मूर्ती नेण्याची परवानगी द्यावी लागली.

पण आता एक नवीच अडचण आली. पंढरपुराहून आणताना मूर्ती हत्ती घोड्यावरून आणली, पण एवढी जड व मोठी प्रतिमा भानुदास नेणार कसे ? राजा तर काहीच मदत करावयाला तयार नव्हता. देवांनीच हे कोडे सोडवले. ती मूर्ती

एकदम लहान झाली. इतकी लहान झाली की भानुदास तिला संबळीतून सहज नेऊ शकले. ही गोष्ट राजाला समजल्यावर त्याला काय वाटले असेल ? पंढरपूरला आल्यावर संबळी ठेवून भानुदास चंद्रभागेत स्नानासाठी उतरले. ते परत येतात तो काय चमत्कार ! मूर्ती पुन्हा पहिल्यासारखी मोठी झालेली. भानुदासांना ती हाल-वतासुद्धा येईना. भानुदास म्हणाले," हे काय देवा ?" मूर्तीने उत्तर दिले, " आता सगळ्या जमलेल्या मंडळींना बोलाव आणि त्यांनाच मला नेऊ दे. त्याप्रमाणे सगळ्यांनी मूर्ती वाजतगाजत नेली आणि पहिल्या जागी स्थापन केली. या प्रसंगापासून भानुदास प्रख्यात संतभक्त मानले जाऊ लागले."

कीर्तन-समारंभ पार पडला आणि लवकरच एकनाथमहाराज पैठण गावी परत आले.

## औषध कसे द्यावे ?

एक दिवस एका बाईने आपला लहान मुलगा एकनाथमहाराजांकडे आणला. तो आजारी होता. तिची तक्रार होती, की मुलगा औषध घ्यायला त्रास देतो, आणि पथ्य तर मुळीच पाळत नाही. महाराजांनी त्याला दोन शब्द सांगावेत अशी तिची इच्छा होती. नाथ म्हणाले की, "मुलाला माझ्या घरी थोडे दिवस राहू द्यावे." बाईने आनंदाने मुलाला ठेवले.

महाराज त्या मुलाला रोज आपल्या बरोबर जेवायला घेऊन बसत. त्या मुलाला पथ्य पाळण्यासाठी जितके पदार्थ खायला चालत तेच नाथही खात. मुलाला पटले की तो जे खातो त्यापेक्षा वेगळे नाथ काही खात नाहीत. झाले. तो मुलगा पथ्य पाळू लागला, औषध घेऊ लागला आणि लवकरच बराही झाला. काही दिवसांनी त्याची आई संतकृपा हेच रोग निवारणाचे कारण असे समजून त्याला घेऊन गेली.

आम्ही रोज सकाळी मिटक्या मारीत चहा प्यावयाचा, दिवसभर सिगारेटचे झुरके मारायचे आणि मुलाला मात्र, चहा पिऊ नये, सिगरेट ओढू नये असा उपदेश करावयाचा. आमच्या पुढाऱ्यांनी आम्हांला स्वार्थत्यागाच्या गप्पा सांगायच्या आणि स्वतः मात्र वाटेल त्या मार्गाने द्रव्यसंचय करायचा. ह्या कोरड्या उपदेशाला काय किंमत आहे. म्हणूनच "जैसा बोले तैसा चाले ! त्याची वंदावी पाऊले ! " हेच संत आणि बाकीचे भ्रांत !

## ज्ञानेश्वरांचे दर्शन

पंढरपूरच्या यात्रेहून परत आल्यानंतर महाराजांचा घसा काही दिवसांनी

एकाएकी सुजून दुखू लागला. बरेच उपाय केले तरी काही सुधारणा होईना. उद्धवाने सुचविले की महाराजांनी या व्याधीचे कारण देवाला तरी विचारावे.

एके रात्री महाराज नित्याप्रमाणे नामस्मरण करून निजले. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर उद्धवाला म्हणाले की, घसा दुखण्याचे कारण समजले. रात्री महाराजांना स्वप्न पडले. स्वप्नात ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले की आपल्या गळ्याभोवती अजान वृक्षाच्या मुळ्यांनी वेढा पडला आहे. तो नाथांनी सोडवावा. ज्ञानेश्वरमहाराजांनी आळंदीस सुमारे चारशे वर्षांपूर्वी समाधी घेतली होती.

नाथमहाराजांनी लगेच आळंदीस जाण्याची तयारी सुरू केली. ही बातमी गावात सगळीकडे पसरली. अशा संधीचा लाभ घ्यावा म्हणून अनेकजणांनी नाथां-बरोबर जाण्याची तयारी केली. थोड्याच दिवसांत बराच मोठा समुदाय आळंदीच्या यात्रेस निघाला. मजल दरमजल करीत सगळेजण आळंदीजवळ येऊन पोहोचले त्या काळी तेथे दाट अरण्य होते. बरीच शोधाशोध आणि चौकशी केल्यानंतर त्यांना असे कळले की त्या रानात एक सिद्धेश्वराचे देऊळ आहे आणि त्या देवळासमोर ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली आहे. त्या समाधीजवळ एक मोठा अजान वृक्ष आहे. शोध केल्यानंतर ते देऊळ आणि त्याच्या समोरचा तो अजान वृक्षही सापडला, आणि समाधीची जागा साधारणपणे निश्चित झाली. तिथे थोडेसे खणून झाल्यावर चिरे-बंदी दगडही आढळले. इथेच समाधी असावी अशी खात्री झाली, आणि काही वेळाने समाधीही दिसलीच.

नाथांनी बरोबरच्या सर्व लोकांस दूर जाण्यास सांगितले, आणि स्वतः एकट्यानेच आत जायचे ठरविले. नंतर नाथमहाराज आत उतरले. वज्रासन घालून बसलेली ज्ञानदेवांची शांत मूर्ती त्यांच्या दृष्टीस पडली. त्या ध्यानस्थ बसलेल्या मूर्तीच्या गळ्याभोवती झाडाच्या मुळीचा विळखा पडला होता. हेच नाथांचा घसा दुखण्याचे आणि सुजण्याचे कारण !' नाथांनी त्या मुळीचा विळखा सोडवला आणि गळा मोकळा केला. ज्ञानेशांच्या त्या शांत मूर्तीकडे पाहून नाथांच्या मनात जे काय प्रेम, आदर आणि सद्भाव उत्पन्न झाले असतील ते कोण सांगू शकणार ? ह्या केवळ अनुभवावयाच्याच गोष्टी असतात. इथे शब्द लंगडे पडतात आणि योग्य वर्णन होऊ शकत नाही. दोन अवस्थांमध्ये एकाच आत्म्याची रूपे ! एक समाधीस्थ देह आणि एक कार्यक्षम देह. त्या दोन रूपांचीच ती भेट. नाथमहाराज ज्ञानेश्वरांच्या सन्निध तीन दिवस आणि तीन रात्री राहिले. ह्या अवधीत तेथे काय काय घडले हे कुणालाच माहीत नाही, कारण नाथमहाराजांनी एका गोष्टीशिवाय कुणाला काहीही सांगितलेले नाही.

एकनाथमहाराजांच्या बरोबर बरेच लोक आले होते. हल्लीप्रमाणे त्या वेळी यात्रेकरूंची सोय नसे आणि ह्या सगळ्यांना तर तेथे बरेच दिवस राहायला लागणार

होते. पण योगायोग असा की त्याच वेळी एका वाण्याने ह्या यात्रेकरूंकरिता दुकान घातले आणि जरूर ते सर्व पदार्थ त्यांना पुरविले. लोकांनी जेव्हा पैसे देऊ केले तेव्हा तो म्हणाला, "नाथमहाराज सधन आहेत. आम्ही पण त्यांचे ऋणी आहोत. पैशांचा विचार न करता सर्वांनी जे लागेल ते न्यावे. " लोकांनी नाथांना ही गोष्ट सांगितली तेव्हा नाथ म्हणाले, "जायच्या आधी आपण त्याचे सर्व देणे चुकते करू." अशा रीतीने सर्व अडचण दूर झाली.

सर्व काम संपल्यावर नाथांनी परत जाण्याचा दिवस ठरविला. त्यादिवशी त्या वाण्याचा सर्व हिशोब चुकता करण्यास सांगितले. पण काय चमत्कार ! लोकांना तो वाणीही सापडेना आणि त्याचे दुकानही दिसेना. कोणालाच काही सापडेना. नाथांचे अंत:करण भरून आले. त्यांना ह्या चमत्काराचा उलगडा झाला. लोकांच्या दृष्टीने हा चमत्कारच राहिला. ह्या गोष्टीबद्दल वाचणाऱ्याने आपल्या मनोधर्मा· प्रमाणे मत करून घ्यावे. जगात विलक्षण गोष्टी घडतात हे निर्विवाद आहे. काही-जणांना त्याचा उलगडा होतो, काहींच्या दृष्टीने तो चमत्कार राहातो, तर काहींचा त्याच्यावर विश्वासच बसत नाही. ते म्हणतात ह्या केवळ भाविक लोकांनी रचलेल्या कथा आहेत. आला असेल वाणी आणि आदल्या दिवशी गेला असेल निघून ! काही वर्षांपूर्वी जर कोणी म्हणाला असता की आकाशात उड्डाण करून तीन माणसे ताशी २५००० मैलांच्या वेगाने पृथ्वीभोवती एका दिवसात सात प्रदक्षिणा घालतील, तर त्याला सर्वांनी वेड्यांत काढले असते. पण आज त्या गोष्टी आपण प्रत्यक्ष पाहात आहोत ! असो.

सर्वजण आळंदीहून परत फिरले, आणि थोड्याच दिवसांत पैठणास येऊन पोहोचले. आळंदीला ज्ञानेशांच्या समाधीच्या सन्निध असताना नाथांना ज्ञानेश्वरीचे पुनरुज्जीवन करण्याचा आदेश झाला होता. त्याप्रमाणे पैठणास आल्यावर नाथांनी लगेच सुरुवात केली.

ज्ञानेश्वरी लिहिलेल्या काळापासून नाथांच्या वेळेपर्यंत म्हणजे दरम्यानच्या सुमारे चारशे वर्षात त्या ग्रंथात बराच फरक झाला होता. इतर लोकांनी रचलेल्या ओव्या त्यात ज्ञानेश्वरांच्या म्हणून घुसडून दिल्या गेल्या होत्या. ज्ञानेश्वरांच्या काही ओव्या सापडतच नव्हत्या. पुस्तक लिहिले गेल्यानंतर साडेतीनशे वर्षांनी त्याची खरी आवृत्ती काढणे हे काही सोपे काम नाही. शिवाय ज्ञानदेवांच्या नंतर त्या पुस्तकाची जोपासना कोण करणार ? त्या वेळी छापण्याची कलाही नव्हती. ग्रंथ या दृष्टीने पाहिले तर, प्राकृतात लिहिलेला ज्ञानेश्वरी हा गीतेवरील प्रसिद्ध ग्रंथ आहे. तो साधारणत: शके १२१२ मध्ये पूर्ण झाला. हल्लीच्या काळी आपण जी ज्ञानेश्वरी म्हणून वाचतो, ती एकनाथ महाराजांनी संशोधन करून लिहिलेली आवृत्ती होय. श्रीनाथमहाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाचे संशोधन केल्यानंतर त्या संबंधाने लिहिले.

**श्रीशके पंधराशे साहोत्तरीं । तारणनाम संवत्सरी । एकाजनार्दने अत्यादरी । गीताज्ञानेश्वरी प्रती शुद्ध केली ।। ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परी पाठांतरी शुद्ध अबद्ध । तो शोधूनियां एवंविध । प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ।।२।। नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेचो वाचिता टीका । ज्ञान होय लोकां । अतिभाविकां ग्रंथार्थियां ।।३।। बहुकाळ पर्वणी गोमटी । भाद्रपदमास कपिलाषष्ठी । प्रतिष्ठानीं गोदातटीं । लेखनकामाठी संपूर्ण जाहली ।।४।।**

ज्ञानेश्वरांनी लिहिलेली मूळ समग्र प्रत आज उपलब्ध नाही. हे संशोधन चालू असताना एक प्रसंग घडला. एकनाथांना असे वाटले, की ज्या काही ओव्या विस्कळीत आहेत, त्या स्वतः रचून लिहाव्यात. नाथांचे इतर कार्यक्रम चालूच होते. नदीवर जाण्याच्या वाटेवर एक मशीद होती. तिथून जात असतांना एक अवलिया एका सुंदर शालजोडीला ठिगळे लावीत आहे असे नाथमहाराजांना दिसले. नाथांनी त्याला विचारले की, "या चांगल्या शालजोडीला ठिगळे का लावता ?" त्यावर तो म्हणाला, "चांगल्या शालजोडीला ठिगळे कशी दिसतात ते पाहतो." नाथमहाराज संकेताने याचा अर्थ समजले--ज्ञानेश्वरीसारख्या उत्तम शालजोडीवर ते स्वतःच्या ओव्यांची ठिगळे लावू पाहात होते. त्यांनी लगेच ही गोष्ट बंद केली.

ज्ञानदेवांनी एकनाथमहाराजांसारख्या सत्पुरुषाला त्यांच्या ग्रंथाचे पुनरुज्जीवन करण्याची प्रेरणा केली हे सुद्धा आम्हा महाराष्ट्रीयांचे भाग्य समजले पाहिजे. काही लोकांचा असा समज आहे की एकनाथमहाराज हे ज्ञानेश्वरांचेच अवतार आहेत, आणि ज्ञानेश्वर हे विष्णूचे अवतार समजतात.

ज्ञानेश्वरांचा देह तीनशे वर्षे जमिनीत असतानासुद्धा, न कुजता, किडयांनी न खाता चांगल्या स्थितीत कसा राहिला, ही एक आश्चर्य करण्यासारखीच घटना आहे. ज्ञानेश्वरांचे सगळे चरित्र हेच एक आश्चर्य आहे. हा मुलगा रानोमाळ भटकत असताना इतक्या अल्पवयात गीतेसारख्या गूढ विषयावरील मराठीत अनुवाद लिहिण्याइतके संस्कृत आणि मराठी तरी कोठे आणि कोणाजवळ शिकला ? पण अवतारी व्यक्ती सर्वसाधारण नियमाच्या पलीकडे असतात. आद्य श्रीशंकराचार्यांनी सर्व शास्त्र आणि वेद बाराव्या वर्षापर्यंत हस्तगत केले, आणि इतक्या लहान वयात विचार करून आणि समजून संन्यास घेतला. का बरं ?

पूर्वजन्मीचे संस्कार, याशिवाय याला दुसरे सयुक्तिक उत्तर नाही. पण पुनर्जन्म असेल का असा पुनः पुनः मनात संशय उत्पन्न होतो.

यंदा सेंट फ्रान्सिस झेवियरच्या शवाचे प्रदर्शन झाले. हे शव बरेच ठिकाणी कुजून गेले आहे. पण तरीही चारशे वर्षे ते टिकले हे आश्चर्यच आहे.

## सावकाराचे पैसे परत केले

पंढरपूरच्या आणि आळंदीच्या यात्रेत महाराजांचे पैसे बरेच खर्च झाले. म्हणून त्यांनी गावातील एका सावकाराकडून काही पैसे उसने आणले. हा सर्व व्यवहार उद्धवच करीत असे, आणि नाथांना त्याबद्दल काही माहीतही नसे. नेहमी पैसे वेळच्या वेळी परत केले जात असत. पण या वेळी पैसे परत करण्यास उशीर झाला. याचा फायदा घेऊन नाथांच्या अब्रूला बट्टा लावण्याचा त्यांचा द्वेष करणाऱ्या विद्वान् पण कुटिल आणि मत्सरी लोकांनी बेत केला.

या लोकांनी त्या सावकाराला गाठले आणि त्याला चिथावणी दिली की नाथांकडे तावडतोब पैशाची मागणी कर. खरे म्हणजे त्या सावकाराला नेहमीचा अनुभव होता, आणि नाथांची योग्यताही त्याला माहीत होती. त्यामुळे त्याने तसे वागावयास नको होते. पण वेळ आली होती, म्हणून त्याला तशी दुर्बुद्धी झाली. हाच संतांच्या आणि आमच्यामधील फरक. अशा प्रसंगांशिवाय संतांचे माहात्म्य जगाला कसे कळेल ? शिवाय देवानेही आपण भक्तांचे कैवारी असतो हे दाखवण्याची संधी साधली. तो सावकार पैसे मागण्याकरिता सरळ नाथांच्या घरी गेला. नाथांना काहीच माहीत नव्हते. त्यांनी उद्धवाकडे चौकशी केली. सावकार म्हणाला, "तुम्ही चोवीस तासांत सर्व पैसे फेडा, नाहीतर सरकारची मदत घेऊन मी तुमच्या वाड्यावर जप्ती आणीन." अजून तो वाडा त्यांच्याच वंशजांकडे आहे हे सांगायला नकोच. उद्धव त्या सावकाराला म्हणाला, "तुम्ही सरळ महाराजांकडे का गेलात ?" पण या सावकाराला हे माहीत नव्हते की नाथांचे पैसे परत न मागणारा असा एक सावकार होता. त्या सावकाराकडे आज कित्येक वर्षे—महाराजांच्या वयाच्या आठव्या वर्षापासून—मुद्दल जमा करून ठेवलेली होती. सामान्य सावकार पहिल्याने मुद्दल देतात आणि मग व्याजासह परत घेतात. पण हा अनादी सावकार पहिल्याने घेतो आणि वेळ पडेल तेव्हा हिशोब न करता परत देत राहातो. असो.

त्या रात्री सावकाराकडे नाथांचा नोकर म्हणून एक मनुष्य गेला आणि सावकाराच्या सर्व रकमेची फेड केली. सावकारालाही आश्चर्य वाटले की इतक्या थोड्या वेळात नाथांनी पैसे आणले कुठून ? पण त्याचे सर्व पैसे मिळाले त्यामुळे त्याला पोहोच-पावती द्यावीच लागली. देव सदा सत्त्व पहात असतो. दामाजीपंतांचे देणेसुद्धा पांडुरंगाने विठू महाराच्या रूपाने फेडून पावती घेतली. नरसी मेहताची हुंडी पटविली. दासोपंतांच्याकरिता दत्ताजीरावाला दोन लाख रुपये देण्याचे काय कारण होते ? विश्वशक्ती कोणत्याही तऱ्हेने मदत करते.

दुसऱ्या दिवशी सकाळी स्नानसंध्यादी कर्मे आटोपून नित्याप्रमाणे एकनाथ भागवत वाचण्यास बसले. त्यांनी पोथी उघडली तो त्याच पानात त्यांना ती पावती

दिसली. नाथांनी उद्धवाला विचारले पण तो काहीच सांगू शकेना. कदाचित् श्रीखंड्याने काही उलगडा केला असता पण त्याला कोणी विचारलेच नाही. कारण तो हे व्यवहार करीत नव्हता. मग मात्र नाथांना सगळा उलगडा झाला. देवाने ह्या गोष्टीसुद्धा आपल्यासाठी कराव्यात ह्याबद्दल नाथांना फार वाईट वाटले. आम्ही तर प्रपंचातल्या एवढ्यातेवढ्या गोष्टीतसुद्धा त्या ईशशक्तीची मदत मागतो पण मोक्ष मात्र मागत नाही. काय हा प्रपंचाचा मोह. हीच तर माया ! आपल्यापैकी कोणाला मिळेल हे दूरच—पण कितीजण मोक्ष मिळण्याकरिता प्रयत्न करतात किंवा त्या ईशशक्तीची मदत मागतात ? पण प्रपंचातल्या अडचणी सुटण्याकरता मात्र देवाची वरचेवर मदत मागतो. एवढ्या क्षुल्लक गोष्टींकरिता विश्वशक्तीची मदत मागणे तरी योग्य आहे का ? असो.

कट्ट्यावरचे कुटाळ तोंडघशी पडले हे सांगायला नकोच.

## श्रीखंड्याला ओळखला

एक दिवस एक ब्राह्मण एकनाथमहाराजांच्या घरी आला आणि श्रीखंड्या कोठे आहे म्हणून विचारू लागला. नाथांनी काय काम आहे म्हणून विचारल्यावर त्याने अशी हकीगत सांगितली.

तो ब्राह्मण, द्वारकेला श्रीकृष्णाच्या देवळात श्रीकृष्णांनी दर्शन द्यावे म्हणून धरणे धरून बसला. त्याला दृष्टांत झाला की, 'श्रीकृष्ण श्रीखंड्याच्या रूपाने नाथ-महाराजांच्या घरी आहेत तरी तू तिकडे जा.' म्हणून चौकशी करीत तो पैठणास आला. गावात नाथांच्या घराबद्दल त्याने चौकशी केली, पण त्याला लोकांनी नीट माहिती पुरवली नाही. शेवटी तो नदीवर पोहोचला. तिथे त्याला एक मनुष्य कावड घेऊन येताना दिसला. दुसऱ्या एका माणसाने सांगितले की, "हा कावडवाला नाथांच्याच घरी जातो आहे." म्हणून तो ब्राह्मण त्याच्याबरोबर नाथांच्या घरी आला, आणि त्याला श्रीखंड्याला भेटावयाचे आहे असे सांगू लागला.

नाथांनी, गिरिजाबाईंनी आणि उद्धवाने श्रीखंड्याला खूप हाका मारल्या आणि शोध केला. पण श्रीखंड्या नाहीसाच झाला होता. तेव्हा खरी स्थिती सगळ्यांच्या ध्यानात आली, आणि त्यांना सुचेनासे झाले. नाथांच्याबरोबर सगळ्यां-नीच त्या अचिंत्य विश्वशक्तीचा धावा केल्यानंतर चतुर्भुज श्रीकृष्ण-स्वरूपाचे त्यांना दर्शन घडले. सर्वजण कृतार्थ झाले. पुष्कळ संतचरित्रांतून भगवान् सगुणरूपाने येऊन संतांच्या घरी काम करतात असे वर्णन आहे. संत जनाबाईला श्रीकृष्ण दळायला मदत करीत असत. गोरोबा कुंभाराचे हात तुटल्यावर तर ते त्याचे सर्वच काम करीत. संत सखूला ते कांडायला मदत करीत. चोखामेळ्याच्या बायकोचे बाळंतपणच

त्यांनी केले. पण नाथमहाराज विशेष भाग्यवान. घरात श्रीखंडया काम करी आणि देवडीवर स्वतः सद्गुरू देवदत्त पहारा करीत. दुर्जनांना आत शिरण्याचा आणि दुष्कृत्यांना बाहेर पडण्याचा मार्गच मुळी बंद झाला होता. गुरुकृपा, श्रीखंडया आणि दत्तमहाराज अशा तिहेरी संरक्षणात मानवदेह असल्यावर त्यांचे आयुष्य वैभवात गेले यात काय नवल ?

काही चरित्रकार हा शेवटचा प्रसंग थोडा निराळा सांगतात. श्रीखंडयाला ओळखल्यानंतर नाथमहाराज म्हणाले, "काय झाले हे ? मी तर याचे लग्न करून देण्याच्या तयारीत होतो." त्यावर श्रीखंडया म्हणाला, "आता ते काही शक्य नाही. आणि मी पण तुमच्या घरी राहू शकत नाही. तरी रुक्मिणी-स्वयंवर लिहा, म्हणजे माझे लग्न केल्यासारखेच होईल." इतके बोलून श्रीखंडया जेथे उभा होता तेथेच गुप्त झाला. श्रीखंडयाच्या रूपाने भगवान् श्रीकृष्णांनी नाथमहाराजांच्या घरी बारा वर्षे काम केले. एक आख्यायिका अशी आहे की श्रीकृष्णांनी निरनिराळ्या रूपांत नाथांच्या घरी एकंदर छत्तीस वर्षे काम केले.

**"श्री एकनाथ सदनी माधवजी सर्व काम हे करितो ।**
**स्वकरे चंदन घाशी, गंगेचे पाणि कावडी भरितो ।।"**

पैठण येथे नाथांच्या वाडयात एक मोठा रांजण आहे. फाल्गुन वद्य षष्ठी दिनशी त्या रांजणात कितीही पाणी ओतले तरी तो रांजण भरत नाही. शेवटी कोणाच्या तरी रूपाने देवाने स्वतः त्यात घागर ओतली की लगेच तो रांजण भरून वाहू लागतो असे म्हणतात.

## गावबाची गोष्ट

गोदावरी नदीकाठी एका खेडेगावात कृष्णाजीपंत नावाचा एक गरीब ब्राह्मण राहात होता. त्याला पुष्कळ मुले होती. त्यांचा शेवटचा मुलगा तर मुका आणि मूर्ख होता, आणि त्यात तो खादाड होता. गरिबी, त्यात पुष्कळ संतती आणि त्यात एखादे खादाड मूल. मग त्याचे हाल काय विचारावे ?

त्या मुलाचे नाव 'गावबा'.

एक दिवस सणाच्या निमित्ताने घरात पुरणाची पोळी केली. ती खाल्ल्या-पासून तर गावबा दुसरे काही खाईनाच. त्याला रोज पुरणाची पोळी हवी असे. कृष्णाजीपंत बिचारा गरीब. साधी पोळी करायची विवंचना—त्याला कुठली रोज पुरणपोळी करायला परवडणार !

शेजारच्या एका माणसाने गावबाच्या आईला सुचविले की हा रोज पुरणाची पोळी मागतो, तर याला एकनाथमहाराजांच्या घरी नेऊन ठेवा. तेथे रोज पुरणा-

वरणाचा नैवेद्य असतो. एक दिवस गाववाची आई खरोखरच त्याला घेऊन नाथांच्या घरी आली. त्यावेळी जेवणाचीच तयारी चालली होती. जेवणात पुरणाची पोळी पाहून गावबाला इतका आनंद झाला की तो परत जायलाच तयार होईना. आधीच पक्वान्न, त्यातून ते संतांच्या घरचे—ते खाल्ल्यावर कोणाला तेथे राहावेसे वाटणार नाही ? गावबाच्या आईने त्याची सर्व हकीगत महाराजांना सांगितली. नाथ म्हणाले, "बरे तर, त्याला इथेच राहू दे." झाले मग काय ! गावबाची चैन झाली. महाराजांनी गिरिजाबाईला सांगितले की, "हरिसारखाच हा आपला दुसरा मुलगा समज आणि त्याला रोज पुरणाची पोळी खायला करीत जा." याप्रमाणे गावबा चैनीत राहू लागला. काही विशिष्ट कारणाकरिताच त्याला दैवाने येथे आणला होता.

एक दिवस नाथांनी गावबाला जवळ घेतले आणि त्याला रामनाम घ्यावयास सांगू लागले. पण सगळे व्यर्थ ! त्याला काहीच म्हणता येईना. मग नाथांनी त्याला विचारले, "बाळ, माझे नाव तुला माहीत आहे का ?" त्याबरोबर गावबा चटकन एकनाथ असे म्हणाला. खरेच आहे. एका नाथाशिवाय जगात दुसरे काय आहे ?

**हरि बोला हरि बोला नातरी अबोला ।**
**व्यर्थ गलबला करू नका ।।**

एका सुतळीला एकशे आठ गाठी मारून नाथांनी ती त्याला माळेसारखी करून दिली, आणि तिच्यावरच गावबा 'एकनाथ' नामाचा जप करू लागला.

एक दिवस साक्षात् प्रभू रामचंद्र नाथांच्या समोर आले, आणि त्यांनी नाथांना सांगितले, "आजपर्यंत पुष्कळांनी यथार्थ रामायण-चरित्रे लिहिली, पण माझ्या चरित्रातील खरा भाव काय आहे, याचे वर्णन कोणीच केले नाही. तरी तू भावार्थ रामायण लिही." लगेच नाथांनी भावार्थरामायण लिहिण्यास सुरुवात केली. असे प्रेरणेने किंवा उत्स्फूर्तपणे निर्माण झालेले लिखाण नेहमीच प्रभावी ठरते. तुकाराम महाराजांचे अभंग आणि समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक किती साधे, सरळ पण बोधपर आणि लोकप्रिय आहेत. तसेच शंकराचार्यांचे 'भजगोविन्दम्' नाही का ? आज हजाराच्या वर वर्षे झाली, पण त्याचे आकर्षण आहे तसेच आहे. असो.

बालकांड, विवाहकांड, वनवासकांड आणि युद्धकांडाचे चव्वेचाळीस अध्याय लिहून झाले. हे रामायण लिहीत असताना महाराज रोज त्यावर प्रवचन करीत असत. भावार्थ रामायणाचे लेखक स्वतःच प्रवचन करीत असल्यामुळे त्या प्रवचनात अपूर्व भावनाविलास श्रोत्यांना अनुभवावयास मिळत असे.

## शेवटचा निरोप

रामायणलेखनाला आरंभ केल्यानंतर एक दिवस महाराजांना देवाने सूचना दिली की आता आवराआवर करा. तुमचा इहलोक सोडण्याचा काल जवळ आला

आहे. काही लोकांना अशी सूचना आगाऊ मिळते, आणि जर ते पुण्यवान् असतील तर ते हा काळ ईशचिंतनात घालवतात, आणि पूर्वसुकृताचा संचय असेल तर जीवन कृतार्थ करून घेतात.

फाल्गुन वद्य पंचमीला रात्री नाथांनी सगळ्या श्रोतृवर्गाला सांगितले की, उद्या म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठीला, हा देह सोडण्याचे मी ठरविले आहे. हे शब्द ऐकताच सर्व लोक क्षणभर सुन्न झाले. आपण काय ऐकतो आहोत हेच त्यांना समजेना. थोडया वेळाने ते भानावर आले. काहीजण म्हणाले, "महाराज, आपण कृष्णदासांनासुद्धा अकरा दिवस आयुष्य वाढवून दिलेत. मग आपल्याला नाही का काही दिवस आणखी राहता येणार ?" दुसरे काहीजण म्हणाले, "आपण गेल्यावर हे रामायण कोण पुरे करणार ?" महाराजांनी उत्तर दिले, "रामायण पूर्ण होणे न होणे प्रभू रामचंद्राच्या हातात आहे. त्यामुळे मी काय सांगणार ? शिवाय हा गावबा आहे की ! राहिलेले रामायण हाच पुरे करणार आहे." हे ऐकल्यावर लोक चकितच झाले. गावबा, आणि रामायण लिहिणार ? ज्या मुलाला नीट बोलतासुद्धा येत नाही, फक्त 'एकनाथ' एवढा एकच शब्द म्हणता येतो, तो काय लिहिणार कपाळ ! पण विचाऱ्या लोकांना काय माहीत की,

**" मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम् ।**
**यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ।। "**

प्रारब्धाने ठरवलेल्या परिस्थितीत समाधानाने राहणे आणि त्याच्याविरुद्ध इच्छा न ठेवणे हेच शांतीचे वर्म आणि संतांचे ब्रीद ! गावबाला नाथांनी बोलावले, आपल्या जवळ बसवून हातात लेखणी दिली, आणि लिही म्हणून सांगितले. एका क्षणाचाही विलंब न लावता गावबाने लिहिण्यास सुरुवात केली, आणि पंचेचाळीसावा अध्याय त्यांनी तेथल्या तेथे लिहून काढवला. नाथमहाराजांनी तो सर्व लोकांना वाचून दाखविला. सर्व ओव्या जशा काही नाथांनीच लिहिल्या असाव्यात अशा उतरल्या होत्या. जमलेल्या मंडळींची खात्री झाली की हा गावबाच ग्रंथ पुरा करू शकेल.

पण अशा गोष्टी घडतात तरी कशा ? नाथांचा नातू, गोदाबाईचा मुलगा जो पुढे मुक्तेश्वर म्हणून प्रसिद्ध कवी झाला, तोसुद्धा लहानपणी मुका होता, आणि तो नाथांच्या कृपेमुळे बोलू लागला असे म्हणतात. कवी कालिदास लहानपणी अर्धवट डोक्याचा आणि तोतरा होता. पण कालीमातेच्या कृपेने जगविख्यात प्रभावी शीघ्रकवी झाला.

त्या रात्री बराच वेळ भजन वगैरे झाले. लोक फार उशिरापर्यंत बसले होते. सर्वांच्या मनात एकच विचार घोळत होता की उद्या नाथमहाराज आपल्याला सोडून

जाणार. ज्ञानदेवांनी समाधी घेतली त्यावेळी निवृत्तिनाथ, नामदेव यांच्यासारख्या आत्मज्ञानी विभूतींनादेखील दु:ख आवरेना.

**'आम्हां मातापिता नित्य ज्ञानेश्वर । नाही आता थार विश्रांतीसी ।।'**

असे म्हणून सोपान आणि मुक्ताबाई रडू लागली. एवढेच काय, पण स्वत: पांडुरंगालासुद्धा, असा देह पृथ्वीतलावरून जाणार म्हणून, वाईट वाटले अशी आख्यायिका आहे.

नाथांचे भक्त म्हणजे तर सामान्य माणसे होती. आपल्या प्रेमातील मनुष्य पुन: कधीही दिसणार नाही या कल्पनेने किती दु:ख होत असेल हे अनुभवानेच समजू शकते. हरिपंडिताला अतिशय वाईट वाटत होते. त्या पत्रावळीच्या प्रसंगापासून नाथांच्या थोरवीची त्याला पूर्ण जाणीव झालेली होती. शिवाय काही झाले तरी ते त्याचे वडील होते. आता एकाच दिवसात आपण अनाथ होणार ही कल्पनाच त्याला सहन होईना. पण करणार काय ? इच्छा असो वा नसो, प्रारब्धात असेल त्याप्रमाणे घडणारच. अशा खिन्न मन:स्थितीत सर्वजण त्या रात्री आपापल्या घरी परतले. कित्येकजणांनी अशीही इच्छा केली असेल की उद्याचा दिवस उगवूच नये. पण काळ कोणासाठी थांबत नाही.

ती रात्र फाल्गुन वद्य पंचमीची होती. रात्री नाथांनी दरवर्षीप्रमाणे सर्वांना दुसऱ्या दिवशीचे, जनार्दनस्वामींच्या पुण्यतिथीचे आमंत्रण देऊन ठेवले होते. नाथांच्या आयुष्यात फाल्गुन वद्य षष्ठीला फारच महत्त्व आहे. त्याच दिवशी जनार्दनस्वामींचा जन्म (शके १४२६) आणि निर्याणही (१४८१). त्याच दिवशी एकनाथांचा जन्म झाला (१४५५), त्याच दिवशी देवगिरी किल्ल्यावर त्यांची आणि जनार्दनस्वामींची भेट झाली (१४६७), त्याच दिवशी नाथांना दत्तात्रेयाचा सगुणसाक्षात्कार झाला आणि जनार्दनस्वामींच्या निर्याणाचाही दिवस तोच ! जनार्दनमहाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सर्वांना बोलावलेले होतेच, आणि त्यात नाथमहाराज इहलोक सोडून जाणार, म्हणून त्यांनी सांगितले होते.

फाल्गुन वद्य षष्ठी (शके १५२१) चा दिवस उजाडला. सकाळपासून लोकांची गर्दी होऊ लागली. दुपारपर्यंत जनार्दनस्वामींच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम उरकला. सगळे आटोपल्यावर नाथमहाराज उठले आणि सगळ्यांना नमस्कार करून त्यांचा निरोप घेऊ लागले—

**'आम्ही जातो अमुच्या गावा । अमुचा रामराम घ्यावा ।।'**

सर्वांना भडभडून आले. त्यांच्या मनाची काय स्थिती झाली असेल हे वाचकांनी कल्पनेनेच पाहावे. सर्वसामान्य मनुष्य गेला तरी लोकांना किती वाईट वाटते ! नाथमहाराज तर परम साधू ! ते स्वत: मात्र निर्मोह होते. कारण जन्ममृत्यूचे कोडे त्यांना सुटले होते. पण इतरांच्या मनांत मात्र त्यांनी मोह निर्माण करून ठेवला

होता. आपण या जगात येतो तेव्हा रडत येतो, आणि त्यावेळी जग हसत असते. आपण जातो तेव्हा आपण हसत असावे, आणि जगाला रडावयास लावावे. कित्येक लोकांना नाथांनी मार्गदर्शन केले होते, कित्येकांचा उद्धार केला होता, आणि सर्व चराचरसृष्टीत शांतता नांदावयास लावली होती. खलपुरुष सगळीकडेच असतात, पण नाथांची बुद्धी मात्र त्यांच्याबद्दलसुद्धा निर्वैर होती. निष्कामकर्मवृत्ती असावी हा तर त्यांचा नंतरच्या पिढीसाठी सांगितलेला धडाच आहे. पण ते केवळ कर्मयोगी नव्हते, तर आत्मज्ञानी होते. म्हणूनच ते जीवन्मुक्त होते.

**तीर्त्वा मोहार्णवं हत्वा रागद्वेषादिराक्षसान् ।**
**योगी शान्तिसमायुक्त आत्मारामो विराजते ।। ५० ।। (आत्मबोधः)**

नाथांनी सर्वांचा निरोप घेतला, आणि ते मूर्च्छित पडले.

## नाथमहाराजांनी जलसमाधी घेतली

अजूनपर्यंत काही खलवृत्तीच्या लोकांना त्यांच्या साधुत्वाची साक्ष पटली नव्हती. कुटाळकट्टयावरचे लोक तिथे होतेच. ते म्हणाले, "अहो, इतर लोकांच्याप्रमाणेच हा मेला की हो ! हा कसला साधू ?"

हे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले मात्र, तोच नाथमहाराज उठून बसले. हे पाहताच सर्व लोकांनी हरिनामाचा जयजयकार केला. नाथमहाराज म्हणाले, "आपण सर्वजण आता नदीवर जाऊ." त्याप्रमाणे भजन करीत सर्व मंडळी नदीतीरावर आली. तेथे नाथांनी त्यांचे शेवटचे कीर्तन थोडा वेळ केले. नाथांची भूतदया किती विशाल होती हे आपल्याला माहीत आहेच. या प्रसंगी सर्व जातीचे हजारो लोक जमले होते. तेथे असा एकही मनुष्य नसेल की ज्याच्यावर नाथांनी कोठल्या ना कोठल्या रीतीने कृपा केली नसेल ! कीर्तन संपल्यावर सर्व लोकांनी त्यांच्या चरणी वंदन केले. हरिपंडिताने तर त्यांच्या पायांना मिठीच मारली. नाथांनी त्यांना उठवले आणि त्यांच्या मस्तकावर कृपाहस्त ठेवला. सर्व लोकांना एकच विनंती केली, "आम्हांला शेवटचे दोन शब्द सांगा." नाथमहाराज म्हणाले, "आतापर्यंत सांगितले त्याखेरीज आणखी काय सांगणार ?"

आणि त्यांनी हा शेवटचा श्लोक सांगितला—

**आम्ही जातो आता लोभ असो द्यावा ।**
**राग न धरावा बोलण्याचा ।।**

९२५९ ८५

मायबाप तुम्ही मज बालकासी।
म्हणूनी सेवेसी बोलतसे ।।

देवाचे स्मरण प्रेम सर्वाभूती।
ठेवा सदा चित्ती समाधान ।।

आवडीने भावे हरीनाम मुखी।
घेता पूर्ण सुखी व्हाल बापा ।।

'एका जनार्दनी' बोलणे शेवट।
मानू नका वीट क्षमा करा ।।

नामस्मरण करून नाथमहाराजांनी वीणा शेवटची खाली ठेवली, आणि ते नदीकडे जाऊ लागले. सर्वांनी हरिनामाचा गजर सुरू केला. कंबरभर पाण्यात गेल्यावर पुन्हा पुन्हा नमस्कार केला आणि पाण्यात बुडी मारली. थोड्याच वेळात, परित्यक्त असा अचेतन देह पाण्यावर तरंगू लागला. हरिपंडित, उद्धव आणि इतर लोकांनी तो देह नदीबाहेर काढला, आणि जवळच त्या देहाला अग्निसंस्कार केला. गिरिजाबाई सती गेली असे म्हणतात.

दुसऱ्या दिवशी लोक तिथे गेले तो त्यांना त्या जागी एक पिंपळ आणि एक तुळस अशी दोन रोपे उगवलेली दृष्टीस पडली. लोकांनी त्यांच्यासभोवती पार बांधला. हल्ली तेथे नाथांची समाधी बांधलेली आहे.

## —एकनाथांची आरती—

आरती एकनाथा। महाराजा समर्था।
त्रिभुवनी तूचि थोर। जगद्गुरु जगन्नाथा ।। आरती ०।।

एकनाथ नाम सार। वेद-शास्त्राचे गूज ।
संसार दुःख नासे महामंत्राचे बीज ।। आरती ०।।

एकनाथ नाम घेता। सुख वाटले चित्ता।
अनंत गोपाळदासा। धणी न पुरे गाता ।। आरती ०।।

"सीताकांतस्मरण जयजयराम ।।
श्री गोपालकृष्णमहाराजकी जय.
श्री गुरुदेव दत्त

## आत्मषट्कम्

मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं
न च श्रोत्रजिह्वे न च घ्राणनेत्रे।
न च व्योमभूमिर्न तेजो न वायुः
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥१॥

न च प्राणसंज्ञो न वै पञ्चवायु
र्न वा सप्तधातुर्नवा पञ्चकोशः।
न वाक्पाणिपादौ न चोपस्थपायू
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥२॥

न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ
मदो नैव मे नैव मात्सर्यभावः।
न धर्मो न चार्थो न कामो न मोक्षः
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥३॥

न पुण्यं न पापं न सौख्यं न दुःखं
न मन्त्रो न तीर्थं न वेदो न यज्ञः।
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥४॥

न मे मृत्युशंका न मे जातिभेदः
पिता नैव मे नैव माता न जन्म।
न बन्धुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यः
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥५॥

अहं निर्विकल्पो निराकाररूपो
विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेन्द्रियाणि।
सदा मे समत्वं न मुक्तिर्न बन्धः
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥६॥

भगवान् शंकराचार्यः

REFBK-0014484